१७–अ

# व्यावसायिक अर्थशास्त्र










द्वितीय वर्ष वाणिज्य

अभ्यासपत्रिका क्र. २

INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

University of Mumbai

१७-अ

# द्वितीय वर्ष वाणिज्य
# अर्थशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. २
# व्यावसायिक अर्थशास्त्र

(W.e.f. Academic Year 2014 - 2015 for IDOL Students)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. संजय देशमुख**
कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्राध्यापक-नि-संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक - नि- सहाय्यक संचालक
दूर व मूक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रो. निलेश म्हात्रे**
साकेत महाविद्यालय ऑफ आर्टस, सायन्स आणि कॉमर्स
कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे

: **डॉ. मुक्ता पोटे**
एस. के. सोमय्या महाविद्यालय,
विद्याविहार, मुंबई

**जुलै २०१५, द्वितीय वर्ष वाणिज्य, अर्थशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. २, व्यावसायिक अर्थशास्त्र**

**प्रकाशक** : प्राध्यापक नि संचालक
दूर व मुक्त अध्ययनसंस्था,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई - ४०००९८

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** : **प्रिंटोग्राफी सिस्टम्स (इं) प्रा. लि.**
१३/डि, कुर्ला इंडस्ट्रियल इस्टेट, नारी सेवा सदन रोड,
नारायण नगर, घाटकोपर (प.), मुंबई ह ४०० ०८६.

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भाग - १** | |
| | **प्रकरण १** | |
| १. | समग्रलक्षी अर्थशास्त्र | ०१ |
| २. | केन्सचा उत्पन्न निर्धारणाचा सिद्धांत | १२ |
| | **प्रकरण २** | |
| ३. | पैशाचे अर्थशास्त्र | २४ |
| ४. | भाववाढ / चलनस्फिती | ३६ |
| | **प्रकरण ३** | |
| ५. | बँक आणि वस्तू व मुद्रा बाजारातील समन्वय | ५१ |
| ६ | मौद्रिक धोरण आणि राजकोषिय धोरण | ५८ |
| | **प्रकरण ४** | |
| ७. | आर्थिक विकासातील मुलभूत मुद्दे भाग - १ | ७४ |
| ८. | आर्थिक विकासातील मुलभूत मुद्दे भाग - २ | ९२ |
| | **प्रकरण ५** | |
| ९. | कृषीक्षेत्र, उद्योग आणि सेवाक्षेत्र | १०३ |
| १०. | उद्योग आणि सेवाक्षेत्र | ११६ |
| | **प्रकरण ६** | |
| ११. | १९९१ पासूनचे बँकीग आणि मौद्रिक धोरण | १२७ |
| १२. | मध्यवर्ती बँक व मौद्रीक धोरण | १३७ |

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## व्यावसायिक अर्थशास्त्र - २

## अभ्यासक्रम

## विभाग - १

**प्रकरण १ : समग्रलक्षी अर्थशास्त्र : उत्पन्न व रोजगारविषयक सिद्धांत :**

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह : बंदिस्त (द्विक्षेत्रीय व त्रिक्षेत्रीय प्रवाह) आणि खुल्या (मुक्त) अर्थव्यवस्थेतील प्रवाह - व्यापारचक्र : वैशिष्ट्ये व अवस्था - एकूण मागणी संकल्पना - केन्सचा उत्पन्न निर्धारणाचा सिद्धांत - गुणक सिद्धांत - प्रवेश तत्त्व - महागुणक.

**प्रकरण २ : पैशाचे अर्थशास्त्र :**

पैशाचा पुरवठा : संकल्पना, समाविष्ठ घटक व पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक - पैशाचा भ्रमणवेग : अर्थ व निर्धारीत घटक -
पैशाची मागणी : पैशाच्या मागणीचा केन्सचा सिद्धांत - रोखता पसंती सिद्धांत - भाववाढ / चलनवाढ : संकल्पना व प्रकार - मागणी प्रेरित व खर्च प्रेरित चलनवाढ - फिलिप्स वक्र - चलनवाढीची कारणे, परिणाम व नियंत्रणाचे उपाय.

**प्रकरण ३ : बँक आणि वस्तू व मुद्रा बाजार यातील समन्वय :**

व्यापारी बँक : व्यापारी बँकांची मालमत्ता व देयता - बँकांची रोखता व लाभक्षमता यांच्यातील समन्वय - पैसा गुणक - चलनविषयक धोरण : उद्दिष्ट्ये व साधने - राजकोषिय धोरण : उद्दिष्ट्ये व साधने - IS - LM प्रतिमान, IS - LM वक्रातील बदल

## विभाग २

**प्रकरण - ४ :- आर्थिक विकासातील मुलभुत मुद्दे :**

१९९१ चे नविन आर्थिक धोरण उत्पत्ती आणि मुख्य धोरण बदल - राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नातील प्रवृत्ती - राष्ट्रीय उत्पन्नाची श्रेत्रवार विभागणी आणि व्यवसायिक विभागणी - सर्वसमावेशक वृध्दी - भारतातील मानवी विकास निर्देशांकातील प्रगती (१९९१ नंतरची) आरोग्य, लिंगसंबधित विकास आणि आर्थिक निर्देशक शिक्षण आणि आरोग्य संदर्भातील सरकारी धोरण रोजगारातील अलिकडील प्रवृत्ती बेरोजगारीच्या समस्या.

**प्रकरण ५ :- कृषी, उद्योग आणि सेवाक्षेत्र :**

कृषी उत्पादन आणि उत्पादकतेतील प्रवृत्ती - नविन शेती विषयक धोरण (२०००) आणि अलिकडील धोरणात्मक उपाय - सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्नसुरक्षा जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय शेती - १९९१ पासूनची औद्योगिक विकास : वृध्दी आणि फेरबदल मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा (MRTP ACT) आणि स्पर्धा कायदा - लघुउद्योगासाठी २००० चे सर्वसमावेशक धोरण प्रस्ताव आणि अलिकडील धोरणात्मक उपाय - सेवाक्षेत्र : १९९१ पासूनची वृध्दी आणि कामगिरी.

**प्रकरण ६ : १९९१ पासुनचे बँकींग आणि मौद्रीर्किधोरण :**

१९९१ पासुनच्या बँकीग क्षेत्रातील सुधारणा : उत्पत्ती आणि उपाय भारतातील बँकीगची संरचना - व्यापारी बँकाची कामगिरी - मध्यवर्ती बँकेची विकासात्मक आणि प्रवर्तनात्मक कार्ये - मध्यवर्ती बँकेचे मुद्रापुरवठ्याचे अलिकडील मापक / घटक - चलनवाढ : प्रकृती आणि कारणे - भारतातील मौद्रिक धोरणातील अलिकडील बदल.

❖❖❖❖

# १

# प्रकरण १
# समग्रलक्षी अर्थशास्त्र

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टये
१.१ प्रस्तावना
१.२ सुक्ष्म आणि समग्र अर्थशास्त्र
१.३ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
१.४ बंदिस्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
    १.४.१ व्दिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
    १.४.२ त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
    १.४.३ चतु:क्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
१.५ व्यापारचक्रे
१.६ व्यापारचक्रांची वैशिष्टये
१.७ व्यापारचक्रांच्या अवस्था
१.८ प्रश्न

## १.० उद्दिष्टये

- सुक्ष्म आणि समग्र अर्थशास्त्र या संकल्पना समजून घेणे.
- उत्पन्नाचा बंदिस्त अर्थव्यवस्थेतील प्रवाह अभ्यासणे.
- मुक्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा प्रवाह जाणून घेणे.
- व्यापारचक्र म्हणजे काय ते समजून व्यापारचक्रांच्या विविध अवस्था जाणून घेणे.
- व्यापारचक्रांची वैशिष्टये अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना

इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणेच अर्थशास्त्र हे सुध्दा एक मान्यता पावलेले सामाजिक शास्त्र असून त्यामध्ये मानवाच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. मानवी गरजा अमर्यादा असून त्या गरजांची पुर्तता करणारी साधने मात्र मर्यादित असल्याने मानवला

आपल्या आर्थिक जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशावेळी अमर्यादा गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालून महतम समाधान मिळविण्यासाठी मानवाकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आणि तिच्या आर्थिक वर्तणूकीचा अभ्यास अर्थशास्त्र केला जातो.

मानवाच्या या आर्थिक वर्तनाचे विश्लेषण करण्याच्या अनेक पध्दती आहेत. परंतू अर्थशास्त्रात या पध्दतींपैकी पुढील दोन पध्दती महत्वपूर्ण विश्लेषण पध्दती म्हणून मान्यता पावलेल्या आहेत.

अ) सुक्ष्म अर्थशास्त्र - (Micro Economics)
ब) समग्र अर्थशास्त्र - (Macro Economics)

## १.२ सुक्ष्म आणि समग्र अर्थशास्त्र

सुक्ष्म अर्थशास्त्रालाच अंशलक्षी, व्यष्टी किंवा वैयक्तीक अभ्यास पध्दत या नावांने ओळखले जात असून सुक्ष्म - अर्थशास्त्र ही अर्थशास्त्रीय विश्लेषणाची एक महत्वाची शाखा मानली जाते. प्रां. रॅग्नर फ्रिश यांनी १९३३ मध्ये मध्ये सर्वप्रथम सुक्ष्म व समग्र अर्थशास्त्र या शब्द्प्रयोगांचा वापर केला.

सुक्ष्म किंवा अंशलक्षी अर्थशास्त्र (Micro) हा शब्द ग्रीक भाषेतील Mikros या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ अत्यंत लहान किंवा छोटा असा होतो. याऊलट समग्र किंवा स्थूल अर्थशास्त्र अर्थशास्त्र (Macro) हा शब्द ग्रीक भाषेतील Makros या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ अत्यंत मोठा, व्यापक किंवा विशाल असा होतो.

❖ **समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या व्याख्या :-**

समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) प्रा. के. इ. बोल्डिंग :-**

“समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध वैयक्तिक परिमाणांशी येत नाही तर ते समग्र परिमाणांशी संबंधित असते, वैयक्तिक उत्पन्नाशी नसून राष्ट्रीय उत्पन्नाशी असतो, विशिष्ट वस्तूच्या किंमतीशी येत नाही तर सर्वसाधारण किंमत पातळीशी येतो; तसेच व्यक्तिगत उत्पादनाशी नसून राष्ट्रिय उत्पादनाशी येतो.”

**२) प्रा. गार्डनर :-**

“समग्रलक्षी अर्थशास्त्र हे आर्थिक परिमाणांचा समग्र पातळीवर विचार करुन ते आर्थिक जीवनाच्या समग्र बाबींशी संबंधित असते.”

**३) प्रा. मॅकॉनेल :-**

“देशाच्या अर्थव्यवस्थेच्या रचनेची सर्वसाधारण रुपरेषा आणि ज्या प्रमुख समग्रांची मिळून अर्थव्यवस्था तयार झालेली असते त्या समग्रांमधील संबंध यांच्याशी समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध येतो.”

### ❖ समग्रलक्षी अर्थशास्त्राची वैशिष्टये :-

वरील व्याख्यांच्या सहाय्याने स्थूल अर्थशास्त्राची पूढील वैशिष्टये दिसून येतात.

१) समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समग्रपणे अभ्यास केला जातो.

२) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे सर्वसाधारण समतोलावर आधारित असते.

३) समग्रलक्षी अर्थशास्त्रात वैयक्तिक चलांच्या (Variables) अभ्यासाला महत्व नाही.

४) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे अधिक व्यापक आहे.

५) समग्रलक्षी अर्थशास्त्रात एकूणाचा अभ्यास केला जातो.

## १.३ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह

कोणत्याही उत्पादनाच्या प्रक्रियेत वस्तू व सेवांच्या निर्मितीसाठी श्रम, भूमी, भांडवल आणि संयोजक या उत्पादनाच्या घटकांची आवश्यकता बासते, मोबदल्यात त्यांना अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा मिळते. अर्थव्यवस्थेत उत्पादन संस्था आणि कुटुंबसंस्था या दोन संस्था असून उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह हा या दोन संस्थांमध्ये परस्पर फिरत असतो. तथापी उत्पन्नाचा हा चक्राकार प्रवाह मुक्त आणि बंदिस्त अर्थव्यवस्थेत कशा प्रकारे फिरतो हे पुढीलप्रकारे स्पष्ट करता येईल.

## १.४ बंदिस्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह

बंदिस्त अर्थव्यवस्था असतांना उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह हा पुढील दोन प्रकारे सतत फिरत राहतो.

### १.४.१ व्दिक्षेत्रीय (दोन क्षेत्रीय) उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :-

व्दिक्षेत्र म्हणजेच अर्थव्यवस्थेतील कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था ही दोन महत्वाची क्षेत्रे असून कुटुंबसंस्थेकडून उत्पादन संस्थेकडे वस्तू व सेवांची मागणी केली जाते व उत्पादन संस्था कुटुंबसंस्थांना वस्तू व सेवांची निर्मिती करुन त्यांची किंमत स्वीकारुन वस्तू - सेवांचा पुरवठा करतात.

त्याचवेळी उत्पादन संस्थांना वस्तू - सेवांच्या निर्मितीसाठी श्रम, भूमी, भांडवल व संयोजक हे उत्पादनाचे घटक आवश्यक असतात. हे घटक कुटुंबसंस्था उत्पादन संस्थाकडे पुरवितात. त्यांच्या मोबदल्यात अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा अशी उत्पादन संस्था किंमत देत असतात.

म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न कुटुंबसंस्थेनेकडून उत्पादन संस्थांकडे आणि उत्पादन संस्थांकडून पुन्हा कुटुंबसंस्थेकडे सतत प्रवाहीत होत असतो. म्हणूनच त्याला द्विक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात. उत्पन्नाचा हा चक्राकार प्रवाह पुढील प्रमाणे दर्शविता येईल.




**आकृती क्रमांक १.१**
**व्दिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

वरील आकृतीव्दारे असे दिसून येते की कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांना श्रम, भूमी, भांडवल आणि संयोजक हे उत्पादनाचे घटक पुरवितात तर त्यांना मोबदल्याच्या स्वरुपात उत्पादन संस्था अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा देतात. तसेच उत्पादन संस्था वस्तू - सेवांची निर्मिती करतात व ते कुटुंबसंस्थांना पुरवितात तर त्यांची किंमत कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांना देत असतात.

अशा प्रकारे कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था यांमध्ये उत्पन्नाचा प्रवाह चक्राकार स्वरुपाने सतत सुरु राहतो.

### १.४.२ त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :-

द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था यांच्यात उत्पन्नाचा प्रवाह सतत चक्राकर स्वरुपात सुरू असतो. परंतू त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था याबरोबरच शासनसंस्थांचा देखिल समावेश होतो.

उत्पन्नाचा हा चक्राक्रार प्रवाह वरील ३ क्षेत्रांमध्ये कसा प्रवाहीत होते ते पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक १.२**

**त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

वरील ३ क्षेत्रामार्फत उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह कशा पध्दतीने प्रवाहीत होतो हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### अ) कुटुंबसंस्था :-

कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांकडे श्रम, भूमी, भांडवल व संयोजक हे उत्पादनाचे घटक पुरवितात त्या मोबदल्यात उत्पादन संस्था त्यांना वेतन, खंड, व्याज व नफा देतात. आपल्या नफ्यापैकी काही रक्कम ते बँका किंवा वित्तीय संस्थांमध्ये बचतीच्या स्वरुपात गुंतवितात व विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्नावर सरकारकडे कर (Tax) भरतात. शासन संस्था देखिल कुटुंबसंस्थांना वेतन व हस्तांतरीत उत्पन्नदेखिल प्राप्त होत असते.

### ब) उत्पादन संस्था :-

उत्पादन संस्था कुटुंबसंस्थांकडून होत असलेल्या उत्पादनाच्या घटकांचा खंड, वेतन, व्याज, नफा देतात तसेच उत्पादन संस्था निर्माण करीत असलेल्या वस्तू सेवाचा कुटुंबसंस्था व शासन संख्यांना पुरवठा करतात व त्यांच्या मोबदल्यात वस्तू सेवांची किंमत स्वीकारतात.

बँका, वित्तीयसंस्था यांच्या मार्फत उत्पादन कार्यासाठी अवश्यक भांडवलाची उभारणी केली जाते व मर्यादापेक्षा जास्त नफ्यावर सरकारकडे करांचा भरणा करतात. बदल्यात शासन देखिल त्यांच्याकडून वस्तू सेवांची खरेदी करुन वस्तू-सेवांची किंमत उत्पादन संस्थांना देत असतात.

### क) शासनसंस्था :-

शासनसंस्था कुटुंबसंस्थेकडून उत्पादनाचे घटक होते बदल्यात त्यांना वेतन, मजूरी, निवृत्ती वेतन, हस्तांतरीत उत्पन्न देते. तसेच कुटुंबसंस्थेच्या अतिरिक्त उत्पन्नावर कर (Tax) आकारते.

शासनसंस्था उत्पादन संस्थेकडून वस्तू व सेवांसाठी मागणी करते तसेच उत्पादन संस्थाकडून अतिरिक्त नफ्यावर करांची आकारणी केली जाते.

### १.४.३ खुल्या (मुक्त) अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह

वरील व्दिक्षेत्रीय आणि त्रिक्षेत्रीय प्रतमान बंदिस्त अर्थव्यवस्थेतील प्रतिमान मानले जाते कारण या प्रतिमानात फक्त एकाच देशातील कुटुंबसंस्था उत्पादनसंस्था आणि शासनंस्थांच्या विचार करण्यात आलेला आहे.

परंतु आधूनिक अर्थतज्ञांच्या मते सध्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या काळात देशा-देशांमधील परस्पर संबंध अधीक व्यापक व गुंतागुंतीचे बनलेले असून या परिस्थितीमध्ये विदेशी व्यापाराचा समावेश केल्याशिवाय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचे विश्लेषण करणे अशक्य आहे. म्हणजेच मुक्त अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीत कुटुंबसंस्था, उत्पादन संस्था, शासनसंस्था या बरोबरच परकीय क्षेत्राचा देखील समावेश होतो. म्हणूनच त्याला चतु:क्षेत्रीय प्रतिमान (Four Sector Model) असेही म्हणतात.

**व्याख्या :-**

"जेव्हा उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहामध्ये स्वदेशातील आर्थिक व्यवहारांबरोबरच विदेशी / परकीय देशाबरोबर होणाऱ्या आयात व निर्यातीचा समावेश होतो. तेव्हा त्याला खुल्या (मुक्त) अर्तव्यवस्थेतील चतु:क्षेत्रिय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतत."

चतु:क्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक १.३**
**चतु : क्षेत्रीय खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

**चतु:क्षेत्रीय प्रतिमानामध्ये प्रामुख्याने पुढील चार क्षेत्रांचा समावेश होतो.**

**अ) कुटुंबसंस्था आणि परकीय क्षेत्र :-**

कुटुंबसंस्थाकडून परकीय क्षेत्राकडे श्रमीक व भांडवलाची निर्यात केली जाते व परकीयांकडून कुटुंबसंस्थांना त्याचा मोबदला मिळून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. परंतू त्याचवेळी कुटुंबसंस्था परकीयांकडून वस्तू - सेवांची जी आयात करतात त्यांच्या मोबदल्याच्या रुपाने पुन्हा राष्ट्रीय उत्पन्नात घट घडून येते.

**ब) उदयोगसंस्था आणि परकीय क्षेत्र :-**

स्वदेशातील उदयोगसंस्थांमार्फत उत्पादीक वस्तू - सेवांची विदेशात निर्यात केली जाते. त्यांच्या मोबदल्यात विदेशी चलनाची प्राप्ती होते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

त्याचवेळी स्वदेशी उत्पादन संस्था विदेशी वस्तू सेवांची आयात करतात या आयातीचे देणे फेडावे लागल्याने राष्ट्रीय उत्पन्नात घट घडून येते.

**क) शासकसंस्था आणि परकीय क्षेत्र :-**

शासनाची एकूण निर्यात जर आयातीपेक्षा जास्त असेल तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढवा निर्माण होतो. उलट जर सरकारची एकूण आयात जास्त असेल तर राष्ट्रीय उत्पन्नात घट दिसून येते.

**ड) परकीय क्षेत्र :-**

चतु:क्षेत्रीय प्रतिमानात उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहासाठी परकीय क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. वरील ३ क्षेत्रांशी आयात निर्यातीद्वारे परकीय क्षेत्राचा संबंध येऊन उत्पन्नाचा प्रवाह चक्राकार स्वरुपात फिरत राहतो.

## १.५ व्यापारचक्रे (Trade Cycles)

समग्र अर्थशास्त्रातील व्यापारचक्र ही एक महत्वाची संकल्पना असून अर्थव्यवस्थेत होणाऱ्या आर्थिक चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात. अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या काही गतिमान शक्ती वेगवेगळ्या प्रकारचे आर्थिक चढ-उतार निर्माण करतात. त्यांच्या वैशिष्टयांनुसार त्यांचे वेगवेगळया प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. अशा चक्रीय चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात.

व्यापारचक्रे ही संकल्पना समजण्यासाठी पुढील व्याख्यांचा विचार करता येईल.

**व्याख्या :-**

**१) प्रा. हॅबरलर :-**

"व्यापारचक्र म्हणजेच उत्तम किंवा वाईट व्यापाराची, तेजी किंवा मंदीच्या कालावधीतील स्थित्यंतरे (बदल) होय."

**२) मिचेल :-**

"एकूण आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात."

**३) प्रा. बेनहॅम :-**

"व्यापारचक्र वैभव व भरभराटीचा असा एक कालावधी आहे की त्यानंतर मंदीचे आगमन स्वाभाविक असते."

**४) प्रा. जे. एम्.केन्स :-**

"व्यापारचक्रे म्हणजेच उच्च व्यापाराच्या परिस्थितीत दिसून येणारी वाढत्या किमती व बेकारीची स्थित्यंतरे आणि अल्प व्यापारातील घटत्या किंमती व उच्च बेकारीतील स्थित्यंतरे होय."

## १.६ व्यापारचक्रांची वैशिष्टये

व्यापारचक्रांच्या वरील विविध व्याख्यांद्वारे त्यांची वैशिष्टये किंवा गुणधर्म पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) चक्रीय बदल :-**

व्यापारचक्रांचे परिणाम हे चक्रीय स्वरुपाचे असतात. तेजी नंतर मंदी व मंदीनंतर पुन्हा तेजीची परिस्थिती निर्माण होत असते. परंतू अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांवर कमी अधिक प्रमाणात त्यांचा परिणाम होत असतो.

**२) निश्चित कालावधी :-**

व्यापारचक्रे ही एका विशिष्ट कालावधीशी संबंधीत असतात कारण तेजी आणि मंदीचे चक्र हे विशिष्ट कालावधीत पूर्ण होत असते. तेजी किंवा मंदी ही चिरकाळ टीकणारी नसते.

**३) व्यापारचक्रे लाटांप्रमाणे असतात :-**

समुद्रातील भरती - ओहोटी प्रमाणे अर्थव्यवस्थेत देखिल तेजी आणि मंदीचे चक्र सुरु असते. ज्याप्रमाणे भरतीनंतर आहोटी येते तसेच तेजीनंतर मंदी ठरलेली असते.

**४) व्यापारचक्रांची बदल सारखेच नसतात :-**

तेजी - मंदीमूळे घडून येणारे बदल सर्वत्र सारखेच दीसून येत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांवर ते वेगवेगळया प्रमाणात दीसून येतात. व्यापार चक्रांच्या अवस्थांमध्ये भांडवली वस्तूंच्या क्षेत्रात घडून येणारे बदल उपभोग्य वस्तूंच्या उदयोगांच्या क्षेत्रातील बदलांपेक्षा जास्त प्रमाणात घडून येतात.

### ५) अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण घटना :-

व्यापारचक्र ही अर्थव्यवस्थेत घडून येणारी एक सर्वसामान्य घटना असते. योग्य उपायांद्वारे त्यांचे नियमन करता येते.

### ६) व्यापार चक्रांचे चढ-उतार समान नसतात :-

व्यापारचक्रांमधील चढ-उतार हे समान दीसून येत नाही तर तेजी व मंदीमधील चढ उतार हे वेगवेगळे असू शकतात. तेजीतून मंदीकडे जाण्यासाठी लागणारा कालावधी मंद असतो. याउलट अर्थव्यवस्था मंदीतून तेजीकडे लवकर मार्गक्रमण करते.

### ७) सर्व समावेशक :-

तेजी आणि मंदी ही सर्वसमावेशक असतात. म्हणजेच ती देशाच्या सर्वच भागात अस्तित्वात असते.

### ८) व्यापारचक्रे आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे असतात :-

तेजी - मंदीची चक्रे ही साथीच्या रोगाप्रमाणे एका देशातून इतर देशांमध्ये पसरतात.

### ९) व्यापारचक्रांची तीव्रता सारखी नसते :-

वर्तमानकालीन व भूतकालीन व्यापारचक्रे ही कालवधीच्या दृष्टीने समान नसतात. तसेच व्यापारचक्रांची तीव्रता ही सर्वत्र, सर्वकाळ समान नसते.

### १०) व्यापारचक्रांचे वेगवेगळे टप्पे (अवस्था) असतात :-

व्यापार चक्रांचे तेजी, घसरण, मंदी व पुनरुज्जीवन या अवस्था क्रमाने दीसून येतात.

## १.७ व्यापार चक्रांच्या अवस्था (Phase of Trade Cycles)

'Measuring Business Cycles' या ग्रंथात प्रा. मिचेल यांनी व्यापारचक्रांच्या पुढील चार प्रमुख अवस्था सांगितल्या आहेत.

१) तेजी (Prosperity)

२) घसरण (Recession)

३) मंदी (Depression)

४) पुनरुज्जीवन (Recovery)

व्यापार चक्रांच्या या वरील अवस्था पुढील आकृतीद्वारे समजून घेता येतील.




**आकृती क्रमांक १.४**

आकृतीमध्ये OX अक्षावर कालावधी तर OY अक्षावर आर्थिक उलाढाल दर्शविलेली आहे. आकृतीतील लाटांप्रमाणे भासणारा भाग हा असे दर्शवितो की तेजी नंतर अर्थव्यवस्थेत घसरणीला सुरुवात होते व अर्थव्यवस्था मंदीत पोहोचते. कालांतराने आर्थिक उलाढालींचा वेग वाढून मंदी संपून पुनरुज्जीन व तेजीकडे वाटचाल सूरु होते.

व्यापारचक्रांच्या वरील चार अवस्था पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

## १) तेजी :- (Prosperity)

तेजीच्या अवस्थेलाच भरभराटीची अवस्था असेही म्हणतात. तेजीच्या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील आर्थिक घडामोडींचा वेग वाढलेला असतो. उत्पादन, उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक, नफा, किंमत इ. मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दीसून येते. लोकांच्या उत्पन्नाता वाढ घडून येते. त्यातून लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो, लोकांची विविध वस्तू-सेवांसाठीची मागणी वाढते. या वाढलेल्या मागणीच्या पुर्ततेसाठी उत्पादनात वाढ घडवून आणावी लागते. त्यासाठी गुंतवणूक वाढवावी लागते. त्यातून कर्जासाठी मागणी वाढते. त्यातून बँका व वित्तीय संस्थांची भरभराट होते. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होतो. तेजीच्या या अवस्थेत उत्पादन क्षमतेचा पुरेपुर वापर होतो.

परंतू तेजीची ही अवस्था दीर्घकाळ टिकणारी नसते तेजीच्या अतिरेकातूनच पुढे घसरणीच्या अवस्थेला प्रारंभ होतो.

## २) घसरण :- (Recession)

व्यापारचक्रांच्या या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील उत्पादन, उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक, मागणी इ. चल घटकांमध्ये घसरण होण्यास सुरुवात होते. मागणीत घट घडून आल्याने उत्पादन प्रक्रियेचा वेग मंदावतो त्यातून रोजगारीचे प्रमाण घटून बेकारी वाढू लागते. त्यातून लोकांचे उत्पन्न कमी राहून मागणीत घट घडून येते. मागणीच्या अभावामुळे गुंतवणूकीत घट घडून येते परिणामतः व्याजदर घटून वस्तूंच्या किंमती कमी होऊ

लागतात. त्यातून अल्प नफ्याची समस्या निर्माण होते. व अर्थव्यवस्था मंदीच्या दीशेने वाटचाल करु लागते.

### ३) मंदी :- (Depression)

या अवस्थेत उत्पादन, उत्पन्न, रोजगर, बचत, गुंतवणूक, व्याजदर इ. चल घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. वस्तूंच्या किंमती मोठ्या प्रमाणात घटू लागतात. घसरणीच्या वरील अवस्थेत कमी होत चाललेला नफा मंदीच्या अवस्थेत ऋण होऊ लागतो. परिणामतः तोट्यातील उदयोगधंदे बंद पडू लागतात या अवस्थेत अर्थव्यवस्था कुंठीतावस्थेत आलेली असते. परंतू ही अवस्थादेखिल कायमस्वरुपी नसते. मंदीच्या अवस्थेत पुन्हा आशादायी वातावरण निर्माण होऊन अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनाच्या अवस्थेकडे वाटचाल करु लागते.

### ४) पुनरुज्जीवन :- (Recovery)

ही व्यापारचक्रांची शेवटची अवस्था आहे. या अवस्थेत अर्थव्यवस्था मंदीतून पुन्हा तेजीकडे वाटचाल करु लागते. वस्तूंच्या मागणीत वाढ होऊ लागल्याने उत्पादन, रोजगार, उत्पन्न, बचत, गुंतवणूक, उपभोग, किंमती, व्याजदर तसेच नफा वाढून अर्थव्यवस्था गतीमान होऊन पुन्हा तेजीच्या अवस्थेत प्रवेश करते.

## १.८ प्रश्न

**प्रश्न १ संकल्पना स्पष्ट करा.**

१) सुक्ष्म आणि समग्रलक्ष्मी अर्थशास्त्र.

२) व्यापारचक्रे.

३) तेजी.

४) मंदी.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहाचे द्विक्षेत्रीय प्रतिमान स्पष्ट करा.

ब) त्रिक्षेत्रीय परिस्थितीत उत्पन्नाचा प्रवाह कसा प्रवाहीत होतो ते स्पष्ट करा.

क) मुक्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा प्रवाह ही संकल्पना स्पष्ट करा.

ड) व्यापारचक्र म्हणजे काय? व्यापारचक्रांची वैशिष्टे स्पष्ट करा.

इ) व्यापारचक्रांच्या विविध अवस्था लिहा.

❖❖❖❖

# २

# केन्सचा उत्पन्न निर्धारणाचा सिध्दांत

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये
२.१ प्रस्तावना
२.२ समग्र मागणी
२.३ केन्सचा उत्पन्न निर्धारणाचा सिध्दांत
२.४ गुणक संकल्पना
२.५ प्रवेग तत्व
२.६ महागुणक
२.७ प्रश्न

## २.० उद्दिष्टये

- समग्र मागणी व समग्र पुरवठा या संकल्पना अभ्यासणे.
- केन्सचा रोजगार व उत्पन्नविषयक सिध्दांत समजून घेणे.
- गुणक संकल्पना जाणून घेणे.
- प्रवेग तत्व अभ्यासणे.
- महागुणकाची कार्यप्रणाली समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना

१९३० च्या जागतिक महामंदीने सनातनवादी आर्थिक सिध्दांतांना मोठा धक्का दिला. महामंदीतून निर्माण झालेल्या बेकारीवर उपाययोजना म्हणून रोजगारविषयक नवीन सिध्दांतांना चालना मिळाली. या अनुषंगाने रोजगार आणि उत्पन्न विषयक सनातनी आणि आधुनिक सिध्दांताचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

सनातनी अर्थतज्ञांच्या मते अर्थव्यवस्थेत नेहमीच पूर्ण रोजगाराची परिस्थिती दिसून येते व याच स्थितीमध्ये प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करित असल्याने अतिरिक्त उत्पादन शिल्लक राहत नाही व बेरोजगारी निर्माण न होता पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो. हा सिध्दांत प्रा. जे बी. से. या सनातनवादी अर्थतज्ञाने मांडला. सेच्या मते किंमती, वेतनदर

लवचिक असल्याने अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण होते. से चा हा नियम बाजारपेठेचा नियम या नावाने आोळखला जातो.

परंतू १९३० च्या महामंदीनंतर सनातनवादी सिध्दांतांना धक्का लागून अर्थव्यवस्थेच्या संदर्भात वेतन व रोजगारासंभंधीच्या नवीन सिध्दांतांना चालना मिळाली. या कार्यात लॉर्ड केन्स या आधूनिक अर्थतज्ञाच्या योगदान अनन्यसाधारण मानले जाते.

## २.२ समग्र (एकूण) मागणी (Agreegate Demand)

लॉर्ड केन्स यांनी १९३६ मध्ये आपल्या 'General Theory of Employment, Interest & Money - या ग्रंथात एकूण रोजगार, व्याजदर आणि मुद्राविषयक सिध्दांतांची मांडणी केली. लॉर्ड केन्सच्या मते अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार कधीच दिसून येत नाही तर अर्थव्यवस्था अपूर्ण रोजगाराच्या परिस्थितीत दिसून येते. लार्ड केन्स यांच्या रोजगारविषयक सिध्दांतामधील सर्वात महत्वाची संकल्पना म्हणजेच **"परिणामकारक मागणी"** होय.

केन्सच्या मते अर्थव्यवस्थेतील उत्पन्न व उत्पादनाची पातळी ही रोजगाराच्या पातळीवर अवलंबून असते आणि रोजगार पातळी ही परिणामकारक (प्रभावी) मागणीवर अवलंबून असते. केन्सच्या मते अर्थव्यवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे बेरोजगारी निर्माण होते. म्हणूनच बेरोजगारी दुर करण्यासाठी प्रभावी मागणीत वाढ करणे हा महत्वाचा उपाय आहे.

**प्रभावी मागणी म्हणजे काय?**

'सर्व समाजाची सर्व वस्तू आणि सेवांना असणारी एकूण मागणी म्हणजे प्रभावी मागणी होय?'

अर्थव्यवस्थेतील ही प्रभावी मागणी पुढील दोन घटकांवर अवलंबून असते.

अ) एकूण मागणी फलन Agreegate Demand Function.

ब) एकूण पुरवठा फलन Agreegate Supply Function.

### अ) एकूण मागणी फलन :-

अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या विविध पातळ्यांना होणारे उत्पादन विकून सर्व उत्पादन विकून सर्व उत्पादन जेवढे महत्तम उत्पन्न विक्रीपासून अपेक्षित असते ते दर्शविणारा तक्ता म्हणजेच समग्र (एकूण) मागणी फलन होय. अर्थव्यवस्थेत रोजगार पातळी जसजशी वाढते तसतशी एकूण मागणी किंमतसुध्दा वाढत जाते. याउलट रोजगार पातळी जसजशी कमी होत जाते. तसतशी एकूण मागणी किंमत सुध्दा कमी होते. म्हणजेच एकूण मागणी किंमत व एकूण रोजगार पातळी यामध्ये परस्पर धनात्मक संबंध दिसून येतो. पूढील आकृतिद्वारे हे स्पष्ट करता येईल.




आकृती क्रमांक २.१

## ब) एकूण (समग्र) पुरवठा फलन :-

रोजगार आणि उत्पादनाच्या ज्या पातळीला सर्व उदयोजकांना आवश्यक असणारी कमीत कमी विक्री उत्पन्नाची रक्कम म्हणजे एकूण पुरवठा किंमत होणाऱ्या किंमतीवरुनच एकूण पुरवठा फलन तयार करता येते.

'अर्थव्यवस्थेस रोजगाराच्या विविध पातळयांना होणारे उत्पादन विकून सर्व उत्पादकास जेवढे कमीत कमी उत्पन्न अपेक्षित असते तसे दर्शविणारा तक्ता म्हणजेच एकूण पुरवठा फलन होय.'

एकूण पुरवठा फल पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




आकृती क्रमांक २.२

## २.३ केन्सचा उत्पन्न निर्धारणाचा सिध्दांत

समग्रलक्षी अर्थशास्त्रात उपभोग, गुंतवणूक, रोजगार इ. च्या निश्चितीसाठी उत्पन्नविषयक सिध्दांत अत्यंत महत्वाचे मानले जातात. समग्र अर्थशास्त्रातील उत्पन्नविषयक सिध्दांताची मांडणी सनातनी अर्थतंज्ञांनी केली. उत्पन्नाच्या सनातनी सिध्दांताचे श्रेय प्रा. जे. बी. से या अर्थतज्ञांकडे जाते. परंतू या सिध्दांतील उणीवा दुर करुन लॉड केन्स यांनी उत्पन्न निर्धारणाचा स्वतंत्र सिध्दांत मांडला. लॉर्ड केन्सचा उत्पन्नविषयक सिध्दांत समजण्यासाठी उत्पन्नविषयाक जे. बी. से यांचा सनातनी सिध्दांत विचारात होणे आवश्यक ठरते.

**उत्पन्नविषयक सनातनी सिध्दांत. (जे. बी. से चा सिध्दांत)**

जॉन बाप्टीसा से (John Baptista Say) या फ्रेंच अर्थतज्ञाने आपल्या Traited Economic Politique या ग्रंथात १८०३ मध्ये उत्पन्न विषयक सिध्दांत मांडला त्यालाच 'से चा बाजारपेठेचा नियम' असेही म्हटले जाते.

जे. बी. से यांनी उत्पन्न व रोजगारविषयक स्थितीची मांडणी करतांना आपला सिध्दांत पुढील शब्दात व्यक्त केला. 'प्रत्येक पुरवठा आपली स्वतःची मागणी निर्माण करतो.' (Every Supply Creates its own demand). से यांच्या मते मुक्त भांडवली अर्थव्यवस्थेत विशिष्ठ कालखंडात जेवढया वस्तू आणि सेवा निर्माण होतात. त्या सर्व वस्तू व सेवांना मागणी निर्माण होते. त्यामुळे अशा अर्थव्यवस्थांमध्ये मागणी आणि पुरवठयामध्ये आपोआप संतूलन निर्माण होते. त्यामुळे मुक्त भांडवलशाही देशांमध्ये जोपर्यंत प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करीत असल्याने अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होत नाही. तसेच से यांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत लवचिक व्याजदराच्या धोरणामूळे बचत व गुंतवणूक यामध्ये समानता प्रस्थापित होऊन अर्थव्यवस्थेचे कार्य स्वयंचलित पध्दतीने चालते. जे. बी. से यांना अशा अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप अपेक्षित नव्हता.

**केन्सचा उत्पन्नाविषयक सिध्दांत :-**

१९२९ च्या जागतिक महामंदीने से चा सिध्दांत खोटा ठरविला. याच काळात लॉर्ड केन्स यांनी जे. बी. से च्या सिध्दांतातील उणीवा सिध्द करुन स्वतःचा सिध्दांत मांडला. जे. बी. से च्या मते अर्थव्यवस्थेत बचत व गुंतवणूक समान राहते. परंतू केन्सच्या मते बचत व गुंतवणूकीत समानता प्रस्थापित होऊ शकत नाही कारण अर्थव्यवस्थेत समानता प्रस्थापित होऊ शकत नाही. कारण अर्थव्यवस्थेत बचत करणारा व गुंतवणूक करणारा वर्ग हा भिन्न भिन्न असतो. तसेच बचत व गुंतवणूकीचे उद्देश देखिल भिन्न-भिन्न असतात.

से च्या सिध्दांतातील प्रमुख दोष म्हणजेच मागणी व पुरवठ्यात समानता प्रस्थापित होण्यात अनेक अडचणी येत असतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या घटकांना मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च न केल्याने अतिरीक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत समतोल प्रस्थापित होतांना अडथळे निर्माण होत असतात.

लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स यांनी १९३६ मध्ये The General Theory of Employment, Interest and Money या ग्रंथात असे स्पष्ट केले की जे. बी. से यांचा सनातनी सिध्दांत एकूण उत्पादन, एकूण उत्पन्न, एकूण रोजगार याविषयी समाधानकारक स्पष्टीकरण देत नाही. केन्सच्या मते पूर्ण रोजगार ही अवास्तव संकल्पना असून अर्थव्यवस्था अपूर्ण रोजगारीच्या परिस्थितीमध्येच असते. केन्सने आपल्या विश्लेषणात ज्या संकल्पना मांडल्या त्यामध्ये उपभोग प्रवृत्ती, गुणक, भांडवलाची सीमांत कार्यक्षमता, प्रभावी मागणी इ. संकल्पना नव्याने समाविष्ट केल्या.

केन्सच्या मते अर्थव्यवस्थेतील उत्पन्न आणि उत्पादनाची पातळी ही रोजगाराच्या पातळीवर अवलंबून असते आणि रोजगार पातळी ही प्रभावी मागणीवर अवलंबून असते. केन्सच्या मते अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचे महत्वाचे कारण म्हणजे प्रभावी मागणीची कमतरता होय.

लॉर्ड केन्सच्या उत्पन्नविषयक सिध्दांताची प्रमुख वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) अर्थव्यवस्थेतील उत्पन्न पातळी ही देशातील रोजगार पातळीवर अवलंबून असते.

२) उत्पन्न व रोजगार स्थितीचा अभ्यास करण्यासाठी अल्पकाळाचा विचार केलेला आहे.

३) देशात उत्पन्न पातळी आणि रोजगार पातळी एकाच दिशेने बदलते.

४) देशातील रोजगार पातळी निश्चित होण्यात कुटुंबसंस्था व उत्पादन संस्था या दोन क्षेत्रांचा वाटा महत्वाचा असतो.

५) प्रभावी मागणी हा अर्थव्यवस्थेतील उत्पन्न व रोजगार निर्धारणातील महत्वाचा घटक असतो.

६) प्रभावी मागणी ही एकूण मागणी फलन आणि एकूण पुरवठा फलन या दोन घटकांवर अवलंबून असते.

७) अर्थव्यवस्थेतील उत्पन्न व रोजगाराचे निर्धारण त्याच बिंदूला होते. ज्या बिंदूमध्ये एकूण मागणी वक्र व एकूण पुरवठा वक्र परस्परांना छेदतात.

८) जेव्हा प्रभावी मागणी वाढते. त्यावेळी रोजगारातसुध्दा वाढ होते.

९) केन्सच्या मते पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त होऊ शकतो. प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे अतिरीक्त उत्पन्न आणि बेरोजगारीची स्थिती निर्माण होऊ शकते.

१०) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वास्तविक समतोल हा अपूर्ण रोजगाराच्या परिस्थितीला प्रस्थापित होतो.

## २.४ गुणक संकल्पना (Multiplier)

आर्थिक विश्लेषणाचे एक साधन तसेच आर्थिक धोरणाचा मार्गदर्शक म्हणून गुणकाला फार महत्वाचे स्थान आहे. गुणकाची संकल्पना अर्थशास्त्रात सर्वप्रथम आर. एफ. कान्ह यांनी सन १९३१ मध्ये Economic Journal या मासिकात आपल्या 'The Relation of Home Investment to Unemployment' या लेखाद्वारे मांडली. कान्ह यांनी मांडलेल्या गुणकाची संकल्पना 'रोजगार गुणक' या अनुषंगाने वापरली ही संकल्पना केन्स यांनी 'गुंतवणूक गुणक' या नावाने विकसित केली.

**गुणकाची व्याख्या :-**

"सुरुवातीस केलेल्या गुंतवणूकीमूळे अर्थव्यवस्थेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीच्या प्रमाणास गुणक असे म्हणतात."

"अर्थव्यवस्थेत सुरुवातीस केलेल्या गुंतवणूकीमुळे एकूण रोजगारात होणाऱ्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वाढीस 'गुणक' असे म्हणतात."

म्हणजेच गुंतवणूकीतील वाढ व राष्ट्रीय उत्पन्नतील वाढ यांच्यातील संख्यात्मक संबंध गुणकाद्वारे स्पष्ट होतो. केन्स यांनी गुणकाची संकल्पना सुत्ररुपाने पुढील प्रमाणे मांडली आहे.

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

वरील सुत्रात ;

K = गुणक

$\Delta Y$ = उत्पन्नातील बदल.

$\Delta I$ = गुंतवणूकीतील बदल.

**गुणकाचे स्पष्टीकरण :-**

लॉर्ड केन्स यांच्या मते गुणकाची संकल्पना ही सीमांत उपभोग प्रवृत्तीवर आधारीत असतो. राष्ट्रीय उत्पन्नातील बदलांचे उपभोगातील बदलाशी असलेले प्रमाण म्हणजेच सीमांत उपभोग प्रवृत्ती होय. व्यक्तीच्या उत्पन्ना पैकी सर्व भाग हा उपभोगावर खर्च केला जात नाही. म्हणजेच व्यक्तीचा उत्पन्नातील बदलापेक्षा उपभोगात होणारा बदल कमी असतो. म्हणजेच व्यक्तीचे उत्पन्न १०० रु. नी वाढले तर उपभोगात होणारी वाढ ही ५० रु. ने केली जाते.

समजा वरील उदा. प्रमाणे समाजाची उपभोग प्रवृत्ती (१/२) इतकी आहे तर या परिस्थितीत देशाची गुंतवणूक वाढ व उत्पन्नातील वाढीचा सहसंबंध गुणक प्रक्रियेद्वारे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**गुणकाची प्रक्रिया**

| गुणक कालावधी | प्रारंभीची गुंतवणूक | सीमांत उपभोग प्रवृत्ती - (१/२) | एकूण उत्पन्नातील वाढ |
|---|---|---|---|
| ० | १०० कोटी रु. | - | १०० कोटी रु. |
| १ | १०० कोटी रु. | ५० कोटी रु. | ५० कोटी रु. |
| २ | ५० कोटी रु. | २५ कोटी रु. | २५ कोटी रु. |
| ३ | २५ कोटी रु. | १२.५ कोटी रु. | १२.५ कोटी रु. |
| ४ | १२.५ कोटी रु. | ६.२५ कोटी रु. | ६.२५ कोटी रु. |
| ५ | ६.२५ कोटी रु. | ३.१२५ कोटी रु. | ३.१२५ कोटी रु. |
| - | - | १०० कोटी रु. | २०० कोटी रु. |

वरील तक्त्यामध्ये गुणक कसा कार्य करतो हे स्पष्ट करण्यासाठी काल्पनिक तक्त्याचा आधार घेतला आहे. समजा अर्थव्यवस्थेत प्रारंभिच्या गुंतवणूकीच्या स्वरुपात १०० कोटी रु. इतकी गुंतवणूक केलेली असेल तर त्यामुळे उत्पन्न १०० कोटी रु. इतका वाढेल.

जर सीमांत उपभोग प्रवृत्ती १/२ इतकी असेल तर पहिल्या कालावधीत १०० कोटी रु. च्या १/२ म्हणजेच सीमांत उपभोग प्रवृत्ती ५० कोटी रु. राहील. त्यामुळे उत्पन्नातील वाढ ५० कोटी रु. वाढेल. ५० कोटी रु. उत्पन्नाच्या १/२ सीमांत उपभोग प्रवृत्ती म्हणजे २५ कोटी रु. अशा पध्दतीने ५ व्या कालखंडापर्यंत ६.२५ कोटी रुपयांनी वाढ होते तर उपभोग प्रवृत्ती ३.१२५ कोटी व उत्पन्न पातळी ३.१२५ कोटीने वाढेल.

अशा प्रकारे गुणकाची प्रक्रीया प्रारंभिच्या अवस्थेत १०० कोटी रु. गुंतवणूकीमूळे अंतिम कालावधी पर्यंत उत्पन्नात २०० कोटी वाढ होईल. तर सीमांत उपभोग प्रवृत्ती १०० कोटी इतकी राहील. म्हणजेच गुणकाचे मूल्य दुप्पट राहील.

गुणकाची प्रवृत्ती पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक २.३**

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर राष्ट्रीय उत्पन्न (Y) व OY अक्षावर गुंतवणूक (I) आणि उपभोग (C) यातील वाढ दर्शविलेली आहे.

ON ही बचत रेषा असून ती उत्पन्न आणि उपभोगातील समानता दर्शविते. C + I हा एकूण उपभोग वक्र असून ती ON या वक्रास E या बिंदूत छेदतो. या बिंदूला एकूण राष्ट्रीय उत्पन्न पातळी OY अशी निश्चित होते.

समजा अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीत वाढ होणार असेल तर C + I हा वक्र वरच्या दीशेने $C+I_1$ असा स्थलांतरीन घेईल. त्यामुळे गुंतवणकीत होणारी वाढ $(\Delta I)\,AE$ अशी दर्शविण्यात आलेली आहे. ON हा बचत वक्र व नवीन उपभोग वक्र $C+I_1$

परस्परांना $E_1$ बिंदूत छेदत असल्याने नवीन उत्पन्न पातळी वाढून $OY_1$ अशी राहील. $(\Delta Y)$

वरील आकृतीवरुन असे स्पष्ट होते की प्रारंभिच्या गुंतवणकीतील वाढीपेक्षा $(\Delta I)$ उत्पन्नात होणारी वाढ $(\Delta Y)$ दुप्पट आहे. कारण AH पेक्षा $YY_1$ हे अंतर दुप्पट आहे.

**गुणक सिध्दांताची गृहीते :-**

१) अर्थव्यवस्था बंदिस्त स्वरुपाची आहे.

२) सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) स्थिर आहे.

३) अपूर्ण रोजगार परिस्थिती.

४) गुंतवणूक स्वायत्त असते.

५) गुणक कार्यन्वित असतांना मौद्रीक आणि राजकोषिय धोरण स्थिर असते.

६) उत्पादनवाढीचा उपभोग खर्चावर त्वरीत परिणाम होतो.

**गुणकाचे महत्व :-**

गुणक संकल्पना अर्थशास्त्रात अत्यंत महत्वाची मानली जाते. गुणकाचे महत्व पुढील मुद्दयांद्वारे स्पष्ट होईल.

१) देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी सरकारी गुंतवणूकीत वाढ घडवून आणणे आवश्यक ठरते.

२) देशातील बेरोजगारी, मंदी, अल्प उत्पन्न यासारख्या समस्या सोडविण्यासाठी गुणकाचा वापर प्रभावीपणे करणे आवश्यक ठरते.

३) देशातील सरकारला गुंतवणूक धोरण आखण्यासाठी गुंणक संकल्पना उपयोगी ठरते.

४) देशात रोजगार निर्मीतीसाठी गुणक संकल्पनेचा प्रभावीपणे वापर करता येईल.

५) केन्स यांच्या रोजगाराच्या व उत्पन्नाच्या सिध्दांता मध्ये अर्थव्यवस्थेतील परीणामकारक मागणीला अनन्य साधरण महत्व देण्यात आलेले आहे. प्रभावी मागणीतील वाढीमूळे अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊन रोजगार, उत्पादन, उत्पन्न, बचत, गुंतवणूकीत वाढ घडून येते. अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीत वाढ घडवून आणायची असेल तर गुणक ही संकल्पना उपयोगी ठरते.

६) गुंतवणूकीतील बदलाचा एकूण उत्पन्नावर होणारा परिणाम गुणकद्वारे मोजता येतो.

## २.५ प्रवेग तत्व (Acceleration Principle)

फ्रेंच अर्थतज्ञ अफ्तालिओ यांनी प्रवेग संकल्पना सर्वात प्रथम मांडली. पुढे जे. एम. क्लार्क, सॅम्यूअलसन, रॉबर्टसन, पिगू, जे. आर. हिक्स इ. अर्थतज्ञांनी या संकल्पनेला विकास केला. प्रवेगतत्वाद्वारे उपभोग्य वस्तूंची मागणी आणि भांडवली वस्तूंची मागणी

यामधील फलनात्मक संबंध स्पष्ट करता येतो. उपभोगाचा गुंतवणूकीवर होणारा परिणाम म्हणजेच प्रवेग तत्व होय.

**व्याख्या :-**

"उपभोग खर्चातील निव्वळ बदल $(\Delta C)$ आणि त्यामुळे गुंतवणूकीत होणारा निव्वळ बदल $(\Delta I)$ हयांचे गुणोत्तर म्हणजे प्रवेग होय."

**सुत्र रुपाने :-**

$$\text{प्रवेग} = \frac{\text{गुंतवणूक खर्चातील बदल}}{\text{उपभोग खर्चातील बदल}}$$

$$\boxed{a = \frac{\Delta I}{\Delta C}}$$

म्हणजेच समजा उपभोग खर्चातील बदल २ असेल आणि त्यामुळे गुंतवणूकीत होणार बदल १० असेल तर प्रवेग हा $\frac{10}{2} = 5$ इतका असेल.

**प्रवेग तत्वाचे स्पष्टीकरण :-**

समजा एखाद्या समजातील लोकांची १०,००० उपभोग्य वस्तूंची मागणी पूर्ण करण्यासाठी दरवर्षी १०० यंत्रांचा वापर केला जातो. म्हणजेच सरासरी १ यंत्र १०० वस्तूंची मागणी पूर्ण करु शकते. अशा यंत्राची किंमत १० लाख रु. असेल आणि यंत्राचे आयुष्य १० वर्ष असेल तर त्या देशाला दरवर्षा १० यंत्रांचा पुनर्स्थापिन खर्चाची (Replacement Cost) तरतूद करावी लागेल. कारण १० वर्षांनंतर हे सर्व यंत्रे नादुरुस्त होतील. या हेतूनेच दरवर्षी यंत्राच्या मूल्याच्या १०% रक्कम बाजूला काढून ठेवावी लागेल. अशा स्थितीत समजा समाजाची उपभोग्य वस्तूंची मागणी १०% वाढत गेली तर गुंतवणूकीतील बदल किती राहील हे पुढी तक्त्याद्वारे स्पष्ट करता येईल.

**प्रवेग तत्वाची कार्यवाही**

| कालखंड | उत्पादनाची मागणी | अपेक्षित भांडवल | पुनर्स्थापन खर्च | एकूण गुंतवणूक |
|---|---|---|---|---|
| T | १०,००० | १० कोटी रु. | - | १० कोटी रु. |
| T + १ | ११,००० | ११ कोटी रु. | १.१० कोटी रु. | ११.१० कोटी रु. |
| T + २ | १२,००० | १२ कोटी रु. | १.२० कोटी रु. | १२.३० कोटी रु. |
| T + ३ | १३,००० | १३ कोटी रु. | १.३० कोटी रु. | १३.६० कोटी रु. |
| T + ४ | १४,००० | १४ कोटी रु. | १.४० कोटी रु. | १५.०० कोटी रु. |
| T + ५ | १५,००० | १५ कोटी रु. | १.५० कोटी रु. | १६.५० कोटी रु. |
| T + ६ | १६,००० | १६ कोटी रु. | १.६० कोटी रु. | १८.१० कोटी रु. |
| T + ७ | १७,००० | १७ कोटी रु. | १.७० कोटी रु. | १९.८० कोटी रु. |
| T + ८ | १८,००० | १८ कोटी रु. | १.८० कोटी रु. | २१.६० कोटी रु. |
| T + ९ | १९,००० | १९ कोटी रु. | १.९० कोटी रु. | २३.५० कोटी रु. |

प्रवेगाचा दर १०० गृहीत धरल्यास दरवर्षी १०० यंत्र १०,००० वस्तूंचे उत्पादन घेतात. म्हणजेच एका यंत्राचे उत्पादन १०० वस्तू इतके आहे. दर १० वर्षांनी या यंत्रांची पुनस्थापना करायाची असल्याने यंत्राची किंमत $\frac{\text{१० लाख}}{\text{१०}}$ =१ लाख रुपये दरवर्षी पुनर्स्थापना खर्च म्हणून बाजूस काढून ठेवावी लागेल. म्हणजेच १० यंत्रासाठी १० कोटी रु. खर्च अपेक्षित धरल्यास दरवर्षी १ कोटी र. इतका पुनस्थापन खर्च राहिल.

समजा उपभोग्य वस्तूंची मागणीतील प्रतीवर्ष वाढ १०% गृहीत धरल्यास असे दिसून येते की T + 1 या कालखंडातून गुंतवणूकीत वाढ होतांना दिसून येते. म्हणजेच १० वर्षाच्या काळात यंत्रांच्या अपेक्षित भांडवल गुंतवणूकीत १० कोटी रु. वरुन १९ कोटी रु. तर एकूण गुंतवणूकीत १० कोटी रु. वरुन २३.५० कोटी रु. पर्यंत वाढ होईल.

**प्रवेग तत्वाची गृहीते :-**

१) भांडवली वस्तूंचे आयुष्य ज्ञात आहे.

२) स्थिर भांडवल उत्पादन गृहीत आहे.

३) भांडवली वस्तूंच्या निर्मिती क्षेत्रात जास्तीची क्षमता उपलब्ध असते.

४) उत्पादनातील वाढीमूळे निव्वळ गुंतवणूकीत त्वरीत वाढ घडून येते.

५) भांडवल पुरवठा लवचिक आहे.

६) मागणीत घडून येणारी वाढ कायम आहे.

७) उपभोग्य वस्तूच्या उत्पादन क्षेत्रात अधिक क्षमता उपलब्ध नसते.

**प्रवेग तत्वाचे महत्व :-**

प्रवेग तत्व व्यापार चक्राची तेजीकडून मंदीकडे बदलणारी अवस्था आणि अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन वाढ याचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्रवेगतत्व उपयुक्त ठरते. उपभोगातील बदलाचा गुंतवणूकीवर होणारा बदल प्रवेगतत्वाच्या आधारे स्पष्ट करता येतो. म्हणजेच भांडवल गुंतवणूकीवर परिणाम करणारे इतर अनेक घटक असतात. तरीही उपभोग या स्वतंत्र चल घटकांचा गुंतवणूकीवर होणारा परिणाम प्रवेग तत्वाद्वारे स्पष्ट होते.

**प्रवेग तत्वावरील टीका / मर्यादा :-**

१) भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर नसते.

२) गुंतवणूकीच्या बाबतीत तांत्रिक ज्ञानाच्या भूमिकडे दुर्लक्ष केले आहे.

३) मागणीतील घडून येणारी वाढ ही कायम नसते.

४) भांडवल पुरवठा हा नेहमिच लवचिक राहत नाही.

५) प्रवेग तत्व ज्या गृहीत परिस्थितीवर आधारलेला आहे. त्या गृहीतांमध्ये अवास्तवता दिसून येते.

६) गुंतवणूक आणि उत्पादन यामधील कालावधी विचारात घेतलेला नाही.

## २.६ महागुणक (Super Multiplier)

महागुणकालाच अधिगुणक असेही म्हटले जाते. आधुनिक अर्थतज्ज्ञांच्या मते कोणत्याही देशाच्या आर्थिक वृध्दीचा व संतूलन स्थितीचा विचार करतांना गुंतवणूकीत होणाऱ्या वाढीचा अर्थव्यवस्थेतील उत्पन्न पातळीवर काय परिणाम होते हे अभ्यासण्यासाठी गुणक आणि प्रवेग या दोन्ही संकल्पनांचा एकाचवेळी अभ्यास करणे व कार्यवाही होणे आवश्यक आहे. कारण गुणक संकल्पना गुंतवणूकीचा उत्पन्नावर होणार परिणाम स्पष्ट करतो तर प्रवेग तत्व उपभोगातील बदलाचा गुंतवणूकीवर होणार परिणाम स्पष्ट करते.

अशा वेळी गुणक व प्रवेग या दोघांचा परस्परांवर होणारा परिणाम विचारत घेऊन महागुणकाची संकल्पना विकसित झाली.

**महागुणकाची संकल्पना :-**

महागुणकाची संकल्पना सर्वात प्रथम रशियन अर्थतज्ञ खाफिझोव्ह यांनी मांडली पुढे प्रा. हेरॉड, सॅम्यूअलसन, हिक्स आणि हॅन्सन यांनी या संकल्पनेचा विकास केला.

महागुणकाची संकल्पना पुढील सुत्राद्वारे स्पष्ट करता येईल.

**सुत्र रुपाने :-**

$$KS = \frac{1}{1 - C - V}$$

1-C म्हणजेच सीमांत बचत प्रवृत्ती (S) असल्याने वरील सुत्र पुढील प्रकारे लिहीता येईल.

$$KS = \frac{1}{S - V}$$

वरील सुत्रांमध्ये

KS = महागुणक / अधिगुणक
C = सीमांत उपभोग प्रवृत्ती
V = सीमांत गुंतवणूक प्रवृत्ती.
S = सीमांत बचत प्रवृत्ती.

सुरुवातीस केलेल्या स्वायत्त गुंतवणूकीमूळे उत्पन्नात जी वाढ घडून येते ती स्वायत्त गुंतवणूकीपेक्षा महागुणकाच्या पटीने अधिक असते. म्हणजेच अर्थव्यवस्थेत एखाद्या वर्षी जर १०० कोटी रु. स्वायत्त गुंतवणूक केली तर एकूण उत्पन्नात १००० कोटी रु. नी वाढ होते. जर सीमांत उपभोग प्रवृत्ती १/२ असेल तर ही वाढ गुणक प्रक्रियेत २०० कोटी रु. पर्यंत वाढते म्हणजेच गुणक दुप्पट राहोत. परंतू त्याचवेळी प्रवेग तत्वाची कार्यवाही विचारात घेतल्यास अधिगुणक १० राहातो. म्हणजेच गुणक प्रवेग या दोघांच्या एकत्रित कार्यवाहीचा संयुक्त परिणाम म्हणजे महागुणक होय.

पुढील काल्पनिक तक्त्याद्वारे महागुणकाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

## महागुणकाची कार्यवाही

| कालावधी | प्रारंभिची गुंतवणूक | प्रेरित उपभोग (०.५) | प्रेरित गुंतवणूक (०.४) | उत्पन्नातील निव्वळ वाढ | उत्पन्नातील एकूण वाढ |
|---|---|---|---|---|---|
| T + १ | १०० कोटी रु. | - | - | १०० कोटी रु. | १०० कोटी रु. |
| T + २ | १०० कोटी रु. | ५० कोटी रु. | ४० कोटी रु. | ९० कोटी रु. | १९० कोटी रु. |
| T + ३ | १०० कोटी रु. | ४५ कोटी रु. | ३६ कोटी रु. | ८१ कोटी रु. | २७१ कोटी रु. |
| T + ४ | १०० कोटी रु. | ४०.५ कोटी रु. | ३२.४ कोटी रु. | ७२.९ कोटी रु. | ३४३.९ कोटी रु. |
| T + ५ | १०० कोटी रु. | ३६.४५ कोटी रु. | २९.१६ कोटी रु. | ६५.६१ कोटी रु. | ४०९.५१ कोटी रु. |
| T + ६ | १०० कोटी रु. | ३२.८० कोटी रु. | २६.२४ कोटी रु. | ५९.०४ कोटी रु. | ४६८.५५ कोटी रु. |
| - | - | - | - | - | - |
| T + n | १०० कोटी रु. | ५०० कोटी रु. | ४०० कोटी रु. | ९०० कोटी रु. | १००० कोटी रु. |

वरील तक्त्यावरीन असे स्पष्ट होते ही T+१ या पहिल्या टप्प्यात प्रारंभिक गुंतवणूकीमुळे प्रेरित उपभोगात व प्रेरित गुंतवणूकीत कोणतीही वाढ झालेली नाही परंतू निव्वळा व एकूण उत्पन्नात १०० कोटी रु. अशी वाढ होते.

T+२ या दुसऱ्या टप्प्यात मात्र १०० कोटी रु. च्या प्रारंभिक गुंतवणूकीमूळे प्रेरित उपभोग व प्रेरित गुंतवणूक मध्ये अनुक्रमे ५० कोटी व ४० कोटी रु. नी वाढ होते. कारण प्रेरीत उपभोगाचे व प्रेरित गुंतवणूकीचे प्रमाण अनुक्रमे ०.५ व ०.४ असे गृहीत धरले आहे. T+६ या कालावधीपर्यंत ही वाढ सुरु राहते मात्र त्यानंतर ही गुंतवणूक शून्य होते. गुणक व प्रवेग यांच्या या संयुक्त परिणामातून महागुणकाचा प्रभाव म्हणून अंतीम टप्प्यात (T+ n) एकूण उत्पन्नातील वाढ १००० कोटी होते. म्हणजेच महागणकाचे मूल्य. $\frac{१०००}{१००} = १०$ इतके होते.

## २.७ प्रश्न

प्रश्न १ **संकल्पना स्पष्ट करा.**

अ) एकूण मागणी ब) गुणक क) प्रवेग. ड) महागुणक.

प्रश्न २ **थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) केन्सचा उत्पन्न निर्धारपणाचा सिध्दांत.

ब) गुणकाची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

क) प्रवेग तत्वाची कार्यवाही स्पष्ट करा.

ड) महागुणकाची कार्यवाही स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ३

# प्रकरण २
# पैशाचे अर्थशास्त्र

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ पैसा – अर्थ आणि व्याख्या
३.३ पैशाचा पुरवठा
३.४ पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ घटक
३.५ पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक
३.६ पैशाचा भ्रमणवेग
३.७ पैशाचा भ्रमणवेग निर्धारीत करणारे घटक
३.८ पैशाची मागणी
३.९ रोखता प्राधान्य सिध्दांत
३.१० प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये

- पैशाचा पुरवठा ही संकल्पना अभ्यासने.
- पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- पैसाचा भ्रमणवेग ही संकल्पना जाणून घेणे.
- पैशाच्या मागणीचे विविध दृष्टीकोन समजून घेणे.
- पैशाच्या मागणीचा लॉर्ड केन्सचा सिध्दांत अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारामध्ये पैसा हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. तसेच अर्थशास्त्रीय विश्लेषणामध्ये पैसा हे मूल्यमापनाचे माध्यम म्हणून वापरले जाते. त्यामुळेच पैसा हा सुक्ष्म आणि समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यास प्रक्रियेतील एक मध्यवर्ती घटक आहे. सर्वप्रकारच्या मानवी आर्थिक व्यवहारामध्ये पैशाला अनन्यसाधारण महत्व आहे.

पैसा हा प्रत्येक अर्थव्यवस्थेतील विनिमयाचे कायदेशीर माध्यम म्हणून महत्वाची भूमिका पार पाडतो. तथापी काळानुसार त्यांचे स्वरुप बदलत गेले. पैशाला विधिग्राह्य चलन असेही म्हटले जाते कारण कोणत्याही अर्थव्यवस्थेतील पैशाला त्या – त्या देशातील कायदयाचा आधार असतो.

## ३.२ पैसा – अर्थ आणि व्याख्या

अर्थव्यवस्था ही भांडवलशाही लोकशाही मिश्र स्वरुपाची जरी असली तरी ही कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कोणताही व्यवहार पैशाशिवाय पूर्ण होवू शकत नाही. म्हणजेच संपूर्ण जगभरात अर्थव्यवस्थेत पैशाला अन्यय साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण पैशाने मानवी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक अशा प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केलेला आहे. थोडक्यात पैसा हा सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला जातो. पैशाच्या व्याख्या खालीलप्रमाणे :-

**पैशाच्या व्याख्या :-**

**१) प्रा. हाम :-**

“विनिमयाचे माध्यम आणि मूल्यमापनाचे कार्ये करणारी वस्तु म्हणजेच ‘पैसा’ होय.”

**२) प्रा. काऊथर :-**

“जी वस्तु विनिमयाचे माध्यम म्हणून स्वीकारली जाते आणि त्याच बरोबर जी मूल्यमापन व मूल्यसंचय असे ही कार्य करते, ती वस्तु म्हणजेच ‘पैसा’ होय.”

**३) प्रा. वॉकर :-**

“पैशाची कार्य करणारी वस्तु म्हणजेच ‘पैसा’ होय.”

**४) प्रा. सेलिगमन :-**

“ज्या वस्तुला सर्वांमार्फत मान्यता मिळाली असते असे कोणतीही वस्तु म्हणजे ‘पैसा’ होय.”

## ३.३ पैशाचा पुरवठा (Supply of Money)

अर्थशास्त्रात पैशाच्या पुरवठ्याचा अभ्यास अनेक वर्षांपासून करण्यात येत असला तरीही त्या संदर्भात अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यात दिसून येत नाही. काही अर्थतज्ञांच्या मते पैशाचा पुरवठा म्हणजे विशिष्ट कालखंडात विनिमयाचे साधन म्हणून उपयोगात आणलेला पैशाचा साठा होय.

या मतानुसार एकूण नाणी व कागदी चलन, मागणीदेय ठेवी यांचे एकत्रिकरण म्हणजे पैशाचा पुरवठा होय. अलीकडील काळात पैशाच्या पुरवठ्यात मुदत ठेवी, बचत ठेवी, कायम ठेवी, पोस्टातील ठेवी, शेअर्समध्ये गुंतविलेला पैसा या सर्वाचा समावेश होतो.

**व्याख्या :-**

"एका विशिष्ट वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेतील लोकांजवळ उपलब्ध असलेली पैशाची एकूण गोळाबेरीज म्हणजे पैशाचा पुरवठा होय."

पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ असलेले घटक पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

## ३.४ पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ घटक (Constituents of Money Supply)

पैशाच्या पुरवठ्यातील समाविष्ट घटकांचा अभ्यास पुढील वेगवेगळ्या दृष्टीकोनांद्वारे अभ्यासता येईल.

### A) सनातन दृष्टीकोन (संकुचित मुद्रा) :-

सनातन पंथी अर्थतज्ञांनी पैशाच्या विनिमय माध्यम या कार्यावर भर देऊन पैशाच्या पुरवठ्यात पुढील दोन गोष्टींचा समावेश केला.

१) लोकांजवळील चलन (कायदेशिर नाणी आणि नोटा)

२) व्यापारी बँकांजवळील मागणीदेय ठेवी.

अशा पध्दतीने लोकांकडील एकूण चलन (Currency) आणि बँकांकडील मागणीदेय ठेवी (Demandable Deposits) मिळून पैशाचा पुरवठा व्यक्त करता येतो. यालाच $M_1$ असे संबोधले जाते. परंतू पैशाच्या पुरवठ्याची ही व्याख्या संकुचित समजली जाते.

### B) आधुनिक दृष्टीकोन (असंकुचित मुद्रा) :-

पैशाच्या आधुनिक दृष्टीकोनात पुढील वेगवेगळया दृष्टीकोनांचा विचार करावा लागतो.

### १) मौद्रिक दृष्टिकोन (प्रा. मिल्टन फ्रिडमन) :-

प्रा. मिल्टन फ्रिडमन यांनी पैशाच्या या दृष्टीकोनानुसार पैशाची व्याख्या व्यापक स्वरुपात केली आहे. त्यांनी याद्वारे पैशाच्या मूल्यसंचयनाच्या कार्यावर भर दिलेला आहे. फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या पुरवठ्यात चलनी नोटा, नाणी याबोरबरच बँकांकडील मागणीदेय बचत ठेवी, चालू ठेवी, मुदत ठेवी यांचाही समावेश केलेला आहे. फ्रिडमन यांच्या मते अशा पध्दतीने व्यापारी बँकांजवळील मुदत ठेवी यांच्यामध्ये पैशाइतकीच रोखता असल्याने पैशाच्या पुरवठ्यात यांचा समावेश केलेला आहे.

### २) गर्ले आणि शॉ यांचा दृष्टीकोन :-

प्रा. गर्ले आनि शॉ यांनीदेखिल पैशाच्या पुरवठ्याची व्यापक स्वरुपात व्याख्या केलेली आहे. त्यांच्या मते पैशाच्या पुरवठ्यात फ्रिडमन यांनी सांगितलेल्या घटकांबरोबर बँकांच्या बचत, मुदत ठेवीबरोबरच इतर वित्तिय संस्थांकडील ठेवी, कर्ज देणाऱ्या संघटनांकडील ठेवी, गृहनिर्माण सोसायटीकडील बचती इ. चा ही समावेश होणे आवश्यक आहे.

पैशाच्या पुरवठ्याच्या वरील दृष्टीकोनांबरोबरच पैशाच्या पुरवठ्याच्या संकल्पना व त्यामध्ये होणारे बदल यांची विश्लेषण करण्याच्या हेतूने रिझर्व्ह बँकेने १९७७ पासून पैशाच्या पुरवठ्याच्या पुढील - चार संकल्पना स्विकारलेल्या आहेत.

**१) $M_1$ :-** $M_1$ या संकल्पनेला संकुचित पैसा (Narrow Money) असे सुद्धा म्हटले जाते. $M_1$ या संकल्पनेमध्ये प्रामुख्याने लोकांकडे असलेला रोख पैसा म्हणजे चलन की ज्यामध्ये धातुची नाणी व कागदी चलनाचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे बँकांकडे असलेली मागणी देय ठेवी व रिझर्व बँकेकडील इतर ठेवीचा समावेश केला जातो.

**२) $M_2$ :-** $M_2$ ही संकल्पना पैशाची असंकुचित संकल्पना मानली जाते. $M_2$ या संकल्पनेमध्ये $M_1$ मध्ये समाविष्ट असलेले चलन, मागणी देय ठेवी इतर ठेवीच्या बरोबरच पोस्टामध्ये उपलब्ध असलेल्या बचत ठेवीचा देखील समावेश केला जातो. कारण ग्रामीण भागात बँकांच्या सुविधा उपलब्ध नसल्याने पोस्ट ऑफिसेसमार्फत ग्रामीण भागातील बचत एकत्रीत केली जाते.

**३) $M_3$ :-** $M_3$ ही संकल्पना देखील पैशाची असंकुचित संकल्पना / व्यापंक संकल्पना मानली जाते. $M_3$ या संकल्पनेमध्ये $M_1$ मधील चलन, मागणी देय ठेवी इतर ठेवीच्या बरोबरच बँकामध्ये विशिष्ट मुदतीसाठी ठेवण्यात येणाऱ्या बँकामध्ये विशिष्ट मुदतीसाठी ठेवण्यात येणाऱ्या मुदत ठेवीचा देखील समावेश केला जातो.

४) **$M_4$ :-** $M_4$ या संकल्पनेत $M_3$ या संकल्पनेतील सर्व बाबीबरोबरच पोस्टातील एकुण ठेवीचा देखील समावेश केला जातो.

## ३.५ पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक (Determinants of Money Supply)

पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे काही नियंत्रणात्मक तर काही इतर घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

## १) उच्चशक्ती पैसा (High Powered Money) :-

कोणत्याही देशातील पैशाचा पुरवठा निर्धारीत करण्यामध्ये उच्चशक्ती पैशाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कारण उच्चशक्ती पैशामध्ये पतनिर्मितीला चालना देण्याची क्षमता असते. त्यामुळे देशातील पैशाच्या पुरवठ्यात मोठी वाढ घडून येते.

## २) लोकांची रोख रक्कम जवळ बाळगण्याची प्रवृत्ती :-

जर देशातील लोकांची रोखता पसंती अधिक असेल तर बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात पैसा कमी राहून पतनिर्मिती कमी होऊन पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट जर लोकांनी पैसा रोख स्वरुपात स्वतःजवळ बाळगण्याऐवजी बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात ठेवल्यास बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशाचा पुरवठा वाढतो.

## ३) सरकारी अंदाजपत्रक :-

सरकारच्या अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने शिलकीचे अंदाजपत्रक, तूटीचे आणि संतूलित अंदाजपत्रक असे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ज्यावेळी सरकार शिलकीचे किंवा वाढव्याचे अंदाजपत्रक मांडते तेव्हा सरकार कर आणि करांच्या व्यतीरीक्त इतर मार्गाने जमा केलेला सर्व पैसा खर्च करते त्यामुळे पैशाचा पुरवठा घटतो. याउटल तूटीच्या अंदाजपत्रकामुळे नवीन चलन छपाई आणि विदेशी कर्जामूळे देशातील पैशाच्या पुरवढ्यात वाढ होते.

## ४) पैशाचा भ्रमणवेग :-

जेव्हा पैशाचा भ्रमणवेग अधिक असतो, तेव्हा पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते. याऊलट कमी असेल तर पैशाच्या एकूण पुरवठ्यात घट होते.

## ५) राखिव निधीचे प्रमाण :-

मध्यवर्ती बँक देशातील व्यापारी बँकांना रोख राखिव निधी (CRR) व वैधनिक रोखता निधी (SLR) चे प्रमाण ठरवून देतो. CRR व SLR मध्ये वाढ केल्यास बँकांकडील ठेवीपैंकी अधिक रक्कम मध्यवर्ती बँकेजवळ जमा झाल्याने बँकांची कर्जे देण्याची म्हणजेच पतनिर्मितीची क्षमता घटल्याने पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट CRR व SLR च्या प्रमाणातील घट ही पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडवून आणते.

## ६) खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी – विक्री :-

देशातील सरकारने देशांतर्गत कर्ज उभारण्यासाठी मध्यवर्ती बँकेद्वारे सार्वजनिक कर्जरोख्यांची विक्री केल्यास जनतेचा पैसा सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतल्याने पैशाचा पुरवठा घटतो.

याऊलट सरकारी कर्जरोख्यांची परतफेड केल्यास व्याज आणि मुद्दल रक्कम परत मिळाल्याने पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते.

### ७) बँकदरातील बदल :-

ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जे देतो त्यास बँकदर म्हणतात. समजा मध्यवर्ती बँकेने बँकदरात वाढ केली तर कर्जावरील व्याजदरात वाढ झाल्याने बँकांची पतनिर्मिती घटते व पैशाचा पुरवठा कमी होतो.

याऊलट बँकदर घटल्यास मध्यवर्ती बँकेची कर्जे स्वस्त झाल्याने बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशांचा पुरवढा वाढतो.

## ३.६ पैशाचा भ्रमणवेग (Velocity of Circulation of Money)

Velocity या इंग्रजी शब्दाचा अर्थ गती किंवा वेग असून Circulation या शब्दाचा अर्थ भ्रमण असा होतो. म्हणून Velocity of Circulation of Money म्हणजेच पैशाचा परिचलन किंवा पैशाचा भ्रमण वेग होय. त्यालाच पैशाची गतीशीलता असाही शब्द प्रयोग वापरला जातो.

कोणत्याही देशातील पैशाचा पुरवठा लक्षात येण्यासाठी पैशाचा भ्रमणवेग ही संकल्पना विचारात घेतली जाते. पैशाच्या एका नगाचा विचार केल्यास असे दिसून येते की विशिष्ट कालावधीमध्ये पैशाचा हा नग एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे फिरत राहतो किंवा हस्तांतरीत होत राहतो. अर्थव्यवस्थेतील पैशाचा हा फिरण्याचा वेग म्हणजेच पैशाचा भ्रमणवेग होय.

**व्याख्या :-**

१) "पैशाचे एक परिमाण विशिष्ट कालखंडात जितक्या वेळा वापरले जाते ती संख्या म्हणजे पैशाचा भ्रमण वेग होय."

२) "एका विशिष्ट कालखंडात पैशाचा एकक जितक्या वेळा वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी वेगवेगळ्या व्यक्तींकडून पुन्हा पुन्हा हस्तांतरीत होतो ती सरासरी संख्या म्हणजेच पैशाचा भ्रमणवेग होय."

उदा. :- समजा १००० रुपयाची एक नोट एक महिन्यात २० वेळा खर्च झाली तर तीचा भ्रमणवेग २० परंतू तीच्यामुळे पैशाचा एकूण पुरवठा मात्र (१००० × २०) २०,००० रु. एवढा असेल.

## ३.७ पैशाचा भ्रमणवेग निर्धारीत करणारे घटक

पैशाच्या भ्रमणवेगावर पुढील घटक परिणाम करतात.

### १) उत्पन्न मिळविण्याचा कालावधी :-

जर व्यक्तीला मिळणारे उत्पन्न ठराविक कालावधीमध्ये प्राप्त होत असेल.

उदा. दर दिवशी, दर आठवड्याला, दर महिन्याला तर अशा परिस्थितीमध्ये विशिष्ठ कालावधीनंतर उत्पन्न मिळविण्याची हमी असल्याने लोकांची खर्च प्रवृत्त जास्त राहते. त्यामुळेच पैशाचा भ्रमणवेग देखील जास्त राहतो.

याउलट उत्पन्न मिळविण्याचा कालावधी अनियमित अनिश्चित असेल भविष्य काळासाठी पैसा रोख स्वरुपात जवळ ठेवण्यासाठी वृत्ती वाढत जाते. म्हणजे खर्चाचे प्रमाण कमी राहत असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील कमी राहतो.

### २) पैसे देण्याच्या पध्दती :-

पैसे देण्याच्या पध्दती देखील पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. दर दिवशी / दर हप्त्याला पैसे दिल्यास पैसा खर्च करण्याचि प्रवृत्ती जास्त असते. त्यामुळेच पैशाचा भ्रमण वेग जास्त राहतो.

याउलट एक रक्कमी पैशाचे व्यवहार तर होत असतील तर पैसा खर्च करण्याचे प्रमाण कमी राहत असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील कमी राहतो.

### ३) राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप :-

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपावर देखील पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेमध्ये श्रीमंत लोकांच्या सर्वच्या सर्वच्या सर्व गरजा पूर्ण झालेल्या असल्याने त्यांची बचत करण्याची प्रवृत्ती कमी असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील जास्त राहतो.

### ४) उद्योगधंदयामधील तेजी – मंदीची परिस्थिती :-

देशातील उदयोगधंदयाच्या परिस्थितीचा देखील पेशाच्या भ्रमणवेगावर परिणाम झालेला दिसून येतो. अर्थव्यवस्थेमध्ये तेजीची परिस्थिती असताना / उदयोगांची भरभराट असताना पैशाचे व्यवहार त्वरीत आणि जलद गतीने होत असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहोत.

याउलट मंदीची परिस्थिती असेल तर उधारीचे व्यवहार वाढत असल्याने पैशाच्या भ्रमणाचा वेग कमी लागतो.

### ५) बँकांची परिस्थिती :-

विकसित देशामध्ये वित्तीय व्यवस्था जर मजबूत असेल तर बँकामार्फत केले जाणारे पैशाचे व्यवहार वाढत जात असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

### ६) पैशाच्या व्यवहाराची साधने :-

जर अर्थव्यवस्थेमध्ये पैशाच्या दळणवळणाची साधने आधूनिक स्वरुपाची असतील तर पैसा कमीत-कमी वेळेत, कमीत-कमी खर्चात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे हस्तांतरीत होत असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

### ७) रोखता हेतु :-

पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगण्याची लोकांची प्रवृत्ती जास्त असेल तर अशा लोकामार्फत खर्च देखील मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळेच अशा लोकांच्या बाबतीत पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

## ३.८ पैशाची मागणी

प्रत्येक शास्त्रामध्ये जसे काही महत्त्वाचे शोध लागलेले आहेत तसाच पैशाचा शोध हा अर्थशास्त्रातील एक महत्वाचा शोध मानला जातो. पैशाद्वारे सर्वच देवाण घेवाणी चे व्यवहार होत असल्याने सर्वाकडून पैशासाठी मागणी केली जाते. वस्तूप्रमाणेच पैशालासुध्द मागणी असते. परंतू फरक एवढाच की वस्तू स्वतः उपयोगी असते तर पैसा मात्र उपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी पैशाला मागणी केली जाते. पैशाच्या या वैशिष्टयामुळेच असे म्हटले जाते की 'We can not eat money but we can not eat without money' म्हणजेच आपण पैसा खाऊ शकत नाही परंतू पैसा नसेल तर इतर काहीच खाऊ शकत नाही. यावरुन पैशाचे महत्व दिसून येते.

म्हणूनच पैशाच्या मागणीविषयीचे वेगवेगळे दृष्टीकोन पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**पैशाच्या मागणीचे दृष्टीकोन**

| सनातनी दृष्टीकोन | आधुनिक (केन्सचा) दृष्टीकोन | मिल्टन फ्रिडमन दृष्टीकोन |
|---|---|---|

### A) पैशाच्या मागणीचा सनातनी दृष्टीकोन :-

सनातनी अर्थतज्ञांच्या मते पैसा हा केवळ एक विनिमयाचे माध्यम आहे. म्हणजेच पैसा ही स्वतः उपभोग्य वस्तू नसून पैसा उपभोग्य वस्तूंच्या खरेदीचे साधन आहे. म्हणूनच सनातनवादी अर्थतज्ञांच्या मते पैशाला वस्तू – सेवांप्रमाणे प्रत्यक्ष मागणी नसून ती अप्रत्यक्ष स्वरुपाची असते. सनातनवादयांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही त्या देशातील विशिष्ट कालखंडातील वस्तू-सेवांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांवरुन समजू शकते. परंतू सनातन वादी अर्थतज्ञांनी पैशाच्या मागणीचा विचार व्यक्तीगत न करता संपूर्ण समाजाच्या मागणीचा विचार केल्याने हे विश्लेषण एकतर्फी व अपूर्ण स्वरुपाचे आहे.

### B) पैशाच्या मागणीचा आधूनिक दृष्टीकोन :-

आधुनिक अर्थशास्त्राचे जनक प्रा. जे. एम. केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या आपल्या 'The General Theory of Employment, Interest and Money' या ग्रंथात पैशाच्या मागणीविषयीचे आपले विचार मांडले. त्यांच्या मते पैशामध्ये सर्वाधिक रोखता असल्याने लोक पैशाला मागणी करतात. म्हणजेच लोकांना पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगणे अधिक पसंत असते कारण या रोखतेच्या आधारे ते कोणत्याही

वस्तू-सेवांची केव्हाही खरेदी करु शकतात. या रोकड पसंती मूळेच लोकांमार्फत पैशाला मागणी केली जाते.

प्रा. लॉर्ड केन्स यांच्या मते लोक आपल्याजवळ पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगतात ते पूढील तीन हेतूंमूळे.

१) व्यवहार हेतू.

२) भविष्यकालीन तरतूदीचा हेतू.

३) सट्टेबाजीचा हेतू.

### C) मिल्टन फ्रिडमनचा पैशाच्या मागणीचा दृष्टीकोन :-

लॉर्ड केन्स नंतर आलेल्या प्रा. मिल्टन फ्रिडमन, प्रा. बाऊमोल यासारख्या अर्थतंज्ञांना केन्सचे पैशाच्या मागणीचे वरील ३ हेतू अवास्तव वाटत होते. कारण वरील तीनही हेतूने पैशाला केली जाणारी मागणी ही उत्पन्नपातळी आणि व्याजदराने प्रेरीत झालेली आहे. परंतू आधूनिक अर्थतज्ञांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही अर्थव्यवस्थेतील पैशाच्या साठ्यावर अवलंबून असते.

प्रा. मिल्टन फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या मागणीवर किंमत पातळी हा घटक परिणाम करतो. म्हणजेच किंमत पातळी व पैशाची मागणी यामध्ये प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असल्याने या दोघांमध्ये समान दिशेने बदल होतात. म्हणजेच किंमत पातळी वाढल्यास पैशाची मागणी वाढते व किमंत पातळी घटल्यास पैशाच्या मागणीत घट होते.

## ३.९ पैशाच्या मागणीचा लॉर्ड केन्सचा सिध्दांत (रोखता पसंती सिध्दांत )

'The General Theory of Employment, Interest and Money' या ग्रंथात १९३६ मध्ये लॉर्ड केन्स यांनी पैशाच्या मागणीचा 'रोखता पसंती सिध्दांत' मांडला लोकांची रोख रक्कम जवळ बाळगण्याची मानसिक प्रवृत्ती म्हणजेच रोखता पसंती होय. ही रोखता पसंती पुढील ३ हेतूंने प्रेरीत असते.



### A) व्यवहार हेतू :-

पैसा हे विनिमयाचे माध्यम म्हणून कार्य करीत असतो. त्यामुळे व्यवहार हेतूने पैशासाठी मागणी केली जाते. लोकांचा खर्च दररोज होत असतो. मात्र लोकांचे उत्पन्न दररोज न मिळता ठराविक कालावधीनंतर प्राप्त होत असते. म्हणून दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी व्यक्ती स्वतः जवळ काही रोख पैसा जवळ बाळगत असतो. दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी लोकांमार्फत पैशाला मागणी केली जाते.

व्यवहार हेतूने पैशाची मागणी पुढील २ प्रकारे वर्गीकृत करता येते.

१) उत्पन्न हेतु.

२) व्यवसाय हेतु.

### १) उत्पन्न हेतु :-

उपभोक्त्याना वस्तु आणि सेवाच्या खरेदिसाठी तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी रोख पैशाला मागणी करावी लागते. उपभोक्त्याकडून पैशाला होणारी मदत त्याच्या उत्पन्नावर अंवलबून असते. व्यक्तीचे उत्पन्न जसे-जसे वाढत जाते. तस-तशी व्यक्तीची पैशाची मागणी वाढत जाते.

### २) व्यवसाय हेतू :-

व्यवसाय हेतूचा संबध व्यापारी / उदयोजकाशी येतो. उपभोकत्याप्रमाणेच व्यापाऱ्यांना देखील स्वतः जवळ दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी पैशाला मागणी करावी लागते. ज्या व्यापाऱ्यांची दैनंदिन उलाढाल जास्त असेल त्याची पैशासाठी मागणी जास्त राहते.

याउलट उलाढालीचे प्रमाण कमी असेल. अशा व्यापाऱ्याची पैशाची मागणी कमी राहते.

### B) दक्षता हेतू :-

भविष्यकाळात उदभवणाऱ्या संकटाना सामोरे जाण्यासाठी लोक स्वतःजवळ पैसा रोख स्वरुपात जवळ ठेवणे पसंत करतात. आपल्याला भविष्य पूर्णता अज्ञात असेत म्हणजेच भविष्य-काळाबद्दल निश्चित अंदाज व्यक्त करता येत नाही. कारण, प्रत्येकाचा भविष्यकाळ अनिश्चित आणि अंधकारमय असतो. पैशाच्या आधारे मूल्यसंचय करता येत असल्याने भविष्यातील आपत्ती / संकट निवारण्यासाठी लोक पैशाला मागणी करतात.

व्यक्तीच्या दृष्टीने भविष्यकाळामध्ये आजारपण, अपघात, दुदैवी घटना, बेरोजगारी, वृध्दत्व, मृत्यू, धार्मिक कार्य अशा प्रकारच्या घटना निर्माण होवू शकतात. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी लोक स्वता : जवळ पैसा रोख स्वरुपात बाळगतात. म्हणजेच ते पैशाला मागणी करतात. जर अशा संकटाची शक्यता जास्त असेल तर दक्षता हेतूने पैशाची मागणी जास्त केली जाते.

याउलट संकटाची शक्यता कमी असेल तर दक्षता हेतूने पैशाची मागणी कमी राहते.

### C) सट्टेबाजी / परिकल्पन हेतू :-

लॉर्ड केन्स यांच्या मते वरील २ हेतू बरोबर पैशाची मागणी करण्याचा तिसरा हेतु म्हणजेच सट्टेबाजीचा हेतू होय. काही लोक सट्टेबाजी करुन नफा मिळविण्यासाठी पैशाची मागणी करतात. मध्यस्थ, सावकार, कर्ज व्यवहार करणारे दलाल हे व्याजदरानुसार पैशाची मागणी कमी – जास्त प्रमाणात करीत आहेत. बदलत्या व्याजदराचा फायदा घेण्यासाठी असे सावकार पैशाला मागणी करीत असतात.

भांडवल बाजारातील शेअर्स व कर्जरोख्यांच्या किंमतीत सतत बदल होत असतात. या बदलांचा फायदा घेण्याच्या उद्देशाने काही मध्यस्थ स्वत:जवळ रोख पैसा बाळगतात अर्थात अशा या सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही व्याजदरावर अवलंबून असते व ती व्याजदराच्या व्यस्तप्रमाणात बदलते.

म्हणजेच व्याजदरात वाढ झाल्यास सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी घटते व व्याजदरात घट झाल्यास सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी वाढते. याचाच अर्थ सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते म्हणजेच व्याजदर व सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी यामध्ये ऋणात्मक स्वरुपाचा संबंध असतो. हेच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




सट्टेबाजीच्या हेतून पैशाची मागणी

**आकृती क्रमांक ३.१**

वरील आकृतीत OX अक्षावर सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी तर OY अक्षावर व्याजाचा दर दर्शविलेला आहे. LD हा रोखतेचा मागणी वक्र असून तो ऋणात्मक उताराचा दर्शविला आहे कारण सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते.

सुरवातीस व्याजदर $or_1$ असा जास्त असतांना पैशापासून मिळणारे उत्पन्न अधिक मिळत असल्याने पैसा जवळ बाळगण्याचे प्रमाण म्हणजेच पैशाचे मागणी $OM_1$

अशी कमी राहते. परंतू व्याजदर $or_2$ असा घटल्यास पैशाची मागणी वाढून $OM_2$ अशी राहते.

व्याजाचा दर $or_3$ या विशिष्ट पातळीपर्यंत कमी झाल्यास हा वक्र पुढे न सरकता तो OX अक्षाला समांतर बनतो कारण एका विशिष्ट पातळीला व्याजदर कमी झाला तर पैसा कर्जाऊ देऊन कोणताच फायदा होत नसल्याने सट्टेबाजी पैसा स्वतःजवळ रोख स्वरुपात बाळगणे पसंत करतात यालाच लॉर्ड केन्स यांनी ‘रोखतेचा सापळा’ (Liquidity Trap) असे म्हटले आहे.

## ३.१० प्रश्न

**प्र.१ टीपा लिहा.**

अ) पैसा.

ब) पैशाचा भ्रमण वेग.

क) पैशाचा पुरवठा.

ड) $M_1$ आणि $M_4$ .

**प्र. २ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ असलेले घटक कोणते ?

ब) पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक स्पष्ट करा.

क) पैशाच्या भ्रमणवेगावर परिणाम करणारे घटक.

ड) ‘रोखता पसंती सिध्दांत’ सविस्त स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ४

# भाववाढ / चलनस्फिती
# (Inflation)

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टये
४.१ प्रस्तावना
४.२ भाववाढ /चलनवाढ
४.३ चलनवाढीचे प्रकार
४.४ मागणी प्रेरित चलनवाढ
४.५ खर्च प्रेरित चलनवाढ
४.६ चलनवाढीचे परिणाम
४.७ चलनवाढ नियंत्रणाचे उपाय
४.८ फिलिप्स वक्र
४.९ प्रश्न

## ४.० उद्दिष्टये

- चलनवाढ ही संकल्पना समजून घेणे.
- चलनवाढीच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
- चलनवाढीची कारणे व परिणामांचा अभ्यास करणे.
- चलनवाढ नियंत्रणांच्या साधनांची माहिती करुन घेणे.
- फिलिप्स वक्र समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

अर्थव्यवस्थेत वस्तूंच्या किंमती कधीच स्थिर नसतात तर वस्तूंच्या किंमती सतत वाढणाऱ्या किंवा घटणाऱ्या असतात. वस्तूंच्या किंमतीत सातत्याने घडून येणारी वाढ म्हणजे अर्थशास्त्रिय परीभाषेते चलनास्फिती किंवा भाववाढ किंवा चलनवाढ किंवा किंमतवाढ (Inflation) असे शब्दप्रयोग केले जातात.

दुसऱ्या महायुध्दानंतर वस्तू व सेवांच्या किंमती सातत्याने वाढत होत्या अर्थव्यवस्थेत सातत्याने ही किंमत वाढीची जी प्रवृत्ती दिसुन येते तिलाच 'भाववाढ' किंवा 'चलनवाढ' असे म्हणतात. या स्थितीचे वर्णन अर्थशास्त्रात चलनवाढ, भाववाढ, चलनस्फिती, मुद्रास्फिती, चलनविस्तार, चलनातिरेक, चलनवृध्दी किंवा चलनविस्फोट अशा अनेक शब्दांनी केले जाते.

## ४.२ भाववाढ /चलनवाढ

भाववाढ किंवा चलनवाढ ही संकल्पना पुढील व्याख्यांव्दारे अधिक स्पष्ट करता येईल.

**व्याख्या :-**

**१) प्रा. क्राउथर :-**

"चलनस्फिती ही एक अशी अवस्था आहे की ज्यामध्ये पैशाचे मूल्य कमी होत जाते आणि वस्तूंच्या किंमती वाढत जातात."

**२) प्रा. कोल बर्न :-**

"ज्यावेळी अर्थव्यवस्थेतील अतिरीक्त पैसा अत्यंत कमी वस्तूंचा पाठलाग करतो अशी अवस्था म्हणजे चलनवाढ होय."

**३) प्रा. हॉट्रे :-**

"अर्थव्यवस्थेतील पैशाचा अतिरिक्त पुरवठा म्हणजे चलनस्फिती होय."

**४) ग्रेगरी :-**

"खरेदीशक्तीच्या परिमाणातील असामान्य वृध्दी म्हणजे चलनवाढ होय."

## ४.३ चलनवाढीचे प्रकार

चलनवाढीचे वेगवेगळ्या परिस्थितीनुसार वेगवेगळ्या अर्थतंज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारात वर्गीकरण केले आहे. चलन वाढीचे हे प्रकार पुढील प्रकारे वर्गीकृत करता येतील.

**चलनवाढीचे प्रकार**




**A) किंमत वाढीवरुन चलन वाढीचे प्रकार :-**

वस्तूच्या किंमतीतील वाढीनुसार चलनवाढीचे पुढील चार प्रकारामध्ये वर्गीकरण करता येते.

**१) रांगती स्फिती :-**

अर्थव्यवस्थेमध्ये ज्यावेळी वस्तू आणि सेवेच्या किंमती अल्पप्रमाणात हळूहळू वाढतात, तेव्हा त्या अवस्थेला 'रांगती स्फिती' असे म्हणतात. रांगती स्फिती हा चनलवाढीचा अत्यंत सौम्य प्रकार आहे. परंतू काही अर्थतज्ञाच्या मते रांगती स्फिती देखिल अर्थव्यवस्थेला हानीकारक ठरु शकते. कारण कालांतराने रांगत्या स्फितीचे रुपांतर विशाल स्फितीमध्ये होते.

**२) चालती स्फिती :-**

रांगत्या स्फितीला अनेकदा अर्थव्यवस्थेमध्ये अनेक कारणामुळे प्रोत्साहन मिळाले तर वस्तूच्या किंमती वेगाने वाढू लागतात व त्यातून चालती स्फिती अस्तित्वात येते. चालती स्फिती म्हणजे धावत्या आणि विशाल स्फितीला आमंत्रण देणारी स्थिती होय.

**३) धावती स्फिती :-**

धावत्या स्फितीतील किंमती अत्यंत वेगाने वाढू लागतात अशा वेळी अर्थव्यवस्था विस्कळीत होते. वस्तू आणि सेवांच्या किंमती वेगाने वाढत असल्याने श्रमिक वर्ग आणि कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांवर त्याचा विपरीत परिणाम दिसून येतो.

### ४) विशाल स्फिती :-

विशाल स्फिती म्हणजेच वस्तूच्या किंमत वाढीचा वेग प्रचंड असण्याची स्थिती होय. किंमत वाढीला कोणतीही मर्यादा या अवस्थेत दिसून येत नाही. वस्तूच्या किंमती दर तासाला वाढतात. अशा परिस्थितीमूळे लोकांचा पैशावरील विश्वास कमी होतो.

### B) सरकारी हस्तक्षेपणावरुन चलनस्फितीचे प्रकार :-

### १) खुली स्फिती :-

जेव्हा सरकारचा अर्थव्यवस्थेवर कोणताही हस्तक्षेप नसतो त्यावेळी वस्तूच्या किंमती सातत्याने वाढत जाणाऱ्या असतात त्यालाच 'खुली स्फिती' असे म्हणतात.

### २) दडलेली स्फिती :-

सरकारचा अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप असतांना वस्तूच्या किंमत वाढीची प्रवृत्ती निर्माण होत असते. सरकारने वस्तूच्या किंमती वाढू नयेत म्हणून अनेक उपाययोजना केलेल्या असतात तसेच अर्थव्यवस्थेतून अनेक नियंत्रणे ठेवलेली असतात. अशी नियंत्रणे सरकार काढून घेतल्यास अचानक वस्तूंच्या किमंती मोठ्या प्रमाणात वाढू लागतात. यालाच 'दडलेली किंवा छुपी स्फिती' असे म्हणतात.

### C) चलनस्फिती निर्माण होण्याच्या कारणावरुन चलनस्फितीचे प्रकार :-

### १) तूट प्रेरीत चलनवाढ :-

सरकारी उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च जास्त केल्यास सरकारच्या अंदाजपत्रकामध्ये तूट निर्माण होते. ही तूट भरुन काढण्यासाठी वस्तूच्या किंमती वेगाने वाढविल्या जातात. अशा प्रकारच्या किंमत वाढीला तूटीमुळे निर्माण होणारी चलनवाढ असे म्हणतात.

### २) वेतन प्रेरीत चलनवाढ :-

श्रमिकांचे वेतन वाढविल्याने उत्पादन खर्चात वाढ होते. हा उत्पादन खर्च भरुन काढण्यासाठी वस्तूच्या किंमती वाढविल्या जातात. तेव्हा अशा किंमत वाढीला 'वेतनप्रेरीत चलनवाढ' असे म्हणतात.

### ३) लाभ / नफा प्रेरीत चलनवाढ :-

संयोजकाला अधिक नफा व्हावा या उद्देशाने वस्तू आणि सेवांच्या किंमती वाढविल्या जातात. या परिस्थितीमुळे नफा मिळविण्यासाठी जी चलनवाढ होते तीलाच लाभप्रेरीत चलनवाढ असे म्हणतात.

**D) आकारमानानुसार चलनवाढीचे प्रकार :-**

**१) व्यापक चलनवाढ :-**

ज्यावेळी अर्थव्यवस्थेमध्ये एका विशिष्ट क्षेत्रातील वस्तूंच्या किंमती न वाढता अर्थव्यवस्थेतील सर्वच वस्तूंच्या किंमती वाढत असतात. तेव्हा त्या स्फितीला व्यापक चलनवाढ असे म्हणतात. म्हणजेच व्यापक चलनवाढ ही अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रातील सर्वच वस्तूंच्या किंमत वाढीशी संबंधित असते.

**२) आंशिक चलनवाढ :-**

ही चलनवाढ विशिष्ट वस्तूच्या टंचाईमुळे त्या वस्तूंच्या किंमती सातत्याने वाढत जात असल्याने निर्माण होते. म्हणजेच काही विशिष्ट क्षेत्रातीलच वस्तूंच्या किंमती ज्यावेळी वाढू लागतात. त्यावेळी त्याला ‘आंशिक चलनवाढ’ म्हणतात.

**उदा. :-**

दुष्काळामध्ये शेतमलाचे उत्पादन कमी होऊन अशा वस्तूंची टंचाई निर्माण होते. व शेतमालाच्या किंमती वाढू लागतात अशा वेळी अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रातील वस्तूंच्या बाबतीत जी किंमतवाढ दिसून येते त्यालाच ‘आंशिक चलनवाढ’ असे म्हणतात.

## ४.४ मागणी प्रेरित चलनवाढ

चलनवाढीच्या वरील प्रकारांबरोबर चलनवाढ निर्माण का होते. याचे पुढील दोन गटात वर्गीकरण केले जाते.

१) मागणी प्रेरित चलनवाढ - (Demand Pull Inflation)

२) खर्च प्रेरित चलनवाढ – (Cost push Inflation)

‘मागणीतील वृध्दीमूळे जी चलनवाढ निर्माण होते तीलाच मागणी प्रेरित चलनवाढ असे म्हणतात.’ ज्यावेळी मागणी पेक्षा पुरवठा कमी असतो. त्यावेळी किंमती वाढू लागतात तेव्हा त्यास मागणी प्रेरित चलनवाढ असे म्हणतात.

मागणी प्रेरित चलनवाढ ही पूढील कारणांमूळे घडून येते.

**१) पतनिर्मिती :-**

मौद्रिक धोरणाचा एक भाग म्हणून जर व्यापारी बँकांनी अधिक कर्जे देऊन पतपैशाची निर्मिती घडवून आणली तर अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा वाढून चलनवाढ घडून येते.

**२) युध्द :-**

युध्द समाप्ती नंतर लगेचच अर्थव्यवस्था पूर्वपदावर येत नाही. उत्पादनाच्या कार्याला त्वरीत गती मिळू शकत नाही. अशावेळी वस्तू व सेवांच्या मागणीत प्रचंड वाढ झालेली असते. परंतू त्या प्रमाणात पुरवठा मात्र वाढत नसल्याने चलनवाढ घडून येते.

**३) अतिरिक्त चलननिर्मिती :-**

जर सरकारमार्फत अतिरीक्त चलनाची निर्माती होत असेल तरी देखी चलनपुरवठा वाढून चलनवाढ घडून येते.

**४) पूर्ण रोजगार पातळी :-**

जर अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगार पातळी असेल लोकांच्या उत्पन्नात वाढ घडून येते व त्यातून किंमत वाढ घडून चलनवाढ घडून येते.

**५) अतिरीक्त सरकारी खर्च :-**

राजकोषिय धोरणाचा एक भाग म्हणून सरकारने सार्वजनिक सुविधांवर मोठ्या प्रमाणात खर्च केल्याने लोकांच्या उत्पन्नात वाढ घडून खरेदीशक्तीत वाढ होते. परिणामतः मागणी वाढून चलनवाढ घडून येते.

**६) भांडवलाची सीमांत लाभक्षमता :-**

भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढल्यामुळे उत्पादकांमार्फत गुंतवणूकीत वाढ केली जाते. त्यातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होऊन लोकांच्या उत्पन्नात वाढ घडून येते. त्यामुळे मागणीत वाढ घडून चलनवाढ घडून येते.

**७) वाढती लोकसंख्या :-**

लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असेल तर अशा देशांमध्ये लोकांची मागणी वाढते मात्र मागणीच्या तूलनेने पुरवठा वाढत नाही त्यामुळे पुरवठ्याच्या टंचाईतून वस्तूंच्या किंमती वाढून चलनवाढ घडून येते.

**८) वाढती निर्यात :-**

विदेशी चलन मिळविण्याच्या अपेक्षेने स्वदेशी वस्तूंची निर्यात केली जाते. त्यातून स्वदेशी लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तूंची टंचाई निर्माण होऊन मागणीप्रेरीत चलनवाढ घडून येते.

वरील सर्व कारणांमूळे मागणीपेक्षा पुरवठा कमी राहील्याने मागणीप्रेरीत भाववाढ निर्माण होते. ही संकल्पना पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ४.१**

आकृतीत OX अक्षावर मागणी पुरवठ व उत्पादन तर OY अक्षावर किंमत पातळी दर्शविलेली आहे. S - S हा पुरवठा वक्र असून हा वक्र खालून वर धनात्मक उताराचा आहे. परंतू E या बिंदूत अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होऊन पुरवठा वक्र OY अक्षाला समांतर बनतो.

DD हा मागणीवक्र SS या पुरवठा वक्राला E या बिंदूत छेदतो. या संतूलन बिंदूच्या ठिकाणी उत्पादन ON व किंमत पातळी OP निश्‍चित होते. व या पातळीला अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला स्थिरावते.

समजा लोकांच्या मागणीत वाढ होत गेली. तर मागणीवक्र अनुक्रमे $D_1 D_1, D_2 D_2$ असे वरच्या दिशेने सरकतात व हे वक्र लंबरुप SS या पुरवढा वक्राला अनुक्रमे $E_1$ व $E_2$ बिंदूत छेदतात. त्यामुळे किंमत पातळी $P_1$ व $P_2$ अशी वाढलेली दिसून येते परंतू उत्पादन मात्र पुर्वीप्रमाणेच ON असा स्थिर राहील्याने किंमतीत वाढ घडून येते. यालाच मागणीप्रेरित भाववाढ असे म्हणतात.

## ४.५ खर्च प्रेरित चलनवाढ

केवळ मागणी अतिरिक्त व पुरवठा कमी असतांनाच मागणीने प्रेरित होऊन चलनवाढ घडून येऊ शकत नाही. तर अनेकदा अतिरीक्त मागणी नसतांना उत्पादन खर्चातील वाढीमूळे वस्तू-सेवांच्या पुरवठ्यावर परिणाम होऊन टंचाई निर्माण होऊन जी किंमत वाढ घडून येते तीलाच खर्च प्रेरित चलनवाढ असे म्हणतात. अशा प्रकारची किंमतवाढ पुढील दोन प्रकारची असू शकते.

### १) वेतनप्रेरीत :-

कामगार संघटनांनी आपल्या एकत्रित कामगार शक्तीतून वेतनात वाढ घडवून आणतात वाढीव वेतनामुळे मालकांच्या उत्पादन खर्चात वाढ घडून येते त्यामुळे वस्तूच्या किंमती वाढवून ही उत्पादन खर्चातील वाढ भरुन काढली जाते. परंतू किंमत वाढीबरोबर मात्र उत्पादन वाढत नसल्याने पुन्हा वस्तूंच्या किंमती वाढत जातात व पुन्हा श्रमिक वाढीव वेतनासाठी मालकवर्गावर दबाव टाकतात. ही प्रक्रिया सतत चालू राहून चलनवाढ घडून येते.

### २) नफा / लाभ प्रेरीत :-

अधिक नफा मिळविण्याच्या अपेक्षेने उत्पादक वर्ग वस्तूंच्या किंमती अधिक ठेवतात त्यातून जी किंमतवाढ घडून येते तीलाच नफा प्रेरित चलनवाढ असे म्हणतात.

## ४.६ चलनवाढीचे परिणाम

चलनवाढीचा थेट संबंध किंमत वाढीशी असल्याने अर्थव्यवस्थेवर चलनवाढीचे परिणाम व्यापाक स्वरुपात घडून येतात. अर्थव्यवस्थेवर चलनवाढीचे होणारे हे परिणाम पुढील प्रमाणे वर्गीकृत करता येतील.




### A) आर्थिक परिणाम :-

चलनवाढीमुळे दिसून येणारे आर्थिक परिणाम पूढील वेगवेगळ्या प्रकारांत वर्गीकृत करता येतात.

१) उत्पादनावरील परिणाम.

२) वितरणावरील परिणाम.

३) रोजगारावरील परिणाम.

४) आर्थिक विकासावरिल परिणाम.

### १) उत्पादनावरील परिणाम :-

अवास्तव चलनवाढ ही अनेकदा उत्पादन कार्यावर विपरीत परिणाम घडवून आणते ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) चलनवाढीमुळे उत्पादनात घट घडून येते.

२) चलनवाढीमूळे उत्पन्नातील अधिक हिस्सा खरेदी कार्यावर खर्च झाल्याने बचत – गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

३) आर्थिक विषमता वाढल्याने श्रीमंतांकडून चैनिच्या व ऐशआरामाच्या वस्तूच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळून जिवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण होते.

४) उत्पादनातील घटीमूळे सतत किंमती वाढू लागतात.

५) साठेबाजी, कृत्रिम टंचाई, काळाबाजार अशा अनिष्ट प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते.

६) कोणत्याही वस्तूला मागणी होत असल्याने वस्तू उत्पादनाच्या दर्जाकडे दुर्लक्ष होते.

७) अधिक नफा मिळविण्याच्या जिवघेण्या स्पर्धेत असक्षम उद्योग बंद पडतात.

## २) वितरणावरील परिणाम :-

चलनवाढीचा परिणाम अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या वर्गावर वेगवेगळा दिसून येतो. चलनवाढीचा हा परिणाम पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१) विक्रेतावर्ग :-** चलनवाढीचा सर्वाधिक फायदा विक्रेता वर्गाला अधिक किंमत मिळून होत असतो.

**२) ग्राहक वर्ग :-** पूर्वीच्या वस्तूंसाठी अतिरीक्त किंमत मोजावी लागल्याने ग्राहक वर्गाला चलनवाढीची सर्वाधिक झळ पोहोचते.

**३) उत्पादक :-** आपल्याकडील पूर्वीचेच उत्पादन वाढीव किंमतीला विकून उत्पादक वर्ग फायदा मिळवितो.

**४) स्थिर उत्पन्न गट :-** ठराविक निश्चित रक्कम वेतनाच्या स्वरुपात मिळविणाऱ्या या गटाला उत्पन्नापैकी अधिक हिस्सा वस्तू – सेवांवर खर्च करावा लागल्याने त्यांच्या राहणिमानाचा दर्जा घसरतो.

**५) शेतकरी :-** शेतकरी वर्गाला अतिरीक्त किंमती मिळून त्यांना चलनवाढ फायदेशी ठरते.

**६) सरकार :-** चलनवाढीच्या काळात निश्चित करांची रक्कम वाढत नसल्याने सरकारला कोणताच फायदा होत नाही.

## ३) रोजगारावरील परिणाम :-

वाढत जाणाऱ्या किंमती उत्पादकांना अधिक नफा मिळवून देतात त्यातून अशा उदयोगांमध्ये गुंतवणूकिला चालना मिळून नवीन उदयोजक वर्ग उत्पादन सुरु करण्यास प्रेरीत होतात. त्यातून कामगार वर्गाला रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

## ४) आर्थिक विकासावरील परिणाम :-

किंमतवाढ ही अर्थव्यवस्थेवर पुढील परिणाम घडवून आणते.

१) चलनवाढीमूळे उत्पादकांचा फायदा होऊन गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळते.

२) नफ्याचे प्रमाण वाढून उत्पादनात वाढ घडून येते.

३) रोजगार व उत्पन्न, बचत, गुंतवणूकीवर चलनवाढ अनुकूल परिणाम घडवून आणते.

४) चलनवाढीमूळे ज्या ग्राहक वर्गाला किंमतवाढीची झळ बसते त्यांची बचत प्रवृत्ती घटते.

५) लोकांची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढते.

**B) सामाजिक परिणाम :-**

चलनवाढ समाजावर चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम घडवून आणते. अर्थव्यवस्थेतील उत्पादन, रोजगार, बचत, गुंतवणूक वाढल्याने अर्थव्यवस्थेत भरभराट निर्माण होऊन सामाजिक संस्थांच्या निर्मितीला चालना मिळते.

**उदा.**

सामाजिक संस्था, NGO, शाळा, कॉलेज, क्लब इ. परंतू त्याचवेळी वाढती महागाई अनके वाईट सामाजिक परिणाम देखिल अनुभवास आणते. उदा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, गुन्हेगारी प्रकृत्ती, इ.

**C) राजकीय परिणाम :-**

भाववाढ ही काही राजकीय समस्यांनासुध्दा जन्म देते.

**उदा.**

आर्थिक विषमता, भ्रष्टाचार, कृत्रिम टंचाई, साठेबाजी, जिवघेणी स्पर्धा, काळाबाजार, नैतिक अध:पतन राजकीय अराजकता इ.

**D) नैतिक परिणाम :-**

वाढती चलनवाढ ही समाजाची नैतिकता घसरविण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे भ्रष्टाचार, व्यसनाधिनता, भेसळ व काळाबाजार, साठेबाजी, फसवणूक, चोरी, अफरातफर, सभ्यता, संस्कृती संस्कार ढासळणे इ. नैतिक अध:पतनास सामोरे जावे लागते.

## ४.७ चलनवाढ नियंत्रणाचे उपाय

चलनवाढीचे अर्थव्यवस्थेवर होणारे वरील सर्व प्रतिकूल परिणाम विचारात घेता अर्थव्यवस्थेवरील हे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी उपाय करता येतील. त्यांची वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

## चलनवाढ नियंत्रणाचे उपाय

A) चलनविषयक / मौद्रिक उपाय
B) राजकोषिय उपाय
C) इतर उपाय

### A) चलनविषयक (मौद्रिक) उपाय :-

चलनवाढीच्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेतील अतिरीक्त पैशाचे नियंत्रण करण्यासाठी देशातील मध्यवर्ती बँकेला पुढाकार घ्यावा लागतो. मध्यवर्ती बँक आपली मौद्रिक रणनीती अशा पद्धतीने आखते की ज्याद्वारे अर्थव्यवस्थेतील अतिरीक्त पैशाचे प्रमाण कमी होऊन भाववाढ आटोक्यात राहील. ज्या धोरणाद्वारे मध्यवर्ती बँक पैशाचा पुरवठा कमी जास्त करु शकते. त्या धोरणाला चलनविषयक धोरण (Monetary Policy) असे म्हणतात. मध्यवर्ती बँक पुढील साधनांचा वापर करुन चलनवाढ आटोक्यात आणू शकते.

### १) बँकरेट :-

मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना ज्या दराने कर्जपुरवठा करते त्या दराला बँकरेट असे म्हणतात. भाववाढीच्या परिस्थितीत मध्यवर्ती बँक बँकरेटमध्ये वाढ करते त्यामुळे व्यापारी बँकांसाठी मध्यवर्ती बँकेकडून उपलब्ध होणारे कर्ज महाग बनते परिणामत: व्यापारी बँकांची लोकांना कर्ज देण्याची क्षमता घटते व अर्थव्यवस्थेतील पैशाच्या अतिरिक्त पुरवठ्यावर मर्यादा निर्माण होते.

### २) खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी – विक्री :-

सरकारी कर्जरोख्यांमध्ये सुरक्षितता, नफा व रोखता यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याने व्यापारी बँका इतर आर्थिक संस्थ व काही व्यक्तींमार्फत या कर्जरोख्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते.

अशा कर्जरोख्यांची खरेदी-विक्री करण्याचे अधिकार सरकारची बँक या नात्याने मध्यवर्ती बँकेकडे असतात. मध्यवर्ती बँक चलनवाढीच्या परिस्थितीत या कर्जरोख्यांची विक्री करुन अर्थव्यवस्थेतील पैसा मोठ्या प्रमाणात स्वत:कडे आकर्षित करतात. त्यामुळे बाजारातील पैशाचे प्रमाण कमी होऊन खरेदी विक्रीच्या व्यवहारांचा वेग मंदावतात व आपोआप चलनवाढ नियंत्रित होण्यास मदत होते.

### ३) राखिव निधीचे प्रमाण :-

व्यापारी बँकांना आपल्याकडील ठेवींपैकी काही हिस्सा मध्यवर्ती बँकेकडे राखिव निधीमध्ये ठेवणे बंधनकारक आहे. हे प्रमाण मध्यवर्ती बँक वेळोवेळी बदलत असते. चलनवाढीच्या काळात राखीव निधीच्या प्रमाणात वाढ करुन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांकडील अतिरीक्त पैसा स्वत:जवळ ठेवते त्यातून बँकांची कर्जदेय क्षमता कमी राहून चलनवाढ नियंत्रित होण्यास मदत होते.

**४) निवडक पतनियंत्रण :-**

व्यापारी बँकानी आपल्याकडील उपलब्ध मौद्रिक साठा कोणत्या कार्यासाठी कर्ज म्हणून दयावा व कोणत्या क्षेत्राला कर्जे नाकारावीत याविषयी मध्यवर्ती बँक वेळोवेळी सुचना देऊन चलनवाढ नियंत्रित ठेवते.

**B) राजकोषिय उपाय :-**

सरकारच्या जमा व खर्चाशी संबंधित उपायांना राजकोषिय उपाययोजना म्हणतात. आधुनिक काळात चलनवाढ आटोक्यात आणण्यासाठी मध्यवर्ती बँकेच्या मौद्रिक धोरणाच्या समांतर पातळीवर राजकोषिय धोरणाची परिणामकारकतेचा प्रभाव देखिल महत्वाचा मानला जात आहे.

सरकार राजकोषिय धोरणाद्वारे पुढील साधनांचा वापर करुन चलनवाढ आटोक्यात आणते.

**१) सार्वजनिक कर :-**

सरकारच्या महसूलाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजेच कर होय. चलनवाढीच्या काळात सरकार करांचे व्यवस्थापन अशा पध्दतीने करते की ज्यामुळे लोकांच्या खरेदीशक्तीवर मर्यादा पडून चलनवाढ नियंत्रित होण्यास मदत होणे.

चलनवाढीच्या काळात सरकार वस्तू – सेवांच्या करांच्या दरात वाढ करुन किंवा प्रत्यक्ष करांमध्ये (Direct Tax) वाढ करुन लोकांचे वास्तव उत्पन्न कमी करुन खरेदीक्षमता नियंत्रित करते.

**२) सार्वजनिक खर्च :-**

सरकार सामाजिक हितासाठी कल्याणकारी कार्ये करते. त्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. परंतू सार्वजनिक खर्चातील ही वाढ चलनवाढीला आमंत्रण देणारी ठरते. अशावेळी सार्वजनिक खर्चात कपात करुन लोकांचे उत्पन्न व पर्यायाने त्यांची खरेदीक्षमता कमी होऊन किंमती नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

**३) सार्वजनिक कर्ज :-**

चलनवाढीच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त पैसा स्वत:कडे आकर्षित करण्यासाठी सरकार लोकांकडून कर्जे उभारते. त्यातून खरेदीशक्ती कमी होऊन भाववाढ आटोक्यात येण्यास मदत होते.

**४) वाढाव्याचे अंदाजपत्रक :-**

सरकारच्या महसूली उत्पन्न जास्त व खर्च कमी असलेले अंदाजपत्रक म्हणजेच वाढाव्याचे किंवा शिलकीचे अंदाजपत्रक होय. सरकारने चलनवाढीच्या काळात आपले

अंदाजपत्रक वाढाव्याचे राहिल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे सरकारचा खर्च कमी राहील्याने खर्चाच्या स्वरुपात जनतेपर्यंत पोहोचणारे उत्पन्न कमी राहून भाववाढ आटोक्यात आणता येते.

**C) इतर उपाय :-**

**१) उत्पादन वाढविणे :-**

ज्यावेळी मागणी जास्त परंतू मागणीच्या तुलनेने वस्तूचे उत्पादन कमी राहते. तेव्हा चनलवाढीला प्रोत्साहन मिळते म्हणूनच उत्पादनात वाढ घडवून आणल्यास वस्तू – सेवांच्या किंमती कमी होऊन भाववाढ आटोक्यात येण्यास मदत होते.

**२) किंमत नियंत्रण :-**

सरकारने स्वतःच्या अधिकारांचा वापर करुन कायदेशिर मार्गाने काळाबाजार, साठेबाजी, भ्रष्ट्राचार, कृत्रिम टंचाई यासारख्या बाजातील अपप्रवृत्तींचा बंदोबस्त केल्या किंमत नियंत्रित होण्यास मदत होईल.

**३) सार्वजनिक वितरण व्यवस्था :-**

सरकारच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत टंचाईजन्य वस्तू किंवा अत्यावश्यक महाग वस्तूंची जनतेला कमी किंमतीत उपलब्धता करुन दिल्यास भाववाढीची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

## ४.८ फिलिप्स वक्र

चलनवाढ व बरोजगारी यामध्ये व्यस्त संबंध असून ज्यावेळी चलनवाढ उच्च प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर अल्प असतो, याऊलट ज्यावेळी चलनात कमी प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर प्रचंड असतो. असे मत प्रा. फिलिप्स यांनी मांडले. फिलिप्स यांनी इस. १८६१-१९५७ या काळातील इग्लंड या देशातील श्रमिकांच्या वेतनदराचा सखोल अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की इग्लंलमध्ये चलनवाढ आणि बेरोजगारी यामध्ये सहसंबंध असून तो व्यस्त प्रमाणात बदलणारा आहे.

चलनवाढ ज्यावेळी जास्त त्यावेळी बेरोजगारी कमी व चलनवाढ ज्यावेळी कमी त्यावेळी बेरोजगारी अधिक अशी विरोधी परिस्थिती असल्याने सरकारपुढे एक महत्वाचा प्रेच निर्माण होतो व तो म्हणजेच चलनवाढ आणि बेरोजगारी ह्या दोन्ही समस्याच आहेत. परंतू समजा सरकारचा उद्देश महागाई कमी करणे हा असेल तर सरकारला काही प्रमाणात बेकारी सहन करावी लागेल आणि जर बेरोजगारी कमी करायची असेल तर चलनवाढीला सामोरे जावे लागेल. अशावेळी सरकारला काही प्रमाणात चलनवाढ सहन करुन बेरोजगारीचा दर कमी करता येणे शक्य आहे.

प्रा. फिलिप्स यांनी चलनवाढ आणि बेरोजगारीचा दर यातील परस्पर संबंध स्पष्ट करण्यासाठी एका वक्राचा आधार घेतला. या वक्रालाच फिलिप्स वक्र असे म्हणतात. फिलिप्स वक्र हा चलनवाढ व बेरोजगारी यातील व्यस्त संबंध दर्शवितो. हेच पुढील आकृतिद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ४.२**

वरील आकृतीत OX अक्षावर बरोजगारीचा दर व OY अक्षावर चलवाढीचा दर दर्शविला आहे 'ब' बिंदू हा नैसर्गिक बेरोजगारीचा दर दर्शवितो. या पातळीला चलनवाढीचा दर शून्य असतो.

सरकारच्या समग्र धोरणाद्वारे जर अर्थव्यवस्थेत एकूण मागणीत वाढ घडून येते त्यामुळे चलनवाढ घडून येते ही चलनवाढ च-च१ अशी दिसून येते परंतू त्यामुळे उत्पादनात वाढ व रोजगार संधीमध्ये वाढ घडून आल्याने बेरोजगारीचा दर ब-ब१ असा घटलेला दिसून येतो.

याचाच अर्थ सरकारला बेरोजगारी कमी करायची असेल तर भाववाढ सहन करावी लागेल. अशा प्रकारे फिलिप्स यांनी फिलिप्स वक्रा द्वारे बेरोगारी व चलनवाढ यातील व्यस्त संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ४.९ प्रश्न

**१) संकल्पना स्पष्ट करा.**

अ) चलनवाढ.

ब) खुली आणि दडलेली चलनस्फिती.

क) खर्च प्रेरित चलनवाढ.

## २) सविस्तर उत्तरे लिहा.

अ) चलनवाढ म्हणजे काय? किंमत वाढीवरुन निर्माण होणारे चलनवाढीचे प्रकार सविस्तर लिहा.

ब) चलनवाढ निर्माण होण्याच्या कारणावरुन चलनवाढीचे प्रकार वर्गीकृत करा.

क) मागणी प्रेरित चलनवाढ म्हणजे काय ते स्पष्ट करा ?

ड) चलनवाढीच्या परिणामांवर भाष्य करा.

इ) चलनवाढ आटोक्यात आणण्याचे मौद्रिक उपया लिहा.

फ) बेरोजगारी आणि चलनवाढ यातील संबंध फिलिप्स वक्राद्वारे स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ५

# प्रकरण ३

# बँक आणि वस्तू व मुद्रा बाजारातील समन्वय

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टये
५.१ प्रस्तावना
५.२ बँकेचा अर्थ आणि व्याख्या
५.३ बँकांची रोखता आणि लाभक्षमता
५.४ रोखता आणि लाभक्षमता
५.५ पैसा गुणक
५.६ पैसा गुणक प्रक्रिया
५.७ प्रश्न

## ५.० उद्दिष्टये

- व्यापारी बँक ही संकल्पना समजून घेणे.
- बँकांची रोखता व लाभक्षमता म्हणजे काय हे जाणून घेणे.
- रोखता आणि लाभक्षमतेतील समन्वय अभ्यासणे.
- पैसा गुणक संकल्पना समजून घेणे.
- पैसा गुणकाव्दारे पतनिर्मिती कशी घडून येते हे अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

आधुनिक काळात आर्थिक व्यवहार प्रचंड प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. अशा वेळी देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी बँकांचे महत्व अनन्य साधारण बनले आहे. अर्थव्यवस्थेतील बचतीचे एकत्रिकरण करणे व ही बचत प्रार्थमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र व सेवा क्षेत्र यांच्याकडे प्रवाहीत करुन देशाचा जलद विकास घडवून आणणे हे बँकांचे महत्वाचे कार्य आहे. म्हणूनच आधूनिक काळात व्यापारी बँकांना 'अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहीन्या' असे संबोधले जाते.

## ५.२ बँकेचा अर्थ आणि व्याख्या

बँकेच्या उत्क्रांतीस २०० वर्षापेक्षा अधिक जूना इतिहास आहे. परंतू कालखड आणि आर्थिक व्यवहारातील बदल यातून बँकेची कार्ये आणि व्यवहार यामध्ये सतत बदल घडून आलेला आहे.

Bank हा इंग्रजी शब्द इटालीयन भाषेतील Banco या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ Bench (बाक) असा होतो. Banco या शब्दावरुन पुढे Bank हा शब्द प्रचलित झाला. यावरुन पैशाची देवाणघेवाण करणारे, कर्ज देणारे लोक म्हणजे बँक होय असे मानले जाऊ लागले.

Bank ही संकल्पना समजण्यासाठी बँकेच्या पुढील काही व्याख्यांचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

**१) प्रा. क्राऊथर :-**

'जी व्यक्ती किंवा संस्था स्वतःचे व इतरांचे कर्जव्यवहार पाहते त्यांना बँक असे म्हणतात.'

**२) प्रा. सेअर्स :-**

'ज्या संस्थेची कर्जे इतर लोक परस्परांची देणी देण्यासाठी मान्य करतात अशी संस्था म्हणजेच बँक होय.'

**३) बँकिंग कंपनी कायदा १९४५ नुसार :-**

'लोकांकडून मागताक्षणी परत करण्याच्या अटीवर किंवा धनादेश, डीमान्ड ड्राफ्ट इ. साधनांच्या आधारे पैसे काढून देण्याच्या अटीवर ठेवी स्वीकारणाऱ्या संस्था म्हणजे बँक होय.'

थोडक्यात लोकांकडून मागताक्षणी परत करण्याच्या अटींवर ठेवी स्वीकारणारी आणि कर्जे उपलब्ध करुन देणारी संस्था म्हणजेच बँक होय.

अर्थव्यवस्थेतील अतिरीक्त पैसा, ठेवी किंवा बचतीच्या माध्यमातून गोळा करणे व तो गरजू व्यक्तींना कर्जाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचे महत्वाचे कार्य बँकांना करावे लागते. ज्यावेळी बँका ठेवी स्वीकारतात तेव्हा बँकांचे दायित्व (Liability) वाढते आणि बँक ऋणको बनते. आणि जेव्हा बँक कर्जे देते तेव्हा तिची जिंदगी (मालमत्ता) (Asset) वाढल्याचे ती धनको बनको बनते.

बँकाच्या ताळेबंदात (Balance Sheet) देयता (दायित्व) आणि मालमत्ता (जिंदगी) पुढील प्रमाणे दाखवली जाते.

| देयता | | मालमत्ता | |
|---|---|---|---|
| १) | भांडवल | १) | केंद्रिय बँकेकडील ठेवलेली रोख रक्कम. |
| २) | राखिव निधी | २) | वटविण्यात आलेल्या हुंडया. |
| ३) | ठेवी | ३) | अती अल्पकालीन कर्जे. |
| ४) | ग्राहकांसाठी स्विकारलेली देयता. | ४) | गुंतवणूक. |
| | | ५) | ग्राहकांसाठी स्विकारलेली देयता. |
| | | ६) | फर्निचर. |
| | | ७) | इमारत व परिसर. |

बँकेच्या मालमत्तेच्या बाजूचा विचार केल्यास १ पासून ७ पर्यंतच्या प्रकारच्या गुंतवणूकीकडे जात असतांना गुंतवणूकीपासून मिळणारे उत्पन्न क्रमाक्रमाने वाढत गेलेले दिसते. बँकांना आपला आपला व्यवस्थापन खर्च भागेल, लोकांच्या ठेवींवर व्याज देता येईल. भागधारकांना लाभांश देता येईल येवढे उत्पन्न त्यांनी केलेल्या गुंतवणूकांपासून मिळेल हे पहावे लागते. तसेच ठेवीदारांच्या ठेवी त्यांना परत मागताक्षणी देता येतील इतकी रोखता ठेवावी लागते.

बँकांजवळ असलेली मालमत्ता जेवढी जास्त असले तेवढा बँकांचा आत्मविश्वास वाढतो. परंतू नफा मात्र कमी होतो.

## ५.३ बँकांची रोखता आणि लाभक्षमता (Liquidity and Profitability of Banks)

व्यापारी बँकांची रोखता आणि लाभक्षमता ही बँकांच्या कार्यपध्दतीची मूलभूत तत्वे आहेत. या संकल्पना पुढील प्रमाणे स्पष्ट करतो येतील.

### १) रोखता :- (Liquidity)

बँकेकडून ठेवीदारांनी मागणी करताक्षणी रोख स्वरुपात परत करण्याची बँकेची क्षमता म्हणजेच रोखता होय. बँका लोकांकडून ठेवी स्विकारतांना नेहमीच लोकांनी किंवा ठेवीदारांनी रोख रकमेसाठी मागणी करताच त्यांची पूर्तता करता येण्यासाठी आवश्यक रक्कम स्वतःकडे बँका बाळगतात.

ठेवीदार बँकेकडे मागणी करताक्षणी परत करण्याच्या अटीवर बचत ठेवी आणि चालू ठेवींमध्ये पैसा ठेवतात. अशा वेळी जर मागणी करताच बँका ठेवीदारांचा पैसा परत करण्यात असमर्थ ठरल्या तर लोकांचा बँक व्यवस्थेवरील विश्वास उडून बँकांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते. अशा परीस्थितीत अनेकदा बँकांचे दिवाळेसुध्दा निघू शकते.

### २) लाभता (Profitability) :-

ठेवीदाराने मागताक्षणी त्याला पैसे परत देता यावेत इतपत रोखता बाळगून बँका आपल्याकडे जमा झालेल्या ९०% ठेवी वेगवेगळ्या प्रकारची कर्जे देणे, हुंडया वटविणे, शेअर्स खरेदी, गुंतवणूक करणे अशा वेगवेगळ्या करणांसाठी देतात की ज्यातून बँकांना नफा किंवा लाभ मिळविता येतो. बँकेला व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांचे वेतन, स्टेशनरी यावर होणारा खर्च भागविण्यासाठी बँकेला आपली लाभक्षमता अधिक ठेवावी लागते. म्हणूनच बँकांना केवळ रोखते बरोबरच लाभतेकडे देखील लक्ष देणे महत्वाचे आहे.

म्हणजेच बँकेची रोखता बँकेला नफा मिळवून देत नाही आणि बँकेची गुंतवणूक बँकेला नफा मिळवून देते. परंतू त्यात रोखतेचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येते. म्हणूनच आपल्याला असे म्हणता येईल की रोखता आणि लाभता ही बँकेची दोन परस्पर विरोधी परंतू महत्वाची तत्वे आहेत.

## ५.४ रोखता आणि लाभक्षमता

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की रोखता व लाभता हे दोन्ही परस्पर विरोधी तत्व आहेत. बँकांच्या विकासासाठी या दोन्ही तत्वामध्ये योग्य समन्वय साधला जाणे आवश्यक आहे. यामध्ये समन्वय साधण्यासाठी व्यापारी बँकांकडून ज्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक केली जाते. त्याचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

### १) रोख रक्कम :-

ग्राहकांनी बँकेकडून ठेवलेल्या ठेवींपैकी मागताक्षणी परत करता याव्यात यासाठी बँका स्वतःजवळ काही रक्कम रोख स्वरुपात जवळ बाळगतात. यामध्ये नोटा आणि नाण्यांचा समावेश होतो. ठेवीदारांना मागणी करतात परत करण्यासाठी किती रक्कम जवळ बाळगावी हे प्रत्येक बँक स्वतःच्या पैसाच्या मागणीच्या पुर्व अनुभवावरुन ठरविते. साधारणतः बँका ७% पासून १०% पर्यंत रोख रक्कम स्वतःजवळ बाळगतात.

### २) याचना कर्जे / अती अल्प मुदत कर्जे :-

बँकामार्फत शेअर बाजारातील रोख्यांची व्यवहार करण्याऱ्या दलालांना किंवा इतर बँकांना आपले व्यवहार पार पाडण्यासाठी काही तास किंवा एक दिवस मुदतीची अल्पमुदत (याचना) कर्जे उपलब्ध करुन दिली जातात. याचना करताच ही कर्जे बँकेला अती अल्प काळात उपलब्ध होतात. तसेच त्यावर बँकांना अल्प प्रमाणात नफा सुध्दा मिळतो त्यामुळे या कर्जामध्ये रोखता सुध्दा असते व लाभता सुध्दा असते.

### ३) दिर्घकालीन कर्जे :-

बँका नफ्याने प्रेरीत होऊन उदयोजक किंवा व्यापारी तसेच शेअर बाजारात दीर्घकालीन गुंतवणूक करतात. अशा कर्जावर मिळणारा व्याज किंवा लाभांश भरपूर अधिक असल्याने अशा दीर्घकालीन कर्जात लाभता मोठ्या प्रमाणात असते. परंतू

दीर्घकालावधीसाठी पैसा गुंतवून ठेवल्याने तो त्वरीत परत मिळत नाही. त्यामुळे त्यामध्ये रोखतेची प्रमाण कमी दिसून येते.

**४) बँकांची गुंतवणूक :-**

बँका सरकारी उपक्रमांच्या कर्जरोख्यांमध्ये व खाजगी कंपन्यांच्या शेअर्स मध्ये गुंतवणूक करतात. त्यातून त्यांना लाभांशाच्या रुपाने उत्पन्न मिळते. अशा प्रकारच्या गुंतवणूकीमध्ये लाभता जास्त परंतू रोखता कमी असते.

**५) हुंड्यांची वटणावळ :-**

बँका तीन महिने मुदतीच्या हुँड्यांची वटणावळीची सुविधा उपलब्ध करुन देतात त्या मोबदल्यात त्यांना नफा मिळतो परंतू हुंड्यांमध्ये योजना कर्जापेक्षा रोखता कमी असते.

## ५.५ पैसा गुणक (Money Multiplier)

विशिष्ट कालखंडात पैशाच्या पुरवठ्यात घडून येणाऱ्या बदलांचा अभ्यास पैसा गुणकाव्दारे करता येतो. पैसा गुणक ही संकल्पना उच्चशक्ती पैसा (High Power Money) या संकल्पनेवर आधारलेली आहे.

उच्चशक्ती पैसा म्हणजेच अर्थव्यवस्थेत परिचलनात असणारे चलन आणि बँकांकडूल राखीव निधी यांना एकत्रितपणे उच्चशक्ती पैसा असे म्हणतात. पैसा गुणक सिध्दांत हा उच्चशक्ती पैशाची मागणी आणि पुरवठा यावर आधारीत आहे.

**पैसा गुणक - व्याख्या :-**

'पैसा गुणक (मुद्रा गुणक) म्हणजेच पैसाचा साठा व उच्चशक्ती पैसाचा साठा यांचे गुणोत्तर होय'.

**सुत्र रुपाने :-**

$$M = \frac{M}{H}$$

M = पैसा गुणक
M = पैशाचा साठा / पुरवठा
H = उच्चशक्ती पैसा

अर्थव्यवस्थेत एका विशिष्ट काळातील पैशाचा पुरवठा पैसा गुणकाव्दारे व उच्चशक्ती काढता येतो.

**सुत्र :-**

पैसाचा एकूण पुरवठा = पैसा गुणक × उच्चशक्ती पैसा.

$$M = m \times H$$

## ५.६ व्यापारी बँका आणि पैसा गुणकाची प्रक्रिया

व्यापारी बँका आपल्या ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देणे या कार्यातून पतनिर्मितीचे महत्वाचे कार्य करते. पतनिर्मीतीच्या या कार्यातून अर्थव्यवस्थेतील एकूण पैसाच्या प्रमाणात कोणताही बदल घडून येत नाही. जेव्हा एखादा कर्जदार कर्ज घेण्यासाठी बँकेकडे जातो. तेव्हा बँक त्याला रोख स्वरुपात कर्ज न देता त्याच्या नावे बँकेत खाते उघडून त्या खात्यात कर्जाची रक्कम जमा करते. अशा ठेवींना दुय्यम ठेवी असे म्हणतात. अशा ठेवीमूळे अर्थव्यवस्थेतील एकूण पैशाच्या पुरवठयावर काहीच परिणाम होत नसून उलट लोकांची खरेदीशक्ती या दुय्यम ठेवीतून वाढत असते. ठेवीदार देखिल आपल्या खात्यातील सर्वच्या सर्व रक्कम एकाचवेळी काढत नाही. ठेवीदाराने मागणी करताच त्याची पैशाची मागणी पूर्ण करण्यासाठी काही रक्कम बँका स्वतःजवळ रोख स्वरुपात बाळगतात. सर्वसाधारणतः व्यापारी बँका आपल्याकडे एकूण प्राथमिक ठेवींच्या १०% रक्कम रोख स्वरुपात ठेऊन उरलेली ९०% रक्कम कर्ज देण्यासाठी वापरतात. या ९०% रकमेच्या सहाय्याने दुय्यम ठेवी निर्माण केल्या जातात.

व्यापारी बँकांच्या पत निर्मितीचे कार्य कसे चालते हे पुढील उदाहरणाव्दारे स्पष्ट करता येईल.

**उदा.**

समजा SBI या व्यापारी बँकेमध्ये 'अ' या ठेवीदाराने २०,००० रु. रोख स्वरुपात ठेवले आहेत. ह्या बँकेच्ये प्रार्थमिक ठेवी होय. या ठेवीतून 'अ' हा ठेवीदार आपले पैसे केव्हाही काढू शकतो परंतू आपण असे गृहीत धरु की ग्राहक १०% रक्कमच काढून उर्वरीत ९०% रक्कम तो बँकेतच जमा ठेवतो.

अशा वेळी एकूण ठेवीपैकी १०% रोख स्वरुपात स्वतःजवळ बाळगून उर्वरीत ९०% रक्कम कर्ज म्हणून देऊ शकतात.

समजा SBI ने 'ब' या व्यक्तीला ९०% रक्कम म्हणजेच १८००० रु. कर्ज मंजूर करुन १०% म्हणजेच २००० रु. स्वतःकडे रोख स्वरुपात जवळ बाळगले तर १८००० रु. ही 'ब' व्यक्तीची प्रार्थमिक ठेव झाली. या १८००० रु. पैकी १०% म्हणजेच १८०० रु. रोख स्वरुपात स्वतःजवळ ठेऊन बँक उर्वरीत ९०% रक्कम १६,२०० रु. इतकी रक्कम 'क' या व्यक्तीला कर्ज म्हणून मंजूर केले जाऊ शकेते.

अशा पध्दतीने क्रमाक्रमाने कर्जाच्या स्वरुपात ठेवी निर्माण करतात. अशा पध्दतीने रोख २०००/- रु. च्या सहय्याने २०,००० रु. कर्जे देता येतील. या २००० रु. तून २००० रु. मूळची प्रार्थमिक ठेव वजा केल्यानंतर उरलेले १८,००० रु. म्हणजे बँकेने निर्माण केलेला पतपैसा होय.

## ५.७ प्रश्न

**प्रश्न १ संकल्पना स्पष्ट करा.**

अ) व्यापारी बँक.

ब) रोखता.

क) लाभता.

ड) पैसा गुणक.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) व्यापारी बँकेची देयता आणि मालमत्ता यातील फरक लिहा.

ब) बँकांची रोखता आणि लभता यातील समन्वयय स्पष्ट करा.

क) पैसा गुणकाव्दारे व्यापारी बँका पतपैसा कसा निर्माण करतात ?

❖❖❖❖

# ६

# मौद्रिक धोरण आणि राजकोषिय धोरण

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ चलनविषयक धोरणाची उद्दिष्ट्ये

६.३ मौद्रिक धोरणाची साधने

६.४ राजकोषिय धोरण

६.५ राजकोषिय धोरणाची उद्दिष्ट्ये

६.६ राजकोषिय धोरणाची साधने

६.७ IS - LM प्रतिमान

६.८ वस्तू बाजार आणि IS वक्र

६.९ मुद्रा बाजार व LM वक्र

६.१० IS - LM एकत्रित संतूलन

६.११ IS - LM वक्रातील बदल

६.१२ प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये

- चलनविषयक धोरण म्हणजे काय हे जाणून घेणे.
- चलनविषयक धोरणाच्या साधनांचा अभ्यास करणे.
- राजकोषिय धोरण व साधने यांचा अभ्यास करणे.
- IS – LM प्रतिमान समजून घेणे.
- IS – LM वक्रात होणारे बदल जाणून घेण.

## ६.१ प्रस्तावना

१९३० च्या महामंदीनंतर लॉर्ड केन्स यांनी सर्वात प्रथम मौद्रिक धोरणाची परिणामकारकता सिध्द करुन दाखवली. अर्थव्यवस्थेतील किंमत स्थिरता, रोजगार प्राप्ति, आर्थिक वृध्दी इ. उद्दिष्टप्राप्तीसाठी राजकोषियक धोरणाबरोबरच मौद्रिक धोरणाला देखिल महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. मौद्रिक धोरणालाच चलनविषयक धोरण

किंवा नाणेविषयक नीती असेही म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याचे मध्यवर्ती बँकेच्या हातातील महत्वाचे साधन म्हणजेच चलनविषयक धोरण होय.

मौद्रिक धोरण ही संकल्पना पुढील व्याख्यांव्दारे अधिक स्पष्ट करता येईल.

**१) प्रा. ए. जी हॉर्ट :-**

"पैशाच्या साठ्यावर किंवा लोकांच्या पैशाच्या मागणीवर प्रभाव टाकणाऱ्या आणि सार्वजनिक रोखतेची स्थिती बदलणाऱ्या धोरणास चलनविषयक धोरण असे म्हणतात."

**२) प्रा. हॅरी जॉन्सन :-**

"आर्थिक धोरणाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँकेच्या पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याचे एक साधन म्हणजे चलनविषयक धोरण होय."

थोडक्यात अर्थव्यवस्थेची महत्वाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी केंद्रिय बँकेकडून जे प्रयत्न केले जातात त्यांना चलनविषयक धोरण असे म्हणतात. या धोरणाची आखणी व अंमल बजावणी करण्याची जबाबदारी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे असते.

## ६.२ चलनविषयक धोरणाची उद्दिष्ट्ये

स्थळ, काळ सापेक्ष प्रत्येक देशाची मौद्रिक धोरणाची उद्दिष्ट्ये वेगवेगळी असू शकतात. परंतू तरीदेखिल आर्थिक धोरणाची विविध उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मौद्रिक धोरणाचा योग्य वापर करता येतो. कोणत्याही देशातील चलनविषयक धोरणाव्दारे त्या देशातील मध्यवर्ती बँकेला पुढील काही महत्वाची उद्दिष्ट्ये साध्य करता येतात.

**१) आर्थिक वृध्दीचा अपेक्षित दर साध्य करणे :-**

कोणत्याही देशाच्या जलद आर्थिक वृध्दीमूळे त्या देशातील राष्ट्रीय उत्पन्न, बचत उपभोग, गुंतवणूक, इ. मध्ये वाढ घडून येते. परंतू त्यासाठी जास्तित जास्त बचत, गुंतवणूक व भांडवलाची गरज असते. मौद्रिक धोरणाचा एक महत्वाचा उद्देश म्हणजेच प्रार्थमिक, व्दीतीय आणि सेवा व पायाभूत क्षेत्रांना पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे हा होय. यासाठी अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बचत गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी बँका व वित्तीय संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरवून बँकांना ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देण्यास प्रवृत्त करण्यासाठी मौद्रिक धोरण मदत करते.

मध्यवर्ती बँकेच्या कर्जपुरवठ्यातून नवीन रोजगार संधी उपलब्ध होतात. त्यातून मागणी वाढून वित्तीय व्यवहारांचा वेग वाढू लागतो व त्यातून आर्थिक विकासाल गती मिळू लागते.

## २) किंमत स्थैर्य :-

सुवर्ण परिमाण अस्तित्वात असेपर्यंत विनिमय दर स्थिर ठेवणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट्ये समजले जात असे परंतू अलिकडील काळात देशातील किंमतपातळी स्थिर ठेवणे म्हणजेच देशांतर्गत पैसाचे अंतर्गत मूल्य स्थिर ठेवून भाववाढ किंवा भावघट यातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढून अर्थव्यवस्थेत किंमत स्थिरता निर्माण करणे हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये समजले जाते.

भाववाढ किंवा भावघट टाळण्यासाठी किंमत स्थैर्य असणे अत्यंत आवश्यक असते. किंमत जर स्थिर असेल तर उत्पादन व रोजगारात वाढ घडून येते.

मध्यवर्ती बँक आपल्या मौद्रिक धोरणाव्दारे भाववाढीच्या परिस्थितीवर किंवा भावघटीवर संख्यात्मक किंवा गुणात्मक साधनांव्दारे नियंत्रण ठेवून किंमत स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते.

## ३) विनिमय दर स्थिरता :-

१९ व्या शतकाच्या प्रारंभी विदेशी व्यापार सतत वाढत होता. त्याचवेळी सूवर्ण चलन परिमाण पध्दती अस्तित्वात होती. त्यावेळी देशातील चलनाचे इतर देशातील चलनाच्या संदर्भात असलेले बाह्य मूल्य (विनिमय दर) स्थिर ठेवणे हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये मानले गेले. परंतू सुवर्ण चलन पध्दती जाऊन आता कागदी चलन पध्दतीमध्ये हा विनिमयदर स्थिर ठेवणे मध्यवर्ती बँकेला अवघड बनले आहे. परंतू विनिमयदरात स्थिरता ठेवण्याची ही जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे सूपूर्त करण्यात आलेली आहे.

विदेशी व्यापारात वाढ घडवून आणून देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी विनिमय दरात स्थिरता असणे अत्यंत महत्वाचे आहे. मध्यवर्ती बँक आपल्याकडील विदेशी चलन साठ्यात आवश्यक ते बदल करुन विनिमयाचा दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यातून सट्टेबाजी सारख्या प्रकारांना आपोआप आळा बसतो.

## ४) पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे :-

कोणत्याही देशाचे मुख्य उद्दिष्ट्ये अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे असते म्हणजेच आर्थिक कल्याणाबरोबरच देशातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार पुरविणे होय. लॉर्ड केन्स यांनी महामंदीतून बाहेर पडण्यासाठी रोजगार वाढ हा उपाय सुचविलेला होता.

उपलब्ध वेतनदरावर ज्यांची काम करण्याची इच्छा व क्षमता आहे. अशा सर्वाना काम (रोजगार) मिळणे म्हणजेच पूर्ण रोजगार होय. लोकांना रोजगार मिळाल्यास त्याचे उत्पन्न वाढून मागणी वाढून राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

मौद्रिक धोरणाव्दारे व्याजदारात बदल करुन भांडवलाची कार्यक्षमता वाढविल्यास गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळून उत्पादन वाढीस चालना मिळेल व उत्पादन वाढीतून उदयोग वाढीस लागून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करता येतील.

### ५) तटस्थ पैसा :-

प्रा. हायेक, विकस्टीड, रॉबर्टसन, कोपमन इ. अर्थतज्ञांनी 'तटस्थ पैसा' हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये सुचविले आहे.

अर्थव्यवस्थेत खरेदी – विक्रिच्या व्यवहारासाठी जितका पैसा आवश्यक आहे. तीतकाच पैसा चलनात ठेवणे म्हणजे तटस्थ पैसा होय. पैशाचा परिणामकारक पुरवठा स्थिर ठेवला तर किंमतपातळीवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. या स्थितीत पैसा विनिमयाचे माध्यम म्हणून काम करतो तर पैशाचा किंमतीवर परिणाम होत नाही.

### ६) व्यवहार तोल संतूलन :-

दोन देशातील आयात – निर्यात व्यवहारांचा मांडलेला लेखाजोखा म्हणजेच व्यवहार तोल होय. कोणत्याही देशाचा प्रमुख उद्देश हा आयात व निर्यात व्यापारात म्हणजेच व्यवहारतोलात संतूलन ठेवणे हा असतो. जर आयात जास्त व निर्यात कमी असेल तर त्या देशाच्या व्यवहारतोलात तूट निर्माण होते. ही तूट वाढत गेल्यास तूटीची भरपाई करण्यासाठी विदेशी कर्जे काढावी लागतात. त्यातून देश कर्जाच्या सापळ्यात अडकण्याची शक्यता असते.

जर मौद्रिक धोरणाव्दारे किंमत स्थिर ठेवण्यात यश आले तर देशाची निर्यात वाढून व्यापारी तूट कमी होऊन वाढाव्याची परिस्थिती निर्माण होईल. थोडक्यात मौद्रिक धोरणाव्दारे देशाच्या व्यवहार तोलातील असंतूलन दुर करणे हे महत्वाचे उद्दिष्ट्ये पूर्ण करता येते.

### ७) आर्थिक विकास :-

उत्पादन क्षमता व चलनाची एकूण मागणी यांत योग्य समन्वय साधावा लागतो. अनेकदा कर्जपुरवठ्यावर नियंत्रण ठेवावे लागते. किंवा चलनघटीचा धोका असेल तर कर्ज पुरवठ्याला प्रोत्साहन दयावे लागते. आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बचत गुंतवणूकीला योग्य असे वातावरण निर्माण करावे लागते.

## ६.३ मौद्रिक धोरणाची साधने (पतनियंत्रणाचे मार्ग)

अर्थव्यवस्थेतील पतपैशावर नियंत्रण ठेवण्याचे महत्वाचे कार्य त्या देशातील मध्यवर्ती बँकेला पार पाडावे लागते. मध्यवर्ती बँकेच्या मौद्रिक धोरणाव्दारे अर्थव्यवस्थेतील पतचलन निर्मितीचे नियमन करता येते. त्यासाठी मध्यवर्ती बँकेला ज्या साधनांचा वापर करावा लागतो त्यांचे पुढील दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

**मौद्रिक धोरणाची साधने**

**संख्यात्मक साधने**

१) बँक रेट
२) खुल्या बाजारात रोख्यांची खरेदी-विक्री
३) रोख राखिव निधीचे प्रमाण

**गुणात्मक साधने**

१) कर्ज तारण यातील अंतर वाढविणे
२) विशिष्ट कामासाठी कर्ज देणे.
३) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण.
४) कर्ज वाटप धोरण.
५) प्रत्यक्ष कारवाई.
६) नैतिक समजावणी.
७) प्रसिध्दी.

## अ) संख्यात्मक साधने :-

पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने म्हणजेच अशी साधने की ज्या व्दारे देशातील एकूण पतपैशाची संख्या प्रभावित केली जाते. या साधनांचा वापर करुन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवते. या साधनांना पतनियंत्रणाची ‘सामान्य साधने’ असेही म्हटले जाते.

## १) बँकरेट :-

देशातील मध्यवर्ती बँक ज्या दराने व्यापारी बँकांना कर्जे देते त्या व्याजाच्या दराला बँकरेट असे म्हणतात. तसेच ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या हुंडयांची वटणावळ किंवा पुनर्वटणावळ करुन देते त्या वटावदाराला बँकरेट असे म्हणतात.

बँकेरेटच्या प्रमाणात परिस्थितीनुसार बदल करुन मध्यवर्ती बँक पतचलनाचे नियंत्रण करते. जर अर्थव्यवस्थेत पैशाचे प्रमाण वाढलेले असेल व ते नियंत्रित करायचे असेल तर मध्यवर्ती बँक बँकरेट मध्ये वाढ करते. त्यामुळे मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना जी कर्जे दिली जातात ती महाग बनल्याने व्यापारी बँका कर्ज वाटप कमी प्रमाणात करतील परिणामतः अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण आपोआप नियंत्रित होईल.

या उलट जर अर्थव्यवस्थेत पतनिर्मितीला चालना दयायची असेल तर मध्यवर्ती बँक बँकरेट मध्ये घट करेल. त्यामुळे व्यापारी बँकांना मध्यवर्ती बँकेकडून मिळणारे कर्जे स्वस्त बनल्याने व्यापारी बँकांची कर्जवाटप क्षमता अधिक राहून अर्थव्यवस्थेत पतपैशाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

## २) खुल्या बाजारातील कर्जरोख्यांची खरेदी विक्री :-

या साधनाचा वापर करुन मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील पतनियंत्रणाची जबाबदारी पूर्ण करते. त्यासाठी सरकारी उपक्रमांच्या कर्जरोख्यांची जाणीवपूर्वक मध्यवर्ती बँकेमार्फत खरेदी – विक्री केली जाते.

ज्यावेळी अर्थव्यवस्थेत पैशाचे प्रमाण वाढते त्यावेळी मध्यवर्तीबँक व्यापारी बँकांकडील आणि सर्वसामान्य लोकांकडील पैसा स्वतःकडे घेण्यासाठी सरकारी कर्जरोख्यांची व्यापारी बँका व व्यक्तींना विक्री करते त्यामुळे आपोआप त्यांच्याकडील अतिरीक्त पैसा मध्यवर्ती बँकेकडे गुंतविला जाऊन व्यपारी बँकांची पतनिर्मितीची क्षमता घटते.

याऊलट ज्यावेळी अर्थव्यवस्थेत पतपैशाची टंचाई निर्माण होते. तेव्हा विक्री केलेल्या कर्जरोख्यांची आता खरेदी करुन व्यापारी बँका व व्यक्तींकडील पैशाच्या प्रमाणात वाढ घडवून आणली जाते.

## ३) रोख राखीव निधीचे प्रमाण :-

प्रत्येक देशात व्यापारी बँकांना स्वतःजवळ जमा झालेल्या एकूण ठेवींच्या एका विशिष्ट प्रमाणात रक्कम मध्यवर्ती बँकेकडे ठेवण्याचे कायदेशिर बंधन असते. यालाच राखीव निधीचे प्रमाण असे म्हणतात. मध्यवर्ती बँकेला या प्रमाणात परिस्थितीनुसार बदल करण्याचा अधिकार असतो. या अधिकाराचा वापर करुन मध्यवर्ती बँक पतचलनाचे नियंत्रण करु शकते.

राखीव निधीच्या प्रमाणात वाढ केल्यास व्यापारी बँकांच्या ठेवींपैकी अधिक हिस्सा मध्यवर्ती बँकेकडे जमा झाल्याने बँकांच्या पतनिर्मीतीच्या कार्यावर आपोआप मर्यादा निर्माण होते.

याऊलट राखीव निधीच्या प्रमाणात घट केल्यास व्यापारी बँकांकडे एकूण ठेवींचे प्रमाण अधिक असल्याने पतनिर्मितीला प्रोत्साहन मिळते.

## ब) गुणात्मक साधने :-

पतपुरवठ्यांची गुणवत्ता ठरविणारी साधने म्हणजेच गुणात्मक साधने होय. मौद्रिक धोरणाच्या संख्यात्मक साधनांच्या काही मर्यादा असल्याने पतनियंत्रणासाठी गुणात्मक साधनांचा वापर केला जातो. या साधनांना निवडक (Selective) साधने असेदेखिल म्हटले जाते.

अलिकडील काळात मध्यवर्ती बँक ज्या गुणात्मक साधनांचा वापर करतात त्यामध्ये पुढील साधनांचा समावेश होतो.

## १) कर्ज आणि तारण यामधील अंतर वाढविणे :-

बँका ग्राहकांना कर्जे देतांना विविध तारणांवर आधारीत कर्जे देत असतात. यामध्ये व्यापारी, मध्यस्त यांचाही समावेश होतो. हे व्यापारी किंवा मध्यस्थ वस्तूंच्या खरेदी –

विक्रीचे व्यवहार करीत असतात बँकेच्या कर्जाचा वापर हे व्यापारी वस्तूंची खरेदी व साठेबाजीसाठी करीत असतात. त्यातून कृत्रिम भाववाढ अशा अनिष्ट व्यापारी प्रवृत्ती वाढून सर्वसामान्यांना त्याची झळ बसते.

अशा वेळी व्यापारी बँका व्यापाऱ्यांना कर्जे देतांना कर्जरक्कम आणि व्यापाराऱ्याने दिलेल्या तारणाची चालू बाजारभावाने होणारी किंमत यामधील अंतर (गाळा) वाढविते. त्यामुळे व्यापाऱ्यांचा कर्जपुरवठा नियंत्रित होऊन साठेबाजी सारख्या अनिष्ट प्रवृत्तीला आळा बसतो.

**२) विशिष्ट कामासाठी कर्ज देणे :-**

पतपैशाच्या नियमनासाठी कोणत्या कार्यासाठी कर्जे दयावीत व कोणत्या कार्यासाठी कर्जे देऊ नयेत हे मध्यवर्ती बँक ठरविते. अर्थव्यवस्थेतील चलनवाढीची परिस्थिती विचारात घेऊन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकामार्फत केवळ अत्यावश्यक आणि उत्पादक कार्यासाठीच कर्ज पुरवठा करते अनावश्यक व अनुत्पादक कार्यासाठी कर्जपुरवठा नाकारला जातो.

**३) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण :-**

अनेकदा अर्थव्यस्थेतील बहुतांश लोकामार्फत ऐशआराम आणि चैनिच्या उपभोग्य च्या खरेदीसाठी व्यापारी बँकांकडून कर्जे घेतली जातात. उदा. मोटार, फ्रिज, टिव्ही, एसी इ. परंतू अशा उपभोग्य कर्जाच्या वाटपातून अर्थव्यवस्थेत चलनवाढीचा धोका निर्माण होतो. अशावेळी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना सुचना देऊन उपभोग्य कर्जावर मार्यादा घालू शकते.

**४) कर्ज वाटप धोरण :-**

व्यापारी बँका आपल्या कर्ज वाटप धोरणातून अर्थव्यवस्थेतील पतनिर्मितीचे कार्य करीत असतात. त्यासाठी त्यांना मध्यवर्ती बँकेडून पतपुरवठा होत असतो. परंतू जर अर्थव्यवस्थेत पतपैशाचे नियंत्रण करायचे असेल तेव्हा मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना किती पैसा पुरवायचा याचे प्रमाण ठरवून त्या प्रमाणातच कर्ज वाटप करते.

त्यामुळे व्यापारी बँकांची रोखता घटून कर्ज वाटप क्षमता नियंत्रित राहते त्यातून आपोआप पतनिर्मिती वर मर्यादा निर्माण होतात.

**५) प्रत्यक्ष कारवाई :-**

अनेकदा व्यापारी बँका भरपूर नफा मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करतात त्यातून मोठ्या प्रमाणात पतनिर्मिती कर्ज वाटप करतात त्यातून मोठ्या प्रमाणात पतनिर्मिती घडून येते. परंतू त्याचवेळी बँका धोक्यात येऊन बँक बुडण्याची देखिल शक्यता असते अशा वेळी नियमबाह्य कार्य करणाऱ्या बँकांना मध्यवर्ती बँक तशा सुचना देते. जर सुचनांचे उल्लंघन केले तर बँकांना मिळणाऱ्या सुविधा, सवलती नाकारल्या जातात. तसेच दंडात्मक किंवा कडक कायदेशिर कारवाई करण्याचा अधिकार मध्यवर्ती बँकेला आहे.

### ६) नैतिक समजावणी :-

वरील प्रमाणे जर मध्यवर्ती बँकेने कडक कारवाई केली तर व्यापारी बँका आणि मध्यवर्ती बँक यामध्ये कटूता निर्माण होते ती टाळण्यासाठी मध्यवर्ती बँक 'नैतिक समाजावणी' या मार्गाचा अवलंब करतात याव्दारे मध्यवर्ती बँक देशातील व्यापारी बँकांना पतनियंत्रण धोरणाची आवश्यकता पटवून देऊन पतचलनवाढीचे धोके समजावून सांगते त्यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना विश्वासात घेऊन योग्य मार्गदर्शन करते.

### ७) प्रसिध्दी :-

देशाची मध्यवर्ती बँक या नात्याने व्यापारी बँकाकडून आवश्यक माहिती मागवून घेऊन तीचे विश्लेषण व ती प्रसिद्ध करण्याचे महत्वाचे कार्य महयवर्ती बँकेला करावे लागते. त्यातून वेळेवेळी मध्यवर्ती बँकेने कोणकोणत्या धोरणांचा अवलंब केला याविषयी व्यापारी बँकांना माहिती मिळते. त्यातून व्यापारी बँका पतनियंत्रणाबाबत आपले स्वतःचे धोरण आणि निती कशी असावी याविषयी योग्य निर्णय घेवू शकतात.

## ६.४ राजकोषिय / राजवित्तीय धोरण

पूर्वी राज्यसत्तेने म्हणजेच शासनाने कमीत कमी कामे करावित अशी भूमिका अर्थशास्त्रज्ञांनी घेलती होती. यालाच अहस्तक्षेप किंवा निर्हस्तक्षेप नीती म्हटले जाते. परंतू अलिकडील काळात ही निर्हस्तक्षेप निती पाठीमागे पडून पारंपारिक विचारसरणी पूर्णपणे बदलली आहे. सरकारने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कल्याणकारी कार्ये करावीत अशी विचारसरणी पुढे येऊ लागली. राजस्व (Public finance) याचा अर्थ केवळ सार्वजनिक महसूल गोळा करणे व खर्च करणे याच्याशी संबंधित न राहता अशा व्यवहारांना सरकारच्या हातातील एक प्रभावी साधन म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

लॉर्ड केन्स यांनी देखिल अर्थव्यवस्थेच्या सर्वांगिण विकासांसाठी योग्य असे आर्थिक धोरण सरकारने स्विकारावे असे मत मांडले. या अर्थिक धोरणांमध्ये मौद्रिक धोरणा बरोबरच राजकोषिय धोरणाचा देखिल समावेश होतो.

**व्याख्या :-**

### १) प्रा. बोल्डींग :-

"राजवित्तीय धोरण ही संकल्पना सरकारच्या पैसे घेणे आणि पैसे देणे या व्यवहाराशी संबंधित असलेल्या बाजूचा उल्लेख करण्यासाठी स्थूलमानाने वापरली जाते."

### २) प्रा. जॉन्सन :-

"आर्थिक व्यवहारांची पातळी उंचावण्यासाठी करांमध्ये आणि सरकारी खर्चामध्ये जे बदल घडवून आणले जातात त्या धोरणाचा उल्लेख राजवित्तीय धोरण असा केला जातो."

म्हणजेच वित्तीय धोरण म्हणजेच असे धोरण कि ज्यामध्ये सरकार त्यांच्या उत्पन्न व खर्चाच्या कार्यक्रमाद्वारे उत्पन्न व रोजगारात अपेक्षित बदल घडवून आणते व अर्थव्यवस्थेवर होणारे विपरीत परिणाम टाळण्याचा प्रयत्न करते.

## ६.५ राजकोषिय धोरणाची उद्दिष्ट्ये

राजकोषिय धोरणाच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून सरकार पुढील प्रमुख उद्दिष्टे साध्य करते.

### १) बचत व भांडवल निर्मितीला प्रोत्साहन :-

अल्पविकसित देशांत भांडवलाची टंचाई असते. व योग्य प्रमाणात भांडवल गुंतवणूक झाल्याशिवाय आर्थिक विकास शक्य नसतो. अपेक्षित भांडवल गुंतवणूकीसाठी मोठ्या प्रमाणात बचत होणे आवश्यक असते. त्या दृष्टीने सरकारने कर आकारणी करुन खर्च करणे आवश्यक आहे.

### २) तेजी – मंदीवर नियंत्रण :-

आर्थिक विकासाच्या मार्गातील एक प्रमुख अडथळा म्हणजेच तेजी – मंदीची चक्रे होय. अतिरीक्त किंमतवाढ किंवा किंमतघट ही अर्थव्यवस्थेला हानीकारक असते. त्यावर उपाय म्हणून सरकारने कर योजना, खर्चाच्या योजना, अनुत्पादक खर्चावर नियंत्रण, सार्वजनिक खर्च कमी करणे, उत्पादन कार्यात विविध कर सवलती, लघू उदयोगांना सवलीत देणे इ. उपाययोजना किंमतीवाढी विरुध्द करणे अपेक्षित असते. त्यादृष्टीने वित्तीय धोरणाची भूमिका महत्वाची असते.

### ३) बेरोजगारी कमी करणे :-

कोणत्याही देशाच्या राजकोषिय धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणजेच पूर्ण रोजगार परिस्थिती निर्माण करणे होय. मात्र अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळी ही बहुतांश देशामध्ये कमी असते कारण समाजाची प्रभावी मागणीतील कमतरता होय. अशा वेळी सरकारने राजकोषिय धोरणाद्वारे सार्वजनिक खर्चात वाढ, रोजगार वाढ, उत्पन्न वाढ, मागणीत वाढ घडून येऊन अर्थव्यवस्थीतील रोजगार पातळी ऊंचावण्यास मदत होते.

### ४) सामाजिक दृष्ट्या योग्य गुंतवणूकीला प्रोत्साहन :-

समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी वाहतूक, दळण-वळण, शिक्षण, आरोग्य, धरणे, कालवे, वीज निर्मिती, असा पायाभूत सुविधांचा विकास होणे अत्यंत आवश्यक असते. सरकार राजकोषिय धोरणद्वारे सार्वजनिक खर्चात वाढ करुन ही समाजकल्याणकारी कार्यांमधिल गुंतवणूक वाढवू शकते.

### ५) सामाजिक न्यायासह आर्थिक विकास साध्य करणे :-

सामाजिक न्याय म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप होतांना ते समान होणे आवश्यक असते. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित होतो. त्यासाठी

सरकार करआकारणी करतांनाच प्रगतीशील पद्धतीने करु शकते. तसेच सार्वजनिक खर्चाद्वारे दारिद्र्य निर्मूलन योजना राबवून गरीबीची तिव्रता कमी करणे अपेक्षित आहे.

**६) आर्थिक स्थिरता व आर्थिक विकास :-**

आर्थिक स्थिरता निर्माण करणे म्हणजेच तेजी-मंदीची चक्रे नियंत्रित करुन त्याचे दुष्पपरीणाम टाळून अर्थव्यवस्थेचा विकास सतत चालू ठेवणे होय. त्यासाठी तेजीच्या काळात सार्वजनिक खर्चात कपात, करांमध्ये वाढ करणे, कर्ज उभारणी करणे याऊलट मंदीमध्ये सार्वजनिक खर्चात वाढ, करांमध्ये घट इ. मार्गांचा अवलंब करणे अपेक्षित असते.

## ६.६ राजकोषिय धोरणाची साधने

राजकोषिय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील साधनांचा वापर केला जातो.

**राजकोषिय धोरणाची साधने**




**A) सार्वजनिक कर :-**

डॉ. डाल्टन यांच्या मते 'कर भरणाऱ्याला करांद्वारे किती प्रमाणात लाभ प्राप्त होतो. याचा विचार न करता सरकारने नागरिकांवर लादलेले सक्तीचे देणे म्हणजे 'कर' (Tax) होय.'

कर हे सरकारच्या हातातील उत्पन्न गोळा करण्याचे राजकोषिय धोरणाचे एक महत्वाचे साधन आहे. सरकारला जन कल्याणास्तव अनेक कल्याणकारी योजनांवर खर्च करावा लागतो. हा खर्च भरुन काढण्यासाठी सरकारला जनतेमार्फत दिले जाणारे सक्तीचे देणे म्हणजे कर होय. कर ही महसूली उत्पन्नाची बाजू असून करांचे पुढील दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

१) प्रत्यक्ष कर.

२) अप्रत्यक्ष कर.

**B) सार्वजनिक खर्च :-**

अलिकडील काळात सरकारची भूमिका 'कल्याणकारी' राज्याची बनलेली असून त्याद्वारे देशाचे परकियांपासून संरक्षण करणे, अंतर्गत शांतता. सुव्यवस्था, पायाभूत सुविधांची निर्मिती इ. साठी सरकार जो खर्च करते त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

सार्वजनिक खर्चामुळे कृषी, उदयोग, व्यापार सेवा क्षेत्रांचा विकास, आर्थिक विषमता दुर करणे, मुलभूत व अवजड उदयोगांचा विकास करणे, प्रादेशिक समतोल निर्माण करणे, इ. उद्दिष्ट्ये साध्य करता येतात.

### C) सार्वजनिक कर्ज :-

कल्याणकारी राज्याची भूमिका पार पाडतांना सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. हा खर्च भरुन काढण्यासाठी करांचा आधार घेतला जातो, परंतू अनेकदा करांद्वारे मिळणारे उत्पन्न अपूरे पडते व त्यामुळे सरकारला सार्वजनिक कर्ज उभारुन उत्पन्न वाढवावे लागते. अशा रीतीने कर्ज उभारुन मिळणारे उत्पन्न सरकारला कायमचे मिळत नाही तर त्याचे स्वरुप तात्पुरते असते कारण ठराविक काळानंतर सरकारने घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड करावी लागते.

सरकारी कर्जरोख्यांची विक्री करुन किंवा राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, किसान विकास पत्रे, भविष्य-निर्वाह निधी इ. द्वारे भारतात सरकारने मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कर्जाची उभारणी केलेली आहे.

### D) तूटीचा अर्थभरणा :-

आर्थिक विकासासाठी साधन सामग्री गोळा करण्याचा मार्ग या दृष्टीने तूटीच्या अर्थभरण्याला महत्वाचे स्थान आहे.

'जेव्हा सरकारच्या महसूली उत्पन्नापेक्षा महसूली खर्च जास्त असतो तेव्हा त्या अंदाज-पत्रकाला तूटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.'

तूटीच्या अर्थभरण्यासाठी पूढील मार्गांचा अवलंब केला जातो.

१) मध्यवर्ती बँकेकडून कर्जे घेणे.

२) व्यापारी बँकांकडून कर्जे घेणे.

३) नवीन चलनाची छपाई करणे.

अशा प्रकारे स्थिरतेसह आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सरकार राजकोषिय धोरणाद्वारे वरील साधनांचा प्रभावीपणे वापर करु शकते.

## ६.७ IS - LM प्रतिमान

IS - LM प्रतिमान आपल्याला वस्तू बाजार (Goods Market) व मुद्रा बाजार (Money Market) यांचा संयोग दिसून येतो. वस्तू बाजारात उत्पन्न पातळीचा खर्चावरील व खर्चाचा उत्पादन निश्चितीवरील परिणाम लक्षात घेतला जातो. म्हणजेच IS - LM प्रतिमान हे खर्च, उत्पन्न, व्याजदर, गुंतवणूक पातळी ही वस्तूबाजार मुद्रा बाजार यांच्या संयुक्त संतूलनातून साध्य होते.

IS - LM प्रतिमान हे प्रा.जे. आर. हिक्स यांनी १९३७ मध्ये विकसित केले. त्यानंतरच्या काळात हैन्सन, पॅटीन्कीन, मॉडिग्लिआनी इ. अर्थतज्ञांनी त्यामध्य महत्वाची भर घातली. हिक्सने आपल्या लेखाद्वारे वस्तूबाजार व मुद्राबाजार यांचा एकाच उत्पन्न

आणि व्याजदर पातळीला समतोल कसा साध्य होतो तो IS - LM प्रतिमानाद्वारे स्पष्ट केले आहे. ह्यासाठी  हिक्सने वस्तूबाजारासाठी IS वक्राचा तर मुद्राबाजारासाठी LM वक्राचा वापर केलेला आहे.

## ६.८ वस्तू बाजार आणि IS वक्र

प्रा. हिक्स च्या मते व्याजाचा दर आणि गुंतवणूक यामध्ये परस्पविरोधी संबंध दिसून येतो म्हणजेच अधिक व्याजदराला गुंतवणूक कमी राहते तर कमी व्याजदर हा गुंतवणूकीला आकर्षित करतो.

व्याजदरातील बदलांमुळे गुंतवणूक पातळी व उत्पन्नपातळीत व्यस्त प्रमाणात बदल घडून येतात. उदा. व्याजदर वाढल्यास कर्जे महाग बनल्याने गुंतवणूकीचे प्रमाण कमी राहते परीणामतः एकूण मागणीत घट होऊन उत्पन्न पातळीदेखिल कमी राहते. याऊलट व्याजदर घटल्यास, गुंतवणूक वाढ व त्यातून एकूण मागणी वाढून उत्पन्न पातळीमध्ये देखिल वाढ घडून येते.

### IS वक्र – व्याख्या

"वेगवेगळ्या व्याजदराला उत्पन्नाची वेगवेगळी पातळी दर्शविणाऱ्या बिंदूचा मार्ग की जो वस्तूबाजारातील बचत = गुंतवणूक (I = S) दर्शवितो असा वक्र म्हणजेच IS वक्र होय".

**IS वक्र पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.**




**आकृती क्रमांक ६.१**

आकृतीच्या वरील भागात OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर बचत व गुंतवणूक दर्शविलेली आहे. S - S हा बचत वक्र असून तो धनात्मक स्वरुपाचा आहे. कारण वाढत्या उत्पन्ना बरोबर बचतदेखील वाढत जाते.

आकृतीच्या खालच्या भागात OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर व्याजदर दर्शविलेला आहे. व्याजदर $or_1$ असतांना $I - I$, या गुंतवणूक वक्रावर $E_1$ बिंदूत $OY_1$, उत्पन्नपातळी निश्चित झालेली आहे. व्याजदर $or_1$ व उत्पन्न पातळी $OY_1$ यांच्या सहाय्याने आकृतीच्या खालच्या भागात $A$ हा बिंदू प्राप्त होतो.

व्याजाचा दर $or_2$ अस कमी झाल्यास गुंतवणूक वाढून गुंतवणूकीचा वक्र $I_2 - I_2$ असा वरच्या दिशेने सरकून $E_2$ बिंदूत संतूलन प्रस्थापित होऊन उत्पन्न पातळी $OY_2$ निश्चित होते. त्याच्या आधारे आकृतीच्या खालील भागात व्याजदर $or_2$ उत्पन्न पातळी $OY_2$ दर्शविणार $B$ हा बिंदू प्राप्त होतो.

वस्तूबाजारात समतोल प्रस्थापित झालेला असतांना म्हणजेच गुंतवणूक व बचत समान असतांना (I = S) वेगवेगळ्या व्याजदराला असणारी उत्पन्न पातळी दर्शविणारे A आणि B हे बिंदू एकत्र जोडल्यास IS हा ऋणात्मक वक्र प्राप्त होतो.

IS वक्र असे स्पष्ट करतो की व्याजदर घटतांना गुंतवणूक वाढून उत्पन्न पातळीसुद्धा वाढत जाते.

## ६.९ मुद्रा बाजार व LM वक्र

मुद्रा बाजारातील समतोल त्याचवेळी साध्य होता. ज्यावेळी मुद्रेसाठी असलेली मागणी व मुद्रेचा पुरवठा समान बनतो. लॉर्ड लेन्स यांच्या मते मुद्रेसाठी असणारी मागणी ही पुढील ३ हेतूंने केली जाते.

१) व्यवहार हेतू.

२) दक्षता हेतू.

३) सट्टेबाजीचा हेतू.

व्यावहार हेतू व दक्षता हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही उत्पन्नाच्या समप्रमाणात बदलते. म्हणजेच उत्पन्न वाढल्यास व्यावहार हेतूने व दक्षता हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी वाढते तर उत्पन्न कमी झाल्यास ती कमी होते.

सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते.

अल्पकाळात पैशाचा पुरवठा स्थिर असतो असे मानलेले आहे. म्हणून पैशाचा पुरवठा वक्र OY अक्षांस समांतर राहले.

ज्या बिंदूत पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा समान बनतो. त्या बिंदूत मुद्रा बाजार संतूलन प्रस्थापित होते. अशावेळी वेगवेगळ्या व्याजदराला असलेली उत्पन्न पातळी पत्र वक्राद्वारे पुढील प्रमाणे दर्शविना येईल.




**आकृती क्रमांक ६.२**

वरील आकृतीत उत्पन्नपातळी $OY_1$ असतांना $E_1$ बिंदूत पैशासाठीची मागणी (Ld) व पैशाचा पुरवठा (SM) यांच्या समतोलाद्वारे व्याजदर $or_1$ प्राप्त होतो. त्याद्वारे व्याजदा $or_1$ व उत्पन्न पातळी $OY_1$ यांच्या आधारे A बिंदू प्राप्त होतो.

उत्पन्न $OY_2$ असे वाढल्यास पैशाची मागणी वाढून $Ld_1$ अशी बनते नवीन संतूलन $E_2$ बिंदूत प्रस्थापित होऊन व्याजदर $or_2$ व उत्पन्न $OY_2$ याद्वारे B बिंदू प्राप्त होतो.

अशा प्रकारे मुद्राबाजार समतोलावस्थेत असतांना वेगवेगळ्या व्याजदराला असणारी उत्पन्न पातळी दर्शविणारे A - व B हे बिंदू एकत्र जोडल्यास धनात्मक स्वरुपाचा जो वक्र मिळतो त्यालाच LM वक्र म्हटले जाते.

## ६.१० IS - LM एकत्रित संतूलन

वरील विवेचनावरुन वस्तूबाजार व IS वक्र तसेच मुद्राबाजार व LM वक्राची प्राप्ती कशी होते हे दिसून येते. आता वस्तूबाजार IS व मुद्राबाजार (LM) यांच्याद्वारे IS-LM संतूलन व संतूली व्याजदराची निश्चिती कशी होते हे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ६.३**

वरील आकृतीमध्ये E या संतूलन बिंदूमध्ये पैशाची मागणी व पैशाच्या पुरवठा जेथे संतूलित असतो तो मुद्राबाजारातील LM वक्र बचत व गुंतवणूक ज्या ठिकाणी समान बनते तो वस्तू बाजारातील IS वक्र परस्परांना छेदतात. म्हणून E बिंदू वस्तू बाजार व मुद्राबाजारतील एकत्रित संतूलन (IS = LM) प्रस्थापित होऊन संतूलित व्याजदर or व संतूलित उत्पन्नाची पातळी OY निश्चित होतो.

राजकोषिय धोरणाचा (Fiscal Policy) एक भाग म्हणून किंवा मौद्रिक धोरणाचा (Monetary Policy) एक भाग म्हणून जर IS किंवा LM वक्रात कोणताहि बदल झाला तर वरील संतूलन बदलून व्याजदर आणि उत्पन्न पातळीदेखील बदलेले हेच पूढीलप्रमाणे दर्शविता येईल.

## ६.११ IS - LM वक्रातील बदल

**राजकोषिय धोरण आणि IS वक्राचे स्थलांतर :-**

सरकारच्या राजकोषिय धोरणामुळे IS वक्रात कशा प्रकारे बदल घडून येतात हे पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ६.४**

सरकारच्या राजकोषिय धोरणाचा एक भाग म्हणून जर सरकारने सार्वजनिक खर्चात वाढ किंवा करांमध्ये (Tax) घट घडवून आणली तर लोकांचे उत्पन्न वाढून वस्तू बाजारातील मागणी वाढेल परीणामतः IS वक्र वरच्या दिशेने $IS_1$ असा सरकेल.

या उलट जर सरकारने सार्वजनिक खर्चात घट किंवा करांच्या प्रमाणात वाढ घडवून आणली तर लोकांचे उत्पन्न घटून वस्तूबाजारातील मागणी घटून IS वक्र $IS_2$ असा खालच्या दिशेने सरकेल.

**मौद्रिक धोरण आणि LM वक्राचे स्थलांतर**

मौद्रिक धोरणातील बदलामुळे LM वक्रात होणारे बदल पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येतील.




**आकृती क्रमांक ६.५**

मौद्रिक धोरणाचा एक भाग म्हणून पैशाच्या पुरवठ्यात घट करण्यात आली LM वक्र $LM_1$ असा डाविकडे सरकतो.

याउलट मौद्रिक धोरणाचा परिणाम म्हणून पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडून आल्यास LM वक्र $LM_2$ असा उजव्या बाजूस सरकतो.

## ६.१२ प्रश्न

**प्रश्न १) संकल्पना स्पष्ट करा.**

अ) मौद्रिक धोरण.
ब) राजकोषिय धोरण.
क) बँकरेट
ड) सार्वजनिक खर्च.
इ) तूटीचा अर्थभरणा.

**प्रश्न २ सविस्तर उत्तरे लिहा.**

अ) मौद्रिक धोरणाची उद्दिष्टे लिहा.
ब) चलनविषयक धोरणाच्या साधनांची चर्चा करा.
क) राजिकोषिय धोरणाची साधने स्पष्ट करा.
ड) IS - LM प्रतिमान स्पष्ट करा.
इ) IS व LM वक्रांतील स्थलांतर कसे होते ते स्पष्ट करा.
ई) राजकोषिय धोरणाची उद्दिष्टे लिहा.

❖❖❖❖

# ७

# प्रकरण ४

# आर्थिक विकासातील मुलभूत मुददे भाग-१

**घटक रचना :**

७.१ उदिष्ट्ये

७.२ प्रस्तावना

७.३ १९९१ चे नविन आर्थिक धोरण : उत्पत्ती आणि सुधारणा

७.४ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नातील प्रवृत्ती

७.५ राष्ट्रीय उत्पन्नाची क्षेत्रवार विभागणी आणि व्यावसायिक विभागणी

७.६ सर्वसमावेशक वृध्दी

७.७ प्रश्न

## ७.१ उदिष्ट्ये

१९९१ मध्ये नुकतेच निवडून आलेले नविन पंतप्रधान पी. व्ही. नरसिहांराव यांनी देशामध्ये आर्थिक व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी नविन अर्थिक धोरण १९९१ मध्ये स्थापण केले. आपण या पाठात नविन आर्थिक धोरण व त्याचे परिणाम याचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची ठळक उद्दिष्ट्ये पूढील प्रमाणे सांगता येतील.

१) १९९१ चे नविन अर्थिक धोरण समजावून घेणे.

२) भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाची क्षेत्रवार व व्यावसायिक विभागणीचा अभ्यास करणे.

३) सर्वसमावेशक वृध्दी ही संकल्पना अभ्यासणे.

## ७.२ प्रस्तावना

१९९१ मध्ये भारत अनेक आर्थिक आरिष्ट्यांना सामोरे जात होता. आर्थिक व्यवस्थेचे समग्र व्यवस्थापन आणि समग्र आर्थिक असमतोल ही मुख्य कारणे आर्थिक आरिष्ट्यास कारणीभूत होती. सुधारणापूर्व काळात भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये अत्यंत पारंपारीक होती. उदा. लोकसंख्येत वाढ, निरक्षरता, दारिद्य, बेकारी. वित्तीय किंवा राजकोशीय तुट, असमतोल व्यवहारतोल इत्यादी.

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या उत्पत्तीस पुढील घटक जबाबदार ठरले.

१) अकार्यक्षमता आणि अनुत्पादकता.

२) उच्च व्यवहार खर्च.

३) खर्चिक अर्थव्यवस्था आणि कमी कार्यक्षमता व स्पर्धात्मकता.

४) नैसर्गिक साधनसंपत्तीचे वाटपास पर्याय नसने.

५) मागास तंत्रज्ञान, कनिष्ट दर्जा आणि उच्च किंमत.

६) नोकरशाही आणि भष्ट्राचार.

## ७.३ १९९१ चे नविन अर्थिक धोरण : उत्पत्ती आणि सुधारणा:-

भारताला १९९१ पूर्वी अनेक आर्थिक आरिष्ट्यांना सामोरे जावे लागले, या आर्थिक आरिष्ट्यांवर उपाय करण्यासाठी १९२१ मध्ये नविन आर्थिक धोरण आखले गेले. १९९१ च्या नविन आर्थिक धोरणास आर्थिक आरिष्ट्य हा घटक प्रामुख्याने कारणीभूत होता. आर्थिक आरिष्ट्याचे प्रमूख किंवा मुळ घटक पूढीलप्रमाने सांगता येतील.

**आर्थिक आरिष्टयांचे मुळ घटक पूढीलप्रमाणे.**

१. सातत्याने वाढणारी राजकोषीय तुट आरिष्ट्य – सार्वजनिक प्राप्तीपेक्षा सार्वजनिक खर्चात होणारी भरमसाठ वाढ.

२. व्यावहारतोलातील तुट किंवा व्यवहारतोल आरिष्ट्य (निर्यातीच्या उत्पंन्नापेक्षा आयातीचा सातत्याने वाढणारा खर्च.)

३. स्थूल आर्थिक समस्या (१९९० नंतरच्या आरिष्ट्यांचा दबाव, राजकीय अस्थैर्य, आंतरराष्ट्रीय व्यावहारासंबधी कमी विश्वास, आंरराष्ट्रीय वित्तीय बाजारत पत दर कमी असणे, घटता भांडवल प्रवाह इत्यादी)

४. वाढता चलनवाढ दबाव. (भारतात घाऊक आणि किरकोळ. ग्राहक निर्देशांक चलनवाढ सातत्याने वाढत आहे). चलनवाढ ही भारताला सातत्याने भेडसावणारी अत्यंत गंभीर आर्थिक समस्या आहे.

### ❖ १९९१ च्या नविन आर्थिक धोरणातील महत्त्वाचे बदल किंवा सुधारणा:-

भारतात १९९१ च्या नविन आर्थिक धोरणात अनेक आर्थिक सुधारणा घडवून आणल्या गेल्या. या सुधारणा दोन पध्दतीच्या होत्या. त्या म्हणजे स्थुल आर्थिक स्थैर्य (मागणी व्यावस्थापण) आणि संरचनात्मक सुधारणा (पुरवठा व्यावस्थापन).

### अ. स्थूल आर्थिक स्थैर्य (मागणी व्यवस्थापन सुधारणा किंवा उपाय) :-

साधारणतः हे उपाय अल्पकाळासाठी योजण्यात आले होते. या सुधारणांचा किंवा उपायांचा मुख्य हेतू म्हणजे चलनवाढीचा दर नियंत्रणात आणने, असमतोल व्यावहारतोल सुधारणे आणि राजकोषीय तुट कमी करणे हा होता. तसेच पूढील प्रमुख उपायही विचारात घेतले होते ते म्हणजे,

१. चलनवाढ नियंत्रण.

२. राजस्व दुरुस्ती.

३. व्यवहारतोल स्थितीतील सुधारणा.

**१. चलन वाढ नियंत्रण :-**

संरचनात्मक धोरण आणि उदारीकरण धोरण तसेच मध्यवर्ती बँकेचे मौद्रिक धोरण यामुळे चलन वाढीचा दर नियंत्रित करण्यात मदत होवू शकते. चलनवाढीचा दर १९९५-९६ मध्ये ८% होता तो १९९६-९७ मध्ये ४.६% इतका खाली आला.

**२. राजस्व दुरुस्ती :-**

वाढता राजकोषीय असमतोल दुरुस्त करण्यासाठी १९९१ चे धोरण आखले गेले. सार्वजनिक खर्च (अनुत्पादक) कमी करुन सार्वजनिक प्राप्ती वाढवण्यासाठी कररचनेत सुधारणा घडवून आनण्यासाठी सरकारने प्रयत्न केले. परिणामी भारतात प्रत्यक्ष करामध्ये विशेषतः वैयक्तिक उत्पन्न कर (Personal, Income Tax) आणि कंपनीप्रशासन कर Corporation Tax) यातील उत्पन्न वाढत आहे. त्याचबरोबर अंदाजपत्रकातील तुट (Budget) भरण्यासाठीही उपाययोजना केल्या जात आहेत.

**३. व्यवहारतोल स्थितीती सुधारणा :-**

व्यवहारतोल स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठीही १९९१ च्या नविन आर्थिक धोरणात खास उपाय योजले आहेत. १९९१ मध्ये भारताने १८ ते १९% रुपयांचे अवमूल्यन केले. त्यानंतर १९९२-९३ मध्ये क्षिथील विनिमय दर व्यवस्थापन पध्दत (Liberalised Exchange Rate Management system. LERMS) सुरु करण्यात आली. आज भारतात व्यवस्थापीत तरता विनिमय दर पध्दतीचा (Managed Floating Exchange Rate System) वापर केला जातो. आंतरराष्ट्रीय व्यवहारात आयातीचा खर्च कमी करुन निर्यातीचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रयत्न किंवा उपाय योजले जात आहेत. परिणामी १९९१ नंतर भारतात व्यवहारतोलात सुधारणा घडून येत आहे. हे निश्चित.

**ब. संरचनात्मक सुधारणा (पुरवठ्याच्या बाजूने व्यवस्थापन) :-**

अर्थव्यवस्थेची पुरवठा बाजू सुधारण्याच्या दृष्टीने दीर्घकाळात ज्या उपाययोजना किंवा सुधारणा घडवून आणल्या जातात त्या म्हणजे संरचनात्मक सुधारणा होय. यामध्ये प्रामुख्याने ज्या क्षेत्रीय सुधांरणांचा समावेश आहे. त्या सुधारणा पूढीलप्रमाने स्पष्ट करता येतील.

**१. औद्योगिक सुधारणा :- (Industrial Reforms) :-**

भारतात सरकारने औद्योगिक विकासासाठी औद्योगिक धोरण १९४८, व १९५६ सुरु केले १९९१ मध्ये औद्योगिक विकासासाठी नविन औद्योगिक धोरण (New Industrial Policy 1991) अवलंबवीले. या धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे उदारीकरण, (liberalization) खाजगीकरण (Privatization) आणि जागतिकीकरण (Globalization) यालाच एकत्रितपणे 'उखाजा' किंवा LPG धोरण असे म्हणतात.

१९९१ च्या नविन औद्योगिक धोरणात औद्योगिक परवाणा काढून टाकणे, विदेशी तंत्रज्ञान आणि गुंतवणूकीला परवाणगी देणे, सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करणे. MRTP (मक्तेदारी व नियंत्रित व्यवहार व्यापार कायदा-१९६९) – हद करणे इत्यादी प्रमुख मुदद्यांचा विचार करण्यात आला.

**२. सार्वजनिक क्षेत्र सुधारणा आणि निर्गुंतवणूक (Public Sector Reforins & Dnsinvestment) :-**

भारतात प्रमुख औद्योगिक उपक्रम हे सार्वजनिक क्षेत्रातंर्गत चालवले जातात. रोजगारनिर्मिती. निर्यात, आयात पर्यायीकरण, परकिय विनिमय इत्यादीसाठी सार्वजनिक क्षेत्राचे महत्वाचे योगदान आहे. तथापी राजकोषीय तुट कमी करण्याच्या उद्‌देशाने सरकारणे सार्वजनिक क्षेत्राची जबाबदारी खाजगी क्षेत्राकडे सोपवण्यासाठी निर्गुंतवणूकीसारखे धोरण (Disinvestment Policy) अवलंबीले जास्तीत जास्त व्यवस्थापकीय स्वायत्तता (Managenal Autonomy) देण्याचा निर्णय सरकारणे घेतला. खाजगी उद्योगक्षेत्राला जास्तीत जास्त स्पर्धात्मक बनवण्याच्या उददेशाने सार्वजनिक मक्तेदारी कमी करण्यात आली.

**३. व्यापार आणि भांडवली प्रवाह सुधारणा (Trade and Capital flow Resforms) :-**

१९९१ च्या नविन आर्थिक धोरणात आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक लाभ अधिकाधिक व्हावा तसेच व्यवहारतोल असमतोलातील तुट भरुण काढण्यासाठी विविध उपाय योजण्यात आले. अंतंर्गत भांडवलाचा प्रवाह वाढवण्याच्या हेतूने ही अनेक बदल करण्यात आले. व्यवहारतोल आरिष्ट्य सुधारण्याच्या हेतूने पूढील काही महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या गेल्या.

१) आयात उदारीकरण.

२) जकात रचनेत घट.

३) निर्यातीस उत्तेजन.

४) विनिमयदर धोरणात बदल.

५) चालू खात्याची परिवतीनियता.

६) क्षिथील भांडवल प्रवाह इत्यादी.

**४. वित्तीय क्षेत्र सुधारणा (financial Sector Reforms) :-**

नविन आर्थिक धोरणाचा एक आविभाज्य भाग म्हणजे वित्तीय क्षेत्रातील सुधारणा होय. अर्थव्यवस्थेच्या एका वास्तव क्षेत्राच्या आधारभुत सुधारणा वित्तीय क्षेत्रात सुरु केल्या. १९९१ नंतर भारत सरकारणे वित्तीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यांच्या हेतूने नरसिंहम समिती १९९१ आणि १९९८ मध्ये स्थापन केली. या समितीच्या शिफारशीनूसार सरकारणे वित्तीय क्षेत्रात पूढील सुधारणा घडवून आणण्यात यश मिळवले.

१) व्याजदरातील भिन्नता.

२) वैधानिक रोखता दर (SLR-23%) आणि रोख राखीव दर (CRR-4%) कमी करण्यात यश.

३) खाजगी क्षेत्रातील बँकाना RBI चे मार्गदर्शन.

४) भांडवलबाजारातील सुधारणांसाठी SEBI ची स्थापना १९९२ मध्ये करण्यात आली.

५) विमाक्षेत्रातील सुधारणांसाठी IRDA ची स्थापणा १९९९ मध्ये करण्यात आली.

६) बँकींगक्षेत्रात आधूनिकता आणि व्यवहारात पारदर्शकता आणणे.

७) भांडवल पर्याप्तता दर (Capital Adequacy Ratio-CAR) सुधारणे व बँकाची अनुत्पादक मालमत्ता NPA) कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

**आपली प्रगती तपासा.**

१. १९९१ च्या नविन आर्थिक धोरणाची कारणे किंवा उत्पन्नी स्पष्ट करा.

२. १९०१ च्या नविन आर्थिक धोरणातील संरचनात्मक सुधारणा कोणत्या ?

## ७.४ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नातील प्रवृत्ती (Trends in National Income and Per Capital Income)

आधूनिक अर्थशास्त्रातील संकल्पनेनूसार समाजाचे कल्यान हे त्या समाजात उत्पादित झालेल्या व उपभोगलेल्या वस्तू व सेवांवर अवलंबून असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा समाजाच्या प्रगतीच्या मोजमापासाठी महत्वाचा मानला जातो. तसेच देशाची आर्थिक स्थिती ही राष्ट्रीय उत्पन्नावरुन ठरते.

अर्थतज्ञ जे एम. केन्सच्या मते, "देशात एका विशिष्ट वर्गात उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे चलनाच्या भाषेतील मुल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

स्थुल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य + देशांच्या नागरिकांचे विदेशातून आलेले उत्पन्न होय.

स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP) आणि राष्ट्रीय उत्पादन (GNP) यामध्ये फरक असतो.

GDP म्हणजे विशिष्ट देशातील एका वर्षामध्ये उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य तर GNP म्हणजे GDP (+) त्या देशातील नागरिकांनी विदेशात मिळवलेले उत्पन्न (-) विदेशी नागरिकांनी त्या देशात मिळवलेले उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय

उत्पादन (NNP) म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GPP) वापरलेल्या - भांडवलावरील धसारा.

सुत्ररुपाने GDP = विशिष्ट वर्षातील अर्तव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या उत्पादनाचे मूल्च (वजा) Intermediate Consuption NNP = GDP - भांडवलावरील घसारा + उत्पादनाच्या घटकांना विदेशातून मिळालेले निव्वळ (Net) उत्पन्न.

**दरडोई उत्पन्न म्हणजे काय?**

देशाचे एकुण उत्पन्न काढल्यावर त्याला देशातील लोकसंख्येने भागल्यास दरडोई मिळते. दरडोई उत्पन्न हे संख्याशास्त्रीय मापन साधन सरासरी उत्पन्न दाखवते.

सुत्ररुपाने

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{स्थुल राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{लोकसंख्या}}$$

दरडोई उत्पन्नावरुन व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचा व्यवहारिक दृष्ट्या अचुक अंदाज बांधना येत नाही. मात्र दरडोई उत्पन्न नागरिकांच्या राहणीमानाविषयीचे दर्शक असते. देशाची व देशाच्या नागरिकांची प्रगती राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यांच्यातील वाढीवरुन ठरविता येते.

**राष्ट्रीय उत्पन्नातील प्रवृत्ती :-**

केद्रिय सांख्यिकीय संघटनेने (CSO) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचे (स्थिर किंमतीनूसार) आधार वर्ष १९९३-९४ वरुन सध्या २००४-०५ (किंमती) असे ठरविले आहे. स्थुल देशांतर्गत उत्पादन संकल्पनेनूसार राष्ट्रीय उत्पन्नातील (घटक खर्चानुसार) प्रवृत्ती तक्ता क्रमांक ७.४ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ७.४**

**स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP घटक खर्चानूसार) करोडो रुपयांमध्ये**

| वर्ष | चालु किंमतीनूसार | स्थीर किमंतीनूसार |
|---|---|---|
| १९५०-५१ | १०,०३६ | २,७९,६१८ |
| १९९०-९१ | ५,३१,८१४ | १३,४७,८९९ |
| २०११-१२ | ८३,५३,४९५ | ५२,४३,५८२ |

**स्त्रोत – आर्थिक सर्वेक्षण :-**

वरिल तक्त्यावरुन असे म्हणता येईल की देशांतर्गत वस्तु व सेवांचे उत्पादन वाढल्यामुळे एकूणच राष्ट्रीय उत्पन्नही १९५०-५१ आणि १९९०-९१ च्या तुलनेत वाढलेले लक्षात येते.

**दरडोई उत्पन्नातील प्रवृत्ती :-**

दरडोई उत्पन्न हा 'मानवी विकास निर्देशांकाचा (HDI) एक महत्वपूर्ण निर्देशक आहे. दरोडोई उत्पन्न हे मानवाच्या राहणीमानाचे दर्शक असल्याने दरडोई उत्पन्न वाढले की राहणीमानाचा दर्जाही सुधारतो. पूढील तक्ता क्रमांक ७.४.१ मध्ये स्थिर किंमती आणि घटक खर्चानुसार (NNP) दरडोई उत्पन्नातील कल दर्शवला आहे.

**तक्ता क्रमांक ७.४.१**

**निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ (NNP चालु किंमतीनूसार)**

| वर्ष | रुपये |
|---|---:|
| १९५०-५१ | ७,११४ |
| १९९०-९१ | १४,३३० |
| २०११-१२ | ३८,७३७ |

**स्त्रोत – आर्थिक सर्वेक्षण २०१२-१३.**

भारतात दरडोई उत्पन्नाचा कल १९५०-५१ पासून वाढतना दिसून येत आहे. १९९०-९१ च्या तुलनेत २०११-१२ मध्ये (३८,०३७) दरडोई उत्पन्न दुप्पट वेगाने वाढलेले दिसून येत आहे.

**दरडोई उत्पन्नाची आंतरराष्ट्रीय पातळीवर तुलना:**

भारतामध्ये दरडोइ उत्पन्नाचा कल वाढतना दिसून येत असला तरीही. आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर देशाच्या तुलनेत दरडोई उत्पन्न फारच कमी असल्याचे दिसून येत आहे. दरडोई उत्पन्नाची आंतरराष्ट्रीय तुलना पूढील तक्ता क्रमांक ७.४.३ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ७.४.२**

**निवडक देशातील दरडोई उत्पन्न**

| देश | २०११ मधील दरडोई स्थुल राष्ट्रीय उत्पन्न (डॉलरमध्ये) |
|---|---|
| नॉर्वे | ८८,८७० |
| संयुक्त राष्ट्र | ४८,६२० |
| भारत | १,४२० |
| चिन | ४,९४० |
| पाकिस्तान | १,१२० |

स्त्रोत – जागतिक विकास अहवाल निर्देशक २०१२-१३.

**आपली प्रगती तपासा.**

१) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय?

२) दरडोई उत्पन्न म्हणजे काय?

## ७.५ राष्ट्रीय उत्पन्नाची क्षेत्रवार विभागणी आणि व्यावसायिक विभागणी (Sectoral Composition & Occupational Distribution of National income)

राष्ट्रीय उत्पन्नाची क्षेत्रनिहाय विभागणी व त्यात झालेल्या बदल आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रीय उत्पन्नतील प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होणे आणि द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा वाढणे हे विकासाचे लक्षण मानले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाची प्रामुख्याने तीन क्षेत्र गणली जातात.

**१) प्राथमिक क्षेत्र / शेती क्षेत्र:-**

ज्या उत्पादनात निसर्गाची भूमिका प्रमुख असते त्यास प्रााथमिक क्षेत्र म्हणतात शेती हा यातील प्रमुख घटक होय म्हणून या क्षेत्राला कृषी क्षेत्र म्हणतात.

**२) द्वितीय क्षेत्र / उद्योग क्षेत्र:-**

या उत्पादनात निसर्गाचे कार्य दुय्यम असते मानवाचे स्थान महत्त्वाचे असते यात बांधकाम, वीज, पाणीपुरवठा यांचा समावेश होतो. यास औद्योगिक क्षेत्र म्हणतात.

**३)　तृतीय क्षेत्र / सेवा क्षेत्रः-**

या क्षेत्रातील उत्पादन अमूर्त सेवांच्या स्वरुपात असते. या सेवांच्या पायावर प्राथमिक व दुय्यम क्षेत्रातील उत्पादन अवलंबून असते. यामध्ये शिक्षण, आरोग्य, वाहतूक, उर्जा व शक्ती साधने, बँका, विमा इ. चा समावेश होतो.

**स्थूल देशांतर्गकत उत्पादनाची क्षेत्रवार विभागणी शेकडा प्रमाण**

| वर्ष | शेती | उद्योग | सेवा |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५३.१ | १६.६ | ३०.३ |
| १९६०-६१ | ४८.७ | २०.५ | ३०.८ |
| १९७०-७१ | ४२.३ | २४.० | ३३.८ |
| १९८०-८१ | ३६.१ | २५.९ | ३८.० |
| १९९०-९१ | २९.६ | २७.७ | ४२.७ |
| २०००-०१ | २२.३ | २७.३ | ५०.४ |
| २०१०-११ | १४.५ | २७.८ | ५७.७ |
| २०११-१२ | १३.९ | २७.० | ५९.० |

**आर्थिक सर्वेक्षण – २०१०-१२:**

वरील कोष्टकावरुन असे आढळते कि शेती क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी झाला असून उद्योग व सेवा क्षेत्राच्या वाट्यात सातत्याने वाढ झाली आहे.

**१)　शेती क्षेत्राच्या वाटयात घटः-**

नियोजन काळात स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील शेती श्रेत्राच्या वाट्यात सातत्यपूर्ण रीतीने घट झालेली आहे. कारण या नियोजन काळात औद्योगिक सेवा श्रेत्राचा विकास झाला आहे. १९५०-५१ मध्ये हा वाटा ५३.१% होता तो आता १३.९ टक्के झाला आहे.

**२)　उद्योग क्षेत्राच्या वाट्यात चढउतारः-**

उद्योग क्षेत्राच्या वाट्यात वाढीची प्रवृत्ती दिसत असली तरी त्यात चढउतार झाले आहेत. १९५०-५१ ते १९९० या काळात उद्योगक्षेत्राचा वाटा वाढत गेला तरी २०००-०१ मध्ये त्यात घट होऊन २०१०-११ मध्ये त्यात वाढ झाली आहे.

**३)　सेवा श्रेत्राच्या वाट्यात सात्यातेने वाढः-**

नियोजन काळात स्थूल देशांर्तग उत्पादनातील सेवा श्रेत्राच्या वाट्यात सातत्याने वाढ झाली आहे. १९५०-५१ मध्ये हा वाटा ३०.३ टक्के होता ते २०११-१२ मध्ये ५९.० टक्के पर्यंत वाढला.

**४)　व्यापार, हॉटेल, वाहतूक व दळणवळणः-**

या सेवा क्षेत्रातील वाट्यात वाढ झाली आहे. स्थूल देशातर्गत उत्पादनातील हा वाटा १९५१ मध्ये ११.३ टक्के होता. त्यामुळे २०१०-११ मध्ये २७.२ टक्के पर्यंत वाढ

झाली. या वाट्यात वाढ होण्याचे कारण म्हणजे गेल्या काही वर्षात हॉटेल, वाहतूक, दळणवळण क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. खाजगी टेलीफोन सेवा, मोबाईल यात होणारी वाढ हीच सेवा क्षेत्राच्या वाढीस कारणीभूत आहे.

**५) बांधकाम, व्यापार क्षेत्र:-**

यांच्यात वाढ झाली आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हा वाटा १९५०-५१ मध्ये ७.७ टक्के होता त्यात २०१०-११ मध्ये १७.४ टक्के पर्यंत वाढ झाली. या वाट्यातील जलद वाढीचे कारण भारतातील वित्तबाजार हे होय.

## ❖ राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्यावसायिक विभागणीतील बदल. (Change in the Occupational Structure)

व्यावसायिक विभागणी देशातील लोकसंख्येचा विविध व्यावसायातील विभाजन दर्शवते. व्यावसायिक विभागणी तीन वेगवेगळया क्षेत्रात केली जाते. प्रामुख्याने तीन क्षेत्राचा व्यावसायक विभागणीत समावेश होतो. प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र आणि सेवा क्षेत्र होय.

**प्राथमिक क्षेत्र:-**

प्राथमिक क्षेत्रात शेती, पशुपालन, जंगलकाम, खाणकाम, मासेमारी इ व्यावसायाचा समावेश होतो.

**दुय्यम क्षेत्र:-**

दुय्यम क्षेत्रामध्ये खाणकाम, लघुउद्योग मोठे उद्योग, कुटीर, उद्योग, घरगुती उद्योग बांधकाम, वीजपुरवठा, पाणीपुरवठा इ. व्यवसायाचा समावेश होता.

**सेवा क्षेत्र:-**

या क्षेत्रात वाहतूक, दळणवळण, बँका, विमा व्यवसाय, व्यापार डॉक्टर, वकील, वित्तीय संस्था टेलिफोन सेवा इ. चा समावेश होतो.

देशाचा आर्थिक विकास आणि व्यावसायिक विभागणी याचा जवळचा संबंध आहे. व्याासायिक विभागणीत होणाऱ्या बदलावर विकास अवलंबून असतो.

**व्यावसायिक विभागणीतील बदल:-**

१९९१-२००१ या कालखंडात भारताच्या व्यवसायिक विभागणीत महत्त्वाचे बदल झाले हे बदल पुढील कोष्टकात दर्शवले आहेत.

## भारतातील कर्त्या लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी १९९१-२००१

| | क्षेत्र | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक क्षेत्र :- | ६७.५ | ५७.३ |
| | शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसाय | ६६.९ | ५६.७ |
| | खाणकाम, दगडकाम | ०.६ | ०.६ |
| २ | द्वितीय क्षेत्र | ११.७ | १७.६ |
| | वस्तु निर्माण | ९.४ | १३.४ |
| | वीज, गॅस, पाणीपुरवठा | ०.४ | ०.५ |
| | बांधकाम | १.९ | ३.७ |
| ३ | सेवा क्षेत्र | | |
| | व्यापार, हॉटेल | २०.४ | २५.२ |
| | वाहतूक, दळणवळण साठवण | ७.१ | ९.४ |
| | वित्तसेवा, गृहनिर्माण | २.८ | ४.० |
| | व्यापारसेवा | १.१ | २.० |
| | इतरसेवा | ९.४ | ९.८ |
| | एकूण | १०० | १०० |

१. २००१ मध्ये शेतीशी संबंधीत व्यवसायात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ५७.३ टक्के आहे. ते १९५०-५१ मध्ये ६७.५ टक्के होते. म्हणजेच २००१ मध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा प्रमाणात घट झाली आहे. प्राथमिक क्षेत्रात काम करणारे बरेच कामगार स्वयंरोजगार असतात. त्यांना नोकरीच्या बाबतीत सुरक्षितता नसते ते फार गरीब असतात. समाजाकडून हा घटक उपेक्षीत असतो.

२. दुय्यम क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १९९१ पेक्षा २००१ मध्ये वाढले आहे १९९१ मध्ये दुय्यम क्षेत्रात कायम करणाऱ्याचे प्रमाण ११.७ टक्के होते. ते २००१ मध्ये १७.६ पर्यंत वाढले आहे. कारण वस्तुनिर्माण क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचा प्रमाणात वाढ झाली आहे हे प्रमाण १९९१ मध्ये ९.४ टक्के होते ते १३.४ टक्के पर्यत वाढले आहे. यामध्ये लघुउद्योगांचा समावेश मोठ्या प्रमाणात होते.

३. बांधकाम क्षेत्रातील रोजगार जवळ जवळ दुप्पट झाला आहे. १९९१ मध्ये या क्षेत्रात ५.५ मिलियन रोजगार उपलब्ध होत त्यात २००१ मध्ये वाढ होऊन ११.५ मिलियन झाला आहे. आणि हेच बांधकाम क्षेत्रातील रोजगार प्रमाण १९९१ मध्ये १.९.१ होते. त्यात वाढ होऊन ३.७ टक्के झाले.

४. सेवा क्षेत्रातील रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. हा हिस्सा १९९१ मध्ये २०.४ टक्के होतो तो २००१ मध्ये २५.२ टक्के झाला. सेवा क्षेत्रातील वाढ ही जलदगतीने होत आहे. व्यापार हॉटेल यांचा हिस्सा १९९१ मध्ये ७.१ टक्के होतो. तो २००१ मध्ये ९.४ टक्के झाला. तर वित्तसेवा घरबांधणी यांच्या वाट्यात १.१ टक्के वरुन २००१ मध्ये २०.० टक्यापर्यंत वाढ झाली. यात होणारी वाढ जवळजवळ दुप्पट आहे.

५. १९५१-१९९१ या कालखंडात प्राथमिक द्वितीय व सेवा क्षेत्रातील रोजगारात फार मोठ्या प्रमाणात बदल झाला नाही. परंतू १९९१-२००१ या कालखंडात द्वितीय व तृतीय क्षेत्रातील व्यवसायिक रचनेत मोठ्या प्रमाणात बदल झाला. १९९१ मध्ये प्राथमिक क्षेत्राचा रोजगारातील हिस्सा ६७.५ टक्के होतो. तो २००१ मध्ये ५७.३ टक्के पर्यंत कमी झाला. त्याच प्रमाणे द्वितीय आणि सेवा क्षेत्रातील रोजगारातील हिस्सा १९९१ मध्ये ३२५ टक्के होता तो २००१ मध्ये ४२ टक्यापर्यंत वाढला औद्योगिकीकरणातील जलद वाढीमुळे बँका, वित्त आणि व्यापार क्षेत्रातील रोजगारात १९९१ पासून वाढ झाली.

६. केवळ तामिळनाडू, महाराष्ट्र आणि वेस्ट बंगाल मधील व्यवसायिक रचनेत मोठ्या प्रमाणात बदल झाला. या राज्यातील प्राथमिक क्षेत्रावर रोजगारासाठी अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमी झाले आणि द्वितीय सेवा क्षेत्रातील रोजगारात वाढ झाली.

७. रोजगाराची विभागणी संघटीत क्षेत्रातील रोजगार व असंघटीत क्षेत्रातील रोजगार अशी केली जाते. संघटीत क्षेत्रातील रोजगार सर्वसाधारणपणे वेतन जास्त व मिळणारे इतर फायदे असंघटीत क्षेत्रापेक्षा अधिक असतात असे समजले जाते. तसेच संघटीत क्षेत्रातील रोजगारात नोकरीची सुरक्षीतता देखील जास्त असते.

संघटीत क्षेत्रातील (सार्वजनिक खाजगी) एकत्रित रोजगारातील वाढ २०१० मध्ये १.९ टक्के आहे. २००९ मध्ये होणाऱ्या २.३ टक्के ह्या वार्षिक रोजगारातील वाढीपेक्षा १.९ टक्के ही २०१० मधील रोजगारातील वाढ कमी आहे. खाजगी क्षेत्रातीत रोजगारात होणारी वार्षिक वाढ ही सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार वाढीपेक्षा जास्त आहे.

८. नॅशनल कमिशन फॉर एम्पलॉयमेंटने असंघटीत क्षेत्रातील औपचारीक आणि अनऔपचारिक रोजगारात फरक केला आहे. त्याच्यामते अनौपचारीक रोजगार, स्विकारणाचा श्रमिकांना सामाजिक सुरक्षितता मिळत नाही तर औपचारिक रोजगार स्विकारणाऱ्या श्रमिकांना पेन्शन आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध होतात म्हणून औपचारिक रोजगार स्विकारण्याचा समावेश संघटीत क्षेत्र तर अनौपचारिक रोजगार स्विकारणाऱ्यांचा समावेश असंघटीत क्षेत्रात केला जातो.

**संघटीत क्षेत्रातील औपचारिक व अनौपचारिक रोजगार (मिलियन)**

| रोजगार प्रकार | १९९१-२००० | २००४-०५ |
|---|---|---|
| औपचारिक | २०.४६ | २९.१४ |
| अनौपचारिक | ३३.६७ | ३३.४२ |
| एकूण | ५४.१२ | ६२.५७ |

नॅशनल कमिशन फॉर एम्पलॉयमेंटची मते १९९९-२००० मध्ये संघटीत क्षेत्रात रोजगार उपलब्धता ५४.१२ मिलियन होती. त्यात वाढ होऊन २००४-०५ मध्ये ६२.५ टक्के मिलियन झाली ही वाढ अनौपचारिक रोजगारात झालेल्या वाढीमुळे झाली आहे.

९. जागतिकीकरणामुळे कमी वेतानावर करणाऱ्या स्त्रियांच्या रोजगारात वाढ झाली आहे. रोजगारातील ही वाढ प्रामुख्याने निर्यात श्रेत्रातील उद्योगात झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने कपडा, शुज, इलक्ट्रॉनिक उद्योगांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे स्त्रिया कंपनीतील काम कॉन्ट्रॉक्टप्रमाणे घरी आणुन करणे पसंत करतात. या स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

नॅशनल कमिशन ऑन लेबर २००२ रिपोर्टनुसार कंपन्या अप्रत्यक्षरीत्या कामगारावर दडपण आणतात. मानसिक छळवणूक करतात. राजीनामा देण्यास भाग पाडतात किंवा VRS सक्तीची रजा घेण्यास लावतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारताच्या व्यावसायिक रचनेतील बदलांच्या आढावा घ्या.

२) टिपा लिहा – व्यावसायिक विभागणी.

## ७.६ सर्वसमावेशक वृध्दी

**पार्श्र्वभूमी :-**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशाला दिलेल्या वचनात. दारिद्रय, रोगराई, अशिक्षितता आणि असमान संधी या प्रमुख शत्रूंचा नायनाट करण्याची शपथ घेतली होती. स्वातंत्र्योत्तर सहा दशकांमध्ये देशाने लक्षणीय विकास साध्य केला आहे. ही गोष्ट पुढील मुंदयांवर स्पष्ट होते.

- दहा पंचवार्षिक योजना पूर्ण करुन अकराव्या पंचवार्षिक योजनेचा (२००७-१२) श्री गणेशा.
- नवव्या योजनेतील (१९९७-२००२) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील मंद आणि असमाधानकारक वाढीच्या (५.५% प्रतिवर्ष) पाइर्वभूमीवर दहाव्या योजना काळात सरासरी ७.७% विकासाची झेप घेतली. वृद्धीचा हा दर योजना काळातील सर्वोच्च दर होता.
- दहाव्या योजनेच्या शेवटचा तीन - चार वर्षात विकासदर अधिक उंचावून सरासरीने ८.७% ही पातळी गाठून भारतीय अर्थव्यवस्था जगातील जलद विकास साधणाऱ्या राष्ट्रांच्या पंक्तीत जाऊन बसली.
- आर्थिक विकासाच्या हा दर गाठण्यात अनेक घटकांचा सहभाग आहे, यामध्ये

- बचत आणि गुंतवणुकीतील लक्षणीय वाढ.
- आर्थिक सुधारणानंतर औदयोगीक क्षेत्राचा समाधानकारक प्रतिसाद.
- जागतिक बाजारातील स्पर्धाक्षमतेचा सुधारणा
- भारतात गुंतवणुकीचे परकीयांना आकर्षण.

इत्यादींचा समावेश होतो. भारतीय अर्थव्यवस्था आता अशा वळणावर पोचली आहे की यापुढे चिरकालीन विकास साधून भारतीय जनतेचे जास्तीत जास्त कल्याण साधून जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर देशाची वाटचाल शक्य आहे.

## २१.२ सर्वसमावेशक विकास : संकल्पना आणि महत्त्व

असमतोल विकासाने मतभेद, लिंगभेद, व्यक्तीभेद, प्रदेशभेद, क्षेत्रभेद वर्णभेद इत्यादींमध्ये वाढ होऊन काहीना लाभ होतो. तर मोठया संख्येचा तोटा होतो. विकासप्रक्रियेत आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या लाभामध्ये जो पर्यंत सर्वाचा समावेश होत नाही. तो पर्यंत तो विकास निरर्थक ठरतो. भारतीय अर्थव्यवस्थेने नियोजन काळात आणि खास करुन दहाव्या योजनेच्या कालावधीमध्ये लक्षणीय प्रगती साधूनही बरेच गट, प्रदेश, व्यक्ती इत्यादी लाभांपासून वंचित राहिले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी सर्वसमावेशक विकास (Inclusive Growth) साध्य करण्याची नितांत गरज आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत यावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे.

अर्थव्यवस्थेची क्षमता वृद्धिगंत करुन, त्या द्वारे विकासाची अशी प्रक्रिया निर्माण करणे की ज्यातून बहुसंख्याच्या विशेष करुन, गरीब, अनुसुचित जाती, जमाती, इतर मागासवर्गिय, अल्पसंख्य आणि स्त्रिया इत्यादी उपेक्षितांच्या जीवमानात (जीवनमानात) लक्षणीय सुधारणा होईल. याकडे लक्ष देणे, हा अकराव्या योजनेच्या विचारसरणीचा गाभा आहे.

स्थूलमानाने, सर्वसमावेशक विकास म्हणजे वृद्धीची अशी प्रक्रिया की ज्याद्वारे विकासाचे लाभ सर्वांना प्राप्त होतात आणि संपूर्ण समाजाला समान संधी उपलब्ध होतात.
वरिल व्याख्येवरुन सर्वसमावेशक विकासाची पुढील प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

- जातपात, वर्ग, वर्ण, लिंग, भाषा, भौगोलिक स्थान अशा पायावर होणारा भेदभाव नष्ट करणे.
- सर्व क्षेत्रात सर्वांना समान संधी प्राप्त होणे.
- शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभूत आणि आवश्यक सुविधा सर्वांच्या आवाक्यात आणणे.
- सर्वांना रोजगाराच्या समान संधी प्राप्त होणे.

**संकल्पनेचे महत्त्व :-**

सर्वसमावेशक विकास ही निर्विवादपणे अत्यंत महत्त्वाची व्यावहारिक आणि विकासप्रक्रियेला मानवी परिमाण प्रदान करणारी संकल्पना आहे. समाजातील सर्व घटकांना संधीची दारे याच मार्गाने उघडता येतील. गेल्या काही दशकात अनेक अविकसित देशानी नजरेत भरण्यासारखी प्रगती साध्य करुनही सर्व सामान्यांच्या जीवनात सुख आणि समाधानाचा प्रवेश झालेला नाही हे सत्य आहे. भारताची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही.

सहा दशकांच्या नियोजनाद्वारे देसाने विकासाचा वेग वाढवण्यात स्पृहणीय यश प्राप्त केले आहे. या प्रकरणाच्या सुखातील आपण याचा आढावा घेतला आहे. तथापि एकविसाव्या शतकाचे पहिले दशक पूर्ण होता नाही असमानता कायमच आहे. बालमृत्यू, कुपोषण, कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मागासलेला ग्रामीण भाग, सुयोग्य आणि कायमस्वरुपी रोजगारीचा अभाव, गरीब-श्रीमंतांमधील रुंदावणारी दरी, स्त्रियांवरील सामाजिक अत्याचार, माध्यमिक आणि उच्चपरिक्षणाच्या असमान संधी, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांवरील – अनुसूचित जाती – जमाती, स्त्रिया, आर्थिक दृष्ट्या मागासलेले गट – अन्याय आणि अत्याचारातील वाढ, भ्रष्ट नोकरशाही – इत्यादी (ही यादी मारुतीच्या शेपटाप्रमाणे कायम वाढणारी आहे) गोष्ट विकासाची फळे अनेकांना चारवावयास मिळाली नाहीत ही सत्य स्पष्ट होते.

जलद विकास ही जनकल्याणाची आवश्यक पूर्वअट असली तरी ती पुरेशी अट नाही. सर्व समावेशक विकासाशिवाय व्यापक जनहित प्राप्त होणे केवळ कठीण नाही तर अशक्य आहे. यावरुन या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट होते. या संदर्भात पुढील मुद्दे लक्षात घेतल्यास संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट होण्यास मदत होईल.

- व्यापक आणि व्यावहारिक संकल्पना.
- विकासाचे अंतिम उदिद्ष्ट.
- समानता हा पाया.
- समतोल विकासाच्या पलीकडे जाणारी संकल्पना.
- मानवी परिणामांचा चेहरा.
- महत्तम कल्याणाचा एकमेव मार्ग.

सारांश, सर्वसमावेशक विकास ही संपूर्ण समाजाला उन्नती आणि समृद्धीच्या मार्गावर नेणारी संकल्पना आहे. भारताच्या दृष्टीने विचार केल्यास जागतिक महासत्तेचे बिरुद प्राप्त करण्यासाठी सर्वसमावेशक विकास अत्यावश्यक आहे. याच दृष्टिकोनातून भारतीय नियोजनकारांनी जलद आणि सर्वसमावेशक विकासात अकराव्या योजनेत केंद्रीय स्थान दिले आहे.

## २१.३ साधन आणि साध्य:-

अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात जलद आणि सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामध्ये जलद विकास हे साधन असून सर्वसमावेशक विकास हे अंतिम साध्य आहे. जलद विकासातून सर्व समावेशक विकास कसा साधता येईल यांचे स्पष्टीकरण खालील मुद्दयांच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.

- **जलद विकास आणि दारिद्र्य निवारण:-**

गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील अंतर कमी होणे हे समावेशक विकासाचे प्रमुख लक्षण आहे. अर्थात दारिद्र्य निवारणाला अग्रकम प्राप्त होतो. यासाठी सर्वांना, विशेषत : गरिबांना व्यापाक संधी उपलब्ध व्हावयास हव्यात. जलद विकासामुळे रोजगार आणि उत्पन्नात वाढ होऊन गरिबी दूर होण्यास म्हणजे पर्यायाने सर्वसमावेशक विकास साधण्यास मदत होते.

- **जलद विकास आणि रोजगार:-**

जलद विकासाद्वारे औदयोगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास होऊन जनतेला अधिक उत्पन्न देणारे रोजगार उपलब्ध होऊन शेतीतील कमी उत्पन्न रोजगारीतून त्यांची मुक्तता होईल त्याचबरोबर शेतीचा विकास साधल्यास त्या क्षेत्राचा उरलेल्या श्रमिकांच्या उत्पन्नात वाढ होईल. यासाठी जलद विकासातून कृषी, उदयोग, आणि सेवा क्षेत्रांच्या विकासात समतोल प्रस्थापित करावा लागेल.

सर्वसमावेशक विकासाचे प्रमुख निर्देशक म्हणजे व्यापक प्रमाणावरील रोजगार निर्मिती, जलद विकासाच्या सहाय्याने कृषी आणि औद्योगीक क्षेत्रातील लहान आणि मध्यम प्रमाणावरील उदयोगधंदयात वाढ होऊन रोजगार निर्मितीचे आव्हान स्वीकारता येईल.

- **जलद विकास आणि आवश्यक सुविधा:-**

गरीब व्यक्ती या दारिद्र्याचा दुष्टचक्रात सापडलेल्या असता त्यांच्याजवळ भांडवल, भूमी, कौशल्य या गोष्टींचा अभाव तर असतोच पण त्यांना शिक्षण, आरोग्य या सारख्या आवश्यक सेवाही उपलब्ध नसतात. रोगराई, निरक्षरता इत्यादींमुळे गरीब व्यक्ती विकासाच्या लाभांपासून कायम वंचित राहतात. जलद विकासाच्या प्रक्रियेत अकराव्या योजनेने या सेवा उपलब्ध करण्यावर भर दिला आहे. समाजातील गरीब, उपेक्षित वर्ग, स्त्रिया इत्यादींना शिक्षण आणि आरोग्यविषयक सुविधा, पिण्याचे स्वच्छ पाणी, मलनि : रसारण अशा सोयी उपलब्ध झाल्यास त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल सर्वसमावेशक विकासात याला अन्यन्य साधारण महत्त्व आहे आणि जलद विकासाद्वारे हे साध्य करता येते.

- **सामाजिक न्याय, सक्षमीकरण:-**

सर्वसमावेशक विकासाची संकल्पना पारंपारिक गरिबी हटाव संक्लपनेहून अधिक व्यापक आहे. यामध्ये समान संधीबरोबर देशातील उपेक्षित वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक गतीक्षमता वाढीचा विचार अंतर्भूत आहे. यासाठी आतापर्यंत दुलर्क्षित असलेल्या गटांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ज्यामुळे विकास प्रक्रियेतील त्यांच्या सहभागाचा प्रत्यय येईल.

- **लिंग समानता:-**

भारतीय नियोजनाच्या साठ वर्षाच्या कालावधीत अकराव्या योजनेत प्रथमच सर्वसमाविशक विकासाच्या संदर्भात आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत प्रथमच महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. स्त्री सबलीकरणाच्या पलीकडे जाऊन स्त्रियांच्या गरजा, हक्क आणि सहभाग योजनेच्या प्रत्येक विभागात प्रतिबिंबीत होतील असा प्रयत्न करण्यात आला आहे. स्त्रियांचा विचार करताना, अकराव्या योजनेत स्त्रियांमधील जात, भौगोलिक स्थान, धर्म, समाज इत्यादींमुळे निर्माण होणाऱ्या भिन्नतेचा विचार करुन सर्वांच्या विभिन्न आवश्यकतांकडे लक्ष देण्याचे ठरवलेले आढळते.

## २१.४ भेदभाव निराकरण:-

सर्वसमावेशक विकास ही एक आदर्श आणि आवश्यक संकल्पना आहे. त्याबाबतीत योग्य ती कारवाई केली गेल्यास या संकल्पनेचे सर्वांकडून स्वागत होऊन तिला जनसामान्यांचा भरघोस पाठिंबा मिळेल. भेदविरहित समाजाच्या निर्मितीसाठी विविध क्षेत्रातील भेद शोधून ते दूर करण्यासाठी योग्य ती कृती करणे आवश्यक आहे. असे

लक्षणीय भेदभाव अस्तित्त्वात असणाऱ्या चार प्रकारांचा अकराव्या पंचवार्षिक योजनेत उल्लेख केलेला आढळतो.

- गरीब – श्रीमंत दरी.
- आवश्यक सेवा उपलब्धतेतील भेद.
- ग्रामीण – नागरी भिन्नता.
- प्रादेशिक असमतोल.

- **गरीब – श्रीमंत दरी:-**

दारिद्र्यांचे मापन करण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणाचा आणि संख्येचा वापर केला जातो. २००४-०५ या वर्षासाठी दारिद्ररेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण २७.८% होते. १९९३ मध्ये हे प्रमाण सुमारे ३६% होते. म्हणजे सुमारे ११ वर्षाच्या कालावधीत या प्रमाणात ८ टक्क्यांनी घट झाली. याचा अर्थ असा की प्रतिवर्षी सरासरी ७.८% घट झाली आहे. हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. शिवाय वाढत्या लोकसंख्येच्या संदर्भात विचार केल्यास दारिद्र्य रेषेखालील प्रत्यक्ष संख्या वाढलेली आढळते. २००४-०५ या वर्षात अशा लोकांची संख्या ३०० दशलक्ष, म्हणजे अधिकृत अंदाजापेक्षा (२६० दशलक्ष) खूपच जास्त आहे. या परिस्थितीची गंभीर नोंद घेऊन अकराव्या योजनेते असे प्रतिपादन केले गेले की

> "बिगर शेती व्यावसायाचा विकास दर उच्च असूनही त्यातून शेतीच्या मंद विकासाची भरपाई होवू शकत नाही. दारिद्र्याच्या प्रमाणात झालेली तुटपुंजी घट ही केवळ १९९९-२००५ ह्या काळात शेतमालाच्या किंमतीत फारशी वाढ न झाल्याचा परिणाम आहे म्हणजे या कालावधीत शेतीचा विकास उच्च दराने झाला असता तर दारिद्र्य निवारण अधिक प्रभावी झाले असते."

- **आवश्यक सेवा उपलब्धता:-**

पिण्याचे पाणी, मल निरसारण, आरोग्य, शिक्षण या सारख्या जीवनावश्यक सेवांच्या उपलब्धेते बाबतीत अनेक पातळ्यांवर गंभीर विषयमता अनुभवास येते. सर्वसाधारणपणे श्रीमतांना ह्यां सोयी सहज उपलब्ध असतात तर गरीब, झोपडपट्टीवासी इत्यादी या सुविधांपासून वंचित राहतात. ह्या बाबतीत ग्रामीण व नागरी विभागातही लक्षणीय भेद अस्तित्त्वात असतो. या सुविधांच्या अभावी लोकांचे आरोग्य तसेच कार्यक्षमता यावर विपरित परिणाम होतो. ही विषमता दूर झाल्याशिवाय सर्वसमावेशक विकास अशक्य आहे. विविध योजनांद्वारे हे भेद नष्ट करण्यावर अकराव्या योजनेत विशेष भर देण्यात आला आहे.

- **विभागीय (ग्रामीण – नागरी) विषमता:-**

भारत हा खेडयांचा देश होता आणि आजही आहे. तथापि सहा दशकांच्या नियोजना नंतरही, नागरी विभागाच्या तुलनेत विकासाचे लाभ ग्रामीण विभागापर्यंत फारसे पोचले नाहीत. परिणामतः अकराव्या योजनेत ग्रामीण नागरी विषमता दूर करण्यासाठी खास प्रयत्नांची गरज आहे. NSS च्या पाहणीवरुन असे स्पष्ट होते की नागरी : ग्रामीण उपभोगांचे गुणोत्तर १.६२ (१९९३), १.७६ (१९९९) आणि १.९७ (२००५) असे सतत वाढत आहेत. ह्या नागरी बागातील श्रीमंतांच्या उपभोगाची संपूर्ण माहिती गोळा केलेली नाही. तसेच आवश्यक सेवांच्या उपलब्धतेचे प्रमाण लक्षात घेतल्यास नागरी – ग्रामीण विषमता आणखीनच वाढते.

- **प्रादेशिक असमतोल:-**

देशाची विभागणी श्रीमंत आणि गरीब राज्ये यामध्ये झालेली असून त्यांच्यातील विषमता सतत वाढत जात आहे. विकास दरांच्या बाबतीत या दोन वर्गातील अंतर दिवसेंदिवस रुंदावत आहे. मुलभूत सुविधांच्या कमतरतेमुळे गरीब राज्यात भारतीय आणि परकीय गुंतवणूक फारशी आकर्षित होत नाही. फक्त शिक्षण आणि आरोग्य या दोन बाबतीत या दोहोमधील विषमता कमी होताना आढळून येते. या बरोबरीने इतर सुविधांमध्ये सुधारणा झाल्यास गरीब राज्यांमध्ये गुंतवणुकीतील पोषक वातावरण निर्माण होवू शकेल.

विविध राज्यांमध्ये असलेल्या विषमते बरोबर वैयक्तीक राज्यांतर्गतही विकासातील फरक लक्षणीय आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्र हे श्रीमंत अथवा विकसित राज्य असले तरी त्याच्या सर्व जिल्याच्या विकास समतोल नाही. विदर्भ, मराठवाडा, कोकण या विभागातील अनेक जिल्हे, एकूण राज्याच्या तुलनते अविकसित अथवा मागासलेले आहेत. हीच परिस्थिती इतर राज्यातही अनुभवास येते. हया सर्व मागास जिल्हयांच्या बाबतीत जाणवणारे साधर्म्य म्हणजे हे सर्व जिल्हे शेतीसाठी प्रामुख्याने पावसावर अवलंबून असून तेथील जमीन कमी कसदार आहे. त्याचबरोबर पायाभूत सुविधांचा आणि संपर्कमाध्यमांचा अभाव ही त्यांची समान लक्षणे आहेत. यांपैकी अनेक जिल्हे हे प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्येचे आहे. आदिवासीच्या अनेक समस्यांवर अजूनही समाधानकारक उपाय सापडलेले नाहीत. ह्यापैकी बहुतेक राज्यात नक्षलवादी चळवळ फोफावते आहे. मागास जिल्ह्यांच्या समस्या अग्रक्रमाने न सोडल्यास राष्ट्रीय हिताला ते बाधक ठरण्याचा गंभीर धोका आहे.

आंतरराज्यीय आणि राज्यांतर्गत असमतोल दूर करण्यासाठी सरकारने एका नवीन कार्यक्रमाची आखणी केली आहे. या अंतर्गत "मागास प्रदेश अनुदान निधी" निर्माण करुन त्यातून या जिल्ह्यांच्या विकासाचे प्रयत्न केले जात आहेत.

## ७.७ प्रश्न

१) १९९१ च्या नविन आर्थिक धोरणाची उत्पत्ती (कारणे) स्पष्ट करा.

२) १९९१ च्या नविन आर्थिक धोरणातील सुधारणा स्पष्ट करा.

३) १९९१ पासूनच्या राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नातील कल दर्शवा.

४) राष्ट्रीय उत्पन्नाची क्षेत्रवार विभागणी यावर टिप लिहा.

५) भारताच्या व्यावसायिक रचनेतील बदलांचा आढावा घ्या.

६) सर्वसामावेशक वृध्दी म्हणजे काय सांगून त्याचे महत्व स्पष्ट करा.

७) टिप लिहा:

सर्वसमावेशक वृध्दीचे महत्व.

❖❖❖❖

# ८

# आर्थिक विकासातील मुलभुत मुद्दे भाग - २

**घटक रचना:**

८.१ उद्दिष्टये
८.२ प्रस्तावना
८.३ १९९१ नंतरची भारतातील मानवी विकास निर्देशांकातील प्रगती
८.४ भारतातील शिक्षण आणि आरोग्य संदर्भात सरकारी धोरण
८.५ रोजगारातील अलिकडील प्रवृत्ती
८.६ बेरोजगारीच्या समस्या
८.७ प्रश्न

## ८.१ उद्दिष्टये

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक विकास आर्थिक वृध्दी याबरोबरच मानवी विकास ही संकल्पना अधिक महत्वाची व गतीमान आहे. आपण या पाठात १९९१ च्या नविन आर्थिक धोरणानंतर मानवी विकास निर्देशाक कसा प्रगत / सुधारत गेला, शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर त्याचा कसा परिणाम होत गेला याचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची मुख्य उद्दिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. भारतातल मानव विकास निर्देशांक ही संकल्पना अभ्यासणे.

२. शिक्षण व आरोग्य संदर्भात सरकारी धोरणांचा अभ्यास करणे.

३. रोजगार व बेरोजगार या संकल्पना समजावून घेणे.

## ८.२ प्रस्तावना

संपूर्ण विकास प्रयत्नांचे उद्दिष्ट्य देशातील लोकांच्या कल्यानाची पातळी उंचावणे हे आहे. मानवी विकास हेच आर्थिक विकासाचे ध्येय आहे. मानवी विकासामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. मानवी विकासामुळे कृषीक्षेत्राचा तसेच औद्योगिक क्षेत्राचा विकास वेगाने होण्यास मदत होते. म्हणूनच भारत सरकारने ११ व १२ व्या पंचवार्षिक योजनेत मानवी विकासाला प्राधान्य दिले आहे. मानवी विकासामुळे समुध्दी कालीन विकास (Millenium Development) शक्य आहे. शिक्षण आणि आरोग्यविषयक उपाययोजना करुन यातही विकासाचे ध्येय साध्य करता येते.

## ८.३ १९९१ नंतरची भारतातील मानवी विकास निर्देशांकातील प्रगती

जनतेच्या निवडीसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधीची व्याप्ती वाढविणे म्हणजेच मानवी विकास होय.

मानवी विकास म्हणजे मानवाचा, मानवांनी मानवासाठी केलेला विकास होय. मानवी कार्य व कार्यक्षमतेचा विकास करुन जनतेच्या निवडीच्या संधीमध्ये वाढ म्हणजेच मानवी विकास होय. आयुमर्यादा, ज्ञान सहभाग, सुरक्षा, सातत्य, मानवी हक्कांची हमी या साऱ्यांचा समावेश मानवी विकासात होतो.

### मानवी विकास निर्देशांक व मोजमाप (Human Devleopment Index and its measurent)

मानवी विकासाच्या बहुविधतेमूळे त्याचे मापन कठीण आहे. तरीही मानवी, विकास निर्देशाक ते करण्याचा प्रयत्न करतो. हा निर्देशांक बहुआयामी असून व आरोग्य आणि शिक्षण यांचे मापन करतो. हा निर्देशांक मानवी विकासाच्यातीत मुलभुत घटकांचा संयुक्तपणे किंवा एकत्रितपणे विचार करतो. मानवी विकास निर्देशांकात पूढील तीन घटकांचा विचार केला जातो.

१) दीर्घायुष्य म्हणजेच आयुमर्यादा.

२) शिक्षण (ज्ञान, साक्षरता)

३) दर्जात्मक राहणीमान. (दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न)

मानवी विकास निर्देशांक हा पूढील तीन मुलभूत निर्देशांकाचा वापर करुन मोजला जातो.

१) जीवनयान (आयुमर्यादा) निर्देशांक.

२) शिक्षण निर्देशांक आणि

३) राहणीमान (स्थुल राष्ट्रीय उत्पन्न) निर्देशांक.

वरिल प्रत्येक निर्देशांकाची किमान व कमाल मूल्य मोजून एक सामान्य सुत्र तयार केले जाते.

$$\text{विस्तार निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

निर्देशांकाचा मूल्य विस्तार ० ते १ इतका असतो. जर प्रत्यक्ष मूल्य हे कमाल मूल्याइतके असेल तर निर्देशांक १ इतका आलो. मानवी विकास निर्देशांक पूढील तीन मुलभूत घटक समाविष्ट असलेल्या सुत्राद्वारेही मोजता येतो.

$$\text{मानवी विकास निर्देशांक (HDI)} = \sqrt[3]{\text{जीवनमान - क्षिशण निर्देशांक - GNI निर्देशांक - निर्देशांक}}$$

**तक्ता क्रमांक ८.३**

**भारताची HDI मुल्य व त्याचे घटक**

| | घटक | मुल्य (२०१२) |
|---|---|---|
| १. | जन्मापासून आयुमयादा (वर्षे) | ६५.८ |
| २. | शैक्षणिक वर्ष मध्यमान (वर्षे) | ४.४ |
| ३. | अपेक्षित शैक्षणिक वर्षे | १०.७ |
| ४. | दरडोई उत्पन्न (GNI - खरेदी शक्ती समता दर डॉलरमधील) | ३२८५ |
| | मानवी निर्देशांक मूल्य | ०.५५४ |

वरिल तक्ता क्रमांक ८.३ वरुन भारताचा समावेश मध्यम मानवी विकास निर्देशांकात असून तो २०१२ मध्ये ०.५५४ इतका होता.

भारताच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर देशांचे मानवी विकास निर्देशांक पूढील तक्त्यात दर्शविले आहेत.

**तक्ता क्रमांक ८.३.१.**

**२०१२ मधील निवडक देशांचे मानवी विकास निर्देशांक**

| देश | HDI श्रेणी | HDI मूल्य |
|---|---|---|
| नॉर्वे | १ | ०.९५५ उच्च |
| अमेरिका (US) | ३ | ०.९३७ उच्च |
| श्रीलंका | ९२ | ०.७१५ मध्यम |
| चायना | १०१ | ०.६९९ मध्यम |
| भारत | १३६ | ०.५५४ मध्यम |
| पाकिस्तान | १४६ | ०.५१५ न्युन |
| बांगलादेश | १४६ | ०.५१५ न्युन |

वरिल तक्ता क्रमांक ८.३.१ वरुन असे म्हणता येइल की मानवी विकास निर्देशीक हा विकसित देशांचा उच्च, विकसनशील देशांचा मध्यम तर अविकसित देशांचा न्युन असल्याचे स्पष्ट होते.

## १. लैंगिक विकास निर्देशांक (Gender Development Index)

मानवी विकास निर्देशांक ज्या घटकांचा उपयोग करतो त्याच घटकांचा उपयोग करुन लैंगिक विकास निर्देशांकाचे मापन केले जाते. दीर्घयुष्य, शिक्षण, दरडोई उत्पन्न याबरोबरच स्त्री व पुरुष यांच्यातील असामनतेचे मापण या निर्देशांकात केले जाते. लैंगिक विषयता निर्देशांक म्हणजेच लैंगिक विकास निर्देशांक होय. जेवढी लैंगिक विषमता जास्त तेवढी लैंगिक विकास निर्देशांक कमी असतो. २००७ मध्ये भारताचा लैंगिक विकास निर्देशांक मूल्य ०.५९४ तर लैंगिक विकास निर्देशांक श्रेणी ११४ इतकी होती.

### २. लैंगिक सबलीकरण मापक (Gender Empowerment Measure - GEM)

लैंगिक सबलीकरण मापकाच्या सहाय्याने स्त्रिया आर्थिक व सामाजिक जीवनात सक्रीयतेने सहभागी होवू शकतात किंवा नाही हे दर्शवले जाते. आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रात स्त्रियांना उपलब्ध असलेल्या संधीचा विचार यामध्ये केला जातो. आर्थिक सामाजिक व राजकीय सहभाग दर्शवणाऱ्या या तिन्ही घटकांची बेरीज करुन लैगींक सबलीकरण मापक ठरवला जातो. तो लैगिक विकास निर्देशांकापेक्षा वेगळा आहे. कारण लैगिक विकास निर्देशांकात मुलभूत पात्रतामध्ये असलेल्या लैंगिक विषयतेचा विचार केला जातो. २०१२ मध्ये भारताचा लैंगिक सबलीकरण मापक मूल्य ०.६१० तर लैगिंग सबलीकरण मापक श्रेणी १३२ इतकी होती. चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशांपेक्षा भारताचा लैंगिक विषमता निर्देशांक जास्त आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) मानवी विकास म्हणजे काय ?

२) मानवी विकास निर्देशांक मोजण्याचे सुत्र कोणते ?

### ३) मानवी दारिद्र्य निर्देशांक (Humen Poverty Index)

बहुआगामी निर्बलीकरण यांच्या सहाय्याने मानवी दारिद्र्याची व्याख्या केली जाते. दीर्घायुष्य, ज्ञान, सुयोग्य राहणीमान विविध क्षेत्रे व निर्णय प्रक्रियेतील सहभाग यातील वंचितता (deprivation) यांचा विचार या निर्देशांकात केला जातो. याचा अर्थ मानवी विकासापासून वंचितता म्हणजे मानवी दारिद्र्य होय. विकसनशील देशात HPI - I हा मानवी दारिद्र्यासाठी मापदंड वापरतात. मानवी दारिद्र्य म्हणजे नकारात्मक मानवी निर्देशांक होय. २००२ ते २०१२ मध्ये भारताचा मानवी दारिद्र्य निर्देशांक ०.२८३ तर मानवी दारिद्र्य निर्देशांक श्रेणी १३६ इतकी होती. तर राष्ट्रीय दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी २९.८% इतकी होती.

## ८.४ भारतातील शिक्षण आणि आरोग्य संदर्भात सरकारी धोरण (Government Policy with respect to Education & Health in India)

जागतिक बँक UNO यांनी केलेल्या अभ्यासात्दारे शिक्षणाचे मानवी विकास व आर्थिक विकासातील महत्त्व स्पष्ट झाले आहे. उच्च विकास दर गाठणाऱ्या पूर्व आशियातील देशांनी शिक्षणातील गुंतवणुकीमुळे तंत्रज्ञानाचा पाया घातला. आधुनिक काळात शिक्षणावरील खर्चाचा सामवेश गुंतवणुकीत केला जातो. शिक्षणातील गुंतवणुकीमुळे

१) नविन तंत्रज्ञान सुलभतेने व जलद गतीने स्वीकारण्याची पाश्र्वभूमी तयार होते.

२)	आधुनिक तंत्रज्ञान अधिकाधिक ज्ञान सधन होत जाणार आहे.

३)	व्यवस्थापन कौशल्याचा विकासासाठीदेखील ही गुंतवणुक आवश्यक आहे.

२००३-०४ साली शिक्षणावरील खर्च स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ३.७४% होता. दहाव्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक शिक्षणाला सर्वोच्च अग्रक्रम दिला आहे.

उच्च शिक्षणासाठी देशात २४५ विद्यापीठे, ५२ विद्यापीठ समकक्ष संस्था (Deemed Universities), ११.८३१ महाविद्यालये आहेत. यात स्त्रियांसाठी असलेल्या १,५२० महाविद्यालयांचा समावेश आहे. उच्चशिक्षणात नोंदणीकृत व्यक्तीमध्ये मुलींचे प्रमाण ३६% आहे मात्र उच्चशिक्षणास पात्र असलेल्या लोकसंख्येचा केवळ ४% लोकसंख्येलाच ही सुविधा प्राप्त होते. कालबाह्य अभ्यासक्रम, घसरती शैक्षणीक गुणवत्ता, संशोधनाच्या अपुऱ्या सोयी हे उच्च शिक्षण व्यवस्थेतील दोष आहे.

प्रौढ शिक्षणासाठी राष्ट्रीय साक्षरता योजना १९८८ साली राबविली गेली. त्यासाठी साक्षरता (Functional Literacy) यावर भर दिला गेला. स्त्रियांच्या साक्षरतेस अधिक महत्व देण्यात आले. त्यामुळे स्त्री-पुरुष साक्षरतेतील दरी २४.८% (१९९१) पासून २१.६% पर्यंत (२००१) कमी झाली.

शासकीय शैक्षणिक धोरणाचे घटक पुढीलप्रमाणे:

१)	सर्वासाठी शिक्षण.

२)	मुलांसाठी शिक्षणाचा मूलभत हक्क.

३)	मुलींसाठी प्राथमिक स्तरावरील शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम.

४)	कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय.

५)	मधल्या वेळचा आहार देण्याची योजना.

६)	वंचित गटांसाठी केंद्र सरकारचा शिक्षण योजना.

७)	सर्वशिक्षा अभियान.

**सर्वशिक्षा अभियान :-**

सर्व शिक्षा अभियान हे सर्वांचा प्रथमिक शिक्षण देण्याचे प्रमुख साधन होय. त्याची सुरुवात २००१-०२ साली झाली. राज्य सरकारशी भागीदारी करुन केंद्र सरकार ही योजना राबवीते. २०१० सालापर्यंत ६-१४ या वयोगटातील सर्व विद्यार्थ्याना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे या योजनेचे उद्दिष्टे आहे. २००७ पर्यंत या वयोगटातील सर्वांचा ५ वर्षाचे व २०१० पर्यंत या वयोगटातील सर्वांचा ८ वर्षाचे शिक्षण देणे हे या योजनेत अंतर्भूत आहे.

**आरोग्य व मानवी विकास :-**

कामगारांची कार्यक्षमता आरोग्यावर अवलंबून असते. आरोग्य सुधारणांमुळे कार्यक्षमतेत आपोआपच वाढ होते व त्यामुळे राष्ट्रीय उत्पादन वाढते. आरोग्य सुधारणांमुळे आर्थिक विकासास पुढील कारणांमुळे चालना मिळते:

१)	कामगारांचा आजारपणामुळे उत्पादनात होणारी घट कमी होते.

२)	राष्ट्रीय संपत्तीचा व साधनांचा पूर्ण उपयोग केला जातो.

३) शिक्षणासाठी नोंदणीकृत विद्यार्थ्याची संख्या वाढून त्यांची शिक्षण घेण्याची क्षमता वाढते.

४) आजारांवरील उपाययोजनांसाठी जो खर्च झाला असता तो पर्यायी उपयोगांकडे वळविता येतो.

समतोल व पोषक आहार व वैद्यकीय सुविधा हे उत्तम आरोग्यासाठी आवश्यक घटक आहेत.

भारतातील लोकांच्या आरोग्यांची गुणवत्ता कनिष्ठ प्रतीची आहे. तरीही आर्थिक नियोजन काळात आरोग्य गुणवत्तेत सुधारणा दिसते. आरोग्य सुविधांवरील खर्च स्थूल देशातर्गत उत्पन्नाचा ५.२% आहे.

नियोजन काळात आरोग्य पायाभूत सुविधात उल्लेखनीय वाढ झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या ५७, ३५३ (१९८१) ते १,६८,९८६ (२००४) पर्यंत वाढली. दवाखाने व हॉस्पिटलच्या संख्येत या काळात २३, ५५५ पासून ३८,०३१ पर्यंत वाढ झाली. यामुळे मृत्यू दर याच काळात १२.५ पासून ८ पर्यंत घटला. अर्भक मृत्यूदर ११० पासून ६३ पर्यंत कमी झाला. याच काळात आयुमर्यादा ६५ वर्षापर्यंत वाढली. मलेरिया, क्षय, महारोग, AIDS कॅन्सर, या सारख्या सांसर्गिक आणि असांसर्गिक रोगांवर नियंत्रण ठेवण्यात आले.

**२००२ च्या राष्ट्रीय आरोग्य धोरणता.**

१) पोलिओ निर्मूलन.

२) कुष्ठरोग प्रमाण कमी करणे.

३) AIDS ची वाढ शून्य टक्यावर आणणे.

४) अंधत्वाचे प्रमाण ०.५% पर्यंत कमी करणे.

५) अर्भक मृत्यू दर २०१० पर्यंत ३०/१००० पर्यंत आणणे.

६) सार्वजनिक आरोग्य सुविधांचा वापर वाढविणे या मुद्यांवर भर दिला गेला.

अशा प्रकारे आरोग्य सुविधांच्या विस्ताराद्वारे दारिद्र्य निर्मूलन उत्पादकेत वाढ, मानवी विकास व आर्थिक विकास साधण्यास सहाय करण्यास विविध धोरणे अंगीकरिली आहेत व भविष्याकालीन नियोजनातदेखील अशा धोरणांचा अवलंब करण्यात येईल.

## ८.५ रोजगारातील अलिकडील प्रवृत्ती

जागतिकीकरणाच्या सामाजिक लक्षासंबंधी जागतिक आयोगाने असे मत व्यक्त केले की १९९३-०३ च्या दशकात जागतिक बेकारीत १८८ दशलक्षांनी वाढ झाली आहे. परिणामः स्वयंरोजणार वाढलेला आढळतो. (WCSDG - 2004)

जागतिकीकरणाच्या पर्वात भारताची रोजगार स्थिती बिघडलेली आढळते. रोजगारवाढीचा वार्षिक दर १९६३-९४ या कालावधीत २.०४% होता. तो १९९४-२००० या कालावधीमध्ये प्रतिवर्षि ०.९८ इतका घसरला.

संघटित क्षेत्राला, त्याच्या उत्पादन आणि रोजगार निर्मितीच्या क्षमतेमुळे, विकासाचे यंत्र (Engine of Growth) मानले जाते. तथापि १९९४-२००८ या कालावधीत भारतीय संघटित क्षेत्रातील रोजगार वृध्दीचा दर केवळ ०.५३ टक्के इतका नगण्य पातळीवर उतरला. सार्वजनिक क्षेत्रातील वाढीचा दर ऋण (-.०३) इतका घसरला तर खाजगी क्षेत्रात तो १.२८% इतका होता. संघटित क्षेत्रातील रोजगार निर्मितीत सार्वजनिक क्षेत्राचा वाटा ६९ टक्के असल्याने खासगी क्षेत्रातील वाढता रोजगार, एकूण संघटित क्षेत्रातील रोजगारची घसरण रोखू शकला नाही. परिणाम संघटित क्षेत्राचा रोजगारातील हिस्सा ७.९३% (१९८३) वरुन ७.०८% इतका ९९-२००० सालात घटला.

संघटित क्षेत्राच्या अपयशामुळे श्रमिकांचा ओघ असंघटित क्षेत्राकडे वाढू लागला. असंघटित क्षेत्राच्या तुलनेत संघटित क्षेत्रातील कामगारांना, वेतन, बोनस, इतर फायदे, सुरक्षित इत्यादी अनेक लाभ प्राप्त होतात. संघटित क्षेत्रात खाजगी क्षेत्रापेक्षा सार्वजनिक क्षेत्रातील नोकरदारांची परिस्थिती, वेतन, सुरक्षितता इत्यादी बाबतीत अधिक चांगली असते.

यावरुन असे लक्षात येते की जागतिकीकरणानंतर अर्थव्यवस्थेत अनैपचारिकता प्रक्रियेला चालना मिळाली उदाहरणार्थ, या काळात श्रमिकांना कायमस्वरुपी नोकरी ऐवजी रोजदारी, करारपध्दत, किरकोळ नोकरी इत्यादींना तोंड द्यावे लागेल. राष्ट्रीय नमुना पाहणी (N.S.S.) असवालानुसार किरकोळ कोनरदारांचे प्रमाण १९८३ मधील २८.७ टक्क्यांवरुन ९९-२००० मध्ये ३३.२ टक्क्यापर्यंत वाढले.

जागतिकीकरणाने श्रमिक वर्गाच्या अवनतीला (Proletarinization) हातभार लावला बेरोजगारी, कमीवेतन, अर्धवेळ नोकरी, किरकोळीकरण, नोकरीतील सुरक्षिततेचा अभाव अथवा नगण्य सुरक्षितता, नोकरी आणि बडतर्फी धोरण (Hire and Fire) इत्यादी कामगार हितविरोधी गोष्टींचे प्रमाण सातत्याने वाढताना आढळते जागतिकरण्याच्या पायावर विकास साधून मालक आणि कामगार या दोन्ही गटांचा लाभ होण्याऐवजी पिळवणुकीत वाढ झालेली आढळते.

## ८.६ बेरोजगारीच्या समस्या

भारतात बेकारी अनेक कारणांनी निर्माण झाली आहे. त्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) लोकसंख्या वाढ:-**

बेरोजगारीत वाढ होण्याचे प्रमुख कारण लोकसख्येत जलद गतीने झालेली वाढ होय. आज ज्या प्रमाणात लोकसंख्येत वाढ होत आहे. त्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होत नाहीत म्हणून बेरोजगारीत वाढ होत आहे.

**२) हंगामी शेती:-**

भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे. जून ते सप्टेंबर या काळात रोजगार मिळतो इतर वेळी बेकार रहावे लागते.

**३)    हस्तोद्योगांचा ऱ्हासः-**

औद्योगिकीकरणअमुळे ग्रामीण व हस्तोउद्योगांच्या मालाला असलेली मागणी कमी होऊन ते उद्योग बंद पडले. त्यामुळे त्या उद्योगातील बेकारांचा भार कृषीक्षेत्रावर पडला.

**४)    भांडवलप्रधान तंत्रावर भरः-**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक विकासावर भर देण्यात आला. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात जे उद्योगधंदे स्थापन करण्यात आले त्यात भांडवल प्रधान तंत्राचा वापर करण्यात आला. त्याचा परिणाम म्हणून बेकारी वाढली.

**५)    पायाभूत सुविधांचा अभावः-**

भारतात विज, रस्ते, उर्जास्त्रोत, पाणीपुरवठा साधनांचा विकास पुरेशा प्रमाणात झाला नाही म्हणून बेकारी वाढत आहे.

**६)    भांडवलाचा अभावः-**

भारतात  उद्योगधंदे सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल उपलब्ध नाही म्हणून नवीन रोजगार निर्मिती होत नाही.

**७)    सदोष शिक्षण पध्दतीः-**

भारतीय शिक्षण पध्दती माहितीवर आधारीत आहे. व्यावसायिक शिक्षणाचा अभवा आहे. त्यामुळे शिक्षण पूर्ण केल्यावर रोजगार मिळणे शक्य होत नाही.

**८)    जलसिंचनाचा अभावः-**

भारतात ३३ टक्के जमिनीला जलसिंचन सुविधा उपलब्ध आहेत व ६६ टक्के जमिनाला जलसिंचन सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे रोजगार संधी पुरेशा नाहीत.

**९)    रोजगाराकडे पाहण्याचा चुकीचा दृष्टीकोनः-**

सुशिक्षित लोक शारीरिक कष्टांची कामे करण्यास तयार होत नाहीत ते पांढरपेशा रोजगाराच्या शोधत असतात. अशा रोजगार संधीची उपब्धता कमी आहे.

**१०)    वाढते खाजगीकरणः-**

भारतात खाजगीकरणाला प्राधान्य आणि सार्वजनिक उद्योगांचे योगदान कमी करणे हे धोरण आखल्याने कपात मोठ्या प्रमाणात होत आहे. म्हणून भारतात बेकारी वाढत आहे.

**रोजगार वाढीसाठी उपाययोजनाः**

भारतात नियोजनाला सुरुवात केल्यानंतरच्या काळात जे विविध प्रकारचे विकास कार्य राबविले त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगारसंधी निर्माण झाल्या. मात्र देशातील व विशेतः ग्रामीण भागातील बेकारीची समस्या गंभीर बनत गेली. त्यामुळे सरकारने अनेक योजना व कार्यक्रम सुरु केले. बेकारीची समस्या सोडविण्यासाठी सरकारने पुढील कार्यक्रम राबविले.

## १) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम:-

ऑक्टोबर १९८० मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम सुरु करण्यात आला. केंद्र व राज्य यांच्याकडून समान प्रमाणात खर्च केला जातो. रोजगार संधी निर्माण करणे टिकाऊ समाज मालमत्ता निर्माण करणे आणि ग्रामीण क्षेत्रातील राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. १९९० ते ९९ मध्ये ९०१.८४ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

## २) अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम:-

देशातील काही निवडक अवर्षण - प्रवण क्षेत्रांमध्ये हा कार्यक्रम १९७३-७४ मध्ये सुरु करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट जमीन, पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा संतुलित विकास घडवून आणून या प्रदेशातील पर्यावरणाचा समतोल पूर्णस्थापित करावे हे होते. या योजनेसाठी येणारा खर्च केंद्र व राज्य सरकार मध्ये ५०.५० प्रमाणात करण्यात आला १३ राज्यातील १५५ जिल्हामधील ९४७ गटांमध्ये ही योजना राबवली जात आहे.

## ३) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना:-

माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांनी १ एप्रिल १९९९ या वर्षी ही योजना सुरु केली. या योजनेत राष्ट्रीय गामीण रोजगार योजना, ग्रामीण श्रमीक रोजगार हमी योजना, ग्रामीण वस्ती व बालक विकास योजना, ग्रामीण युवक स्वयंरोजगार योजना या योजनांना एकत्र करुन स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना तयार करण्यात आली.

## ४) जवाहर ग्रामसमृध्दी योजना:-

जवाहर रोजगार योजनेची पुनर्रचना करुन / एप्रिल १९९९ रोजी जवाहर ग्राम समुध्दी योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा उद्देश रोजगाराच्या संधी उपलब्ध करुण देणे हा होता. या योजनेचा खर्च केंद्र व राज्य सरकार यांनी ७५.२५ प्रमाणात करावा असे ठरविले.

## ५) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना:-

२५ सप्टेंबर २००१ पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरु करण्यात आली या योजनेचा उद्देश ग्रामीण भागात रोजगाराबरोबरच अन्नधान्याची सुरक्षा, समाजोपयोगी दिर्घकाळ टिकतील अशी उत्पादक संपत्ती निर्माण करणे हे ठरविण्यात आले. कामगारास किमान वेतन हे किमान २५ टक्के रोख स्वरुपात आणि किमान ५ कि. ग्रॅम अन्नधान्याच्या स्वरुपात अशा संमिश्र स्वरुपात दिले जाईल.

## ६) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना:

ही योजना २५ डिसेंबर २००५ पासून १०० टक्के केंद्र सरकार पुरस्कृत म्हणून सुरु करण्यात आली. सर्व खेडेगावात बारामाही रस्त्यांची जोडणी करणे हा उद्देश या योजनेचा होता या योजने अंतर्गत डिसेंबर २००० पर्यंत १,४२,७५० कि. मी लांबीचे रस्ते निर्माण करण्यात आले आहे.

**७) इंदिरा आवास योजना:-**

१९९९ - २००० या वर्षात ही योजना नव्याने सुरु करण्यात आली. या योजनेनुसार ग्रामीण भागात कच्ची घरे पक्की बांधणे व दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी ही योजना अमंलात आणली गेली. या योजनेसाठी जिल्हे निवडताना मागासवर्गीय भटक्या जाती यांच्यासाठी घरे बांधण्यावर अधिक भर देण्यात आला.

**८) भारत निर्माण योजना:-**

खेड्याकडे एक पाऊल हे धोरण स्विकारुन केंद्र सरकारने १६ डिंसेबर २००५ रोजी भारत निर्माण योजना सुरु केली या योजनेचे उद्दिष्ट ग्रामीण भागा पायाभूत सुविधांची निर्मिती हे आहे. योजनेचा नियोजित खर्च र.१,१४,००० कोटी एवढा आहे.

**९) अन्नपूर्णा योजना:-**

१ एप्रिल २००० या वर्षी १०० टक्के केंद्र शासनाच्या अनुदानाने ही योजना सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत वरिष्ठ नागरीक पेन्शन योजने अंतर्गत अन्नधान्याचा स्वरुपात सुरक्षा पुरवली जाते. या योजनेत २ रुपये किलो गहू व ३ रुपये या दराने तांदळाचा पुरवठा करण्यात येतो. २५ राज्य व ५ केंद्रशासित प्रदेशात ही योजना अमंलात आणलेली आहे.

**१०) रोजगार हमी योजना:-**

ही योजना १९७२-७३ मध्ये सुरु झाली. या योजनेद्वारे उत्पादक मालमत्ता निर्माण केली जाते. लघु पाणी-पुरवठा योजना, जलसंरक्षण, जंगल संवर्धन असे श्रमप्रधान प्रकल्प हाती घेतले जातात. ६० टक्के खर्च वेतनावर केला जातो. १८ वर्षावरील ग्रामीण बेकाराला रोजगाराची हमी देतात. हे काम अंकुशल स्वरुपाचे असते. घराजवळीत ५ किलोमीटच्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन दिल्यास निवास खर्च करावा लागत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) बेरोजगारी म्हणजे काय ?

___

___

___

___

___

## ८.७ प्रश्न

१) १९९१ नंतरची भारतातील मानवी विकास निर्देशंकातील प्रगती अभ्यासा.

२) मानवी दारिद्र्य निर्देशांक म्हणजे काय ?

३) भारतातील शिक्षण संर्दभातील शासकीय धोरण स्पष्ट करा.

४) भारतातील आरोग्य संदर्भातील शासकीय धोरण स्पष्ट करा.

५) भारतात रोजगारातील अलिकडील प्रवृत्ती काय आहे हे स्पष्ट करा.

६) बेकारीच्या विविध समस्या कोणत्या आहेत ?

७) भारतात रोजगार वाढीसाठी विविध उपाययोजना कोणाचा आहेत ?

❖❖❖❖

# १

# प्रकरण - ५

# कृषीक्षेत्र, उद्योग आणि सेवाक्षेत्र

**घटक रचना:**

९.१ उद्दिष्ट्ये

९.२ प्रस्तावना

९.३ कृषी उत्पादन आणि उत्पादकतेतील प्रवृत्ती

९.४ २००० चे नविन शेतकी धोरण आणि उपाय

९.५ सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्नसुरक्षा

९.६ जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय शेती

९.७ प्रश्न

## ९.१ उद्दिष्ट्ये

भारतात कृषी हा मुख्य व्यावसाय असल्यानि भारताला शेतीप्रधान किंवा कृषीप्रधान देश असे संबोधले जाते. आपण या पाठात भारतातील कृषी उत्पादन आणि उत्पादकांना यासंबेधीत पूढील प्रमुख उद्दिष्टांचा अभ्यास करणार आहेत.

१) कृषीउत्पादन आणि उत्पादकना यातील प्रवृत्ती अभ्यासणे.

२) २००० च्या नविन शेतीविषयक धोरणाचा अभ्यास करणे.

३) सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्न सुरक्षा या संकल्पना अभ्यासणे.

४) जागतिक व्यापार संघटनेचा भारतातील कृषीक्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे.

## ९.२ प्रस्तावना

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीश्रेत्राची भुमिका महत्वाची आहे. तरीही भारतीय अर्थव्यवस्थेच्या शेतीपध्दतीत विविध दोष आढळून येतात. त्याचा परिणाम शेतकी उत्पादनावर होत असतो. ग्रामीण पतपुरवठा आणि ग्रामीण वित्तीय संस्थांची कृषीश्रेत्रातील उत्पादनक्षमता वाढण्यासाठी महत्वाची भुमिका आहे.

## १.३ कृषी उत्पादन आणि उत्पादकतेतील प्रवृत्ती (Trends in Production and Productivity)

भारतीय शेतीची उत्पादकता, भारतीय शेतीच्या उत्पादकतेतील गेली ५० वर्षातील बदल, भारताच्या शेतजमीनीची उत्पादकता, भारतीय शेतीच्या उत्पादकतेची आंतरराष्ट्रीय पातळीवर तुलना, भारतीय शेतमजुरांची उत्पादकता. भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे भारतीय शेतीची उत्पादकता वाढण्यासाठी केलेले प्रयत्न (हरीतक्रांती नवत्या पंचवार्षिक शेतीचे धोरण)

ब्रिटिश राजवटी दरम्यान भारतातील हस्तकला व्यवसायांना त्यास झाला. त्यामुळे १९२० पर्यंत भारतातून अन्नधान्या मसाल्याचे पदार्थ, चहा, व दुसऱ्या महायुध्दाचा काळापर्यंत सुध्दा भारत हा अन्नधान्याची आयात करणार देश होता भारताला स्वातंत्र्य मिळल्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहलाल नेहरु यांनी “Grow More food and attain self sufficiency” अधिक धान्य पिकवा “चोकसी समितीची स्थापना करण्यात आली. या समितीला असे आढळून आले की शेतीच्या उत्पादन तंत्रात वाढ होण्याबरोबर शेतीमध्ये संस्थात्मक बदल होणे सुध्दा आवश्यक आहे.”

**भारतीय शेतीची अल्प उत्पादकता:-**

उत्पादता ही अर्थशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे. शेतीच्या उत्पादकतेत शेतीचे उत्पादन व शेतजमीन किंवा श्रमिक किंवा भांडवल यांच्याशी जोडला जातो. शेतीची उत्पादकता किंवा दर एकरी उत्पादकता किंवा श्रमिकाची उत्पादकता किंवा भुमीत गुंतलेल्या भांडवलाच्या प्रत्येक एकाकापासून मिळणारे उत्पन्न असा घेतला जातो. “शेतीची उत्पादकता म्हणजे ठराविक प्रदेशाच्या विशिष्ट आकारमानाच्या जमिनीत उपलब्ध असलेल्या तंत्रपध्दतीने मिळणारे उत्पादन होय”.

**किंवा**

“जमिनीची उत्पादकता म्हणजे एक हेक्टर जमिनीमध्ये जेवढे उत्पादन होते त्याला जमिनीची उत्पादकता असे म्हणतात.”

शेतीची उत्पादकता दोन पध्दतींनी मोजता येते.

१) पहिली पध्दत म्हणजे विविध पिकांचे प्रत्येक हेक्टरमध्ये किती उत्पादन होते ते पाहून शेतीची उत्पादकता मोजणे सुत्ररुपाने मांडल्यास

$$\text{शेतीची दर हेक्टरी उत्पादकता} = \frac{\text{शेतीतील उत्पादकता}}{\text{शेतीतील श्रमसंख्या}}$$

या दोन्ही पध्दतींनी भारतीय शेतीची उत्पादकता पहिल्यास ती कमी असल्याचे आढळून येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक नियोजनाला सुरुवात झाल्यापासून उत्पादकतेत वाढ होत आहे. परन्तु इतर विकसीत देशांशी तुलना केल्यास भारतीय शेतीत उत्पादकता कमी आहे.

नियोजनकाळात भारतीय शेतीची उत्पादकता दिवसेदिवस वाढत आहे. शेतजमिनीची मिळालेल्या उत्पादनाला एकूण लागवडीखाली श्रेत्राने भागले असता शेतजमिनीची सरासरी उत्पादकता मिळते. १९५०-५१ ते १९९९-२०० या काळात तांदळाच्या उत्पादनाला १९९० दशलक्ष टन एवढी वाढ आणि उसाच्या दरहेक्टरी उत्पादनातही उल्लेखनीय वाढ झाली आहे. तथापि आंतरराष्ट्रीय तुलना भारतातील शेतजमिनीची उत्पादकता कमी आहे.

**तुलानात्मक उत्पादकता:**

जर भारतातील शेतजमिनीच्या उत्पादनाशी आंतरराष्ट्रीय तुलना (इतर देशांशी) केली तर भारतीय शेत जमिनीची उत्पादकता कमी असल्याचे दिसते. खालील तक्ता क्रमांक ९.१ मध्ये शेतीची तुलनात्मक उत्पादकता दर्शविलेली आहे.

**तक्ता क्रमांक ९.१**

**शेतक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तुलनात्मक उत्पादकता**

| देश | पिक (प्रतिहेक्टर किलोग्रॅम) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तांदुळ | गहू | मका | उस | भूईमूग |
| भारत | २९१५ | २७७० | १७०५ | ६८०४९ | ७९४ |
| पाकिस्तान | २८८२ | २२६२ | १७६९ | ४८०८२ | - |
| बांगलादेश | ३४४८ | २१६४ | - | ३६८९० | - |
| जपान | ६५८२ | - | - | - | १९८५ |
| म्यानमार | ३५३२ | - | - | - | - |
| अमेरिका | ७३७२ | - | - | - | २८६९ |
| चिन | - | - | ५०२२ | ६६,३५३ | २९८६ |
| फ्रान्स | - | ८४४९ | ८८१३ | - | - |
| इजिप्त | - | - | - | १,१९८९३ | - |
| ब्राझील | - | - | - | - | २०८३ |
| इंग्लड | - | ८०४३ | - | - | - |
| इटली | - | - | ९५६० | - | - |

आंतराष्ट्रीय पातळीवर तुलना करता भारताची शेती श्रेत्रातील दर हेक्टरी उत्पादकता कमी आहे हे वरिल तक्त्यातील आकडेवारी वरुन लक्षात येते. त्याच प्रमाणे भारतात श्रमिकांची उत्पादकताही कमी आहे हे पूढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**श्रमिकांची आंतरराषट्रीय तुलनात्मक उत्पादकता**

| देश | प्रती श्रमिक शेती उत्पादकता (टनामध्ये) |
|---|---|
| भारत | २.२ |
| जपान | १३.१ |
| अमेरिका | १२३.५ |
| इंग्लंड | ५७.३ |
| ऑस्ट्रेलिया | १२५.८ |
| कॅनडा | ११५.२ |

**Source - Statistical outline of India.**

वरील आकडेवरीवरुन असे म्हणता येईल भारत शेतीप्रधान देश असूनही भारतात प्रती श्रमिक शेतीउत्पादकता कमी आहे. भारतातील शेतीउत्पादकता खालावलेली का आहे ? त्याची अनेक कारणे आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे.

१) जमिनीच्या कमी उत्पादकतेमुळे शेती उत्पादकताही कमी आहे.

२) जमिनीची धूप, जमिनीचे लहान आकारमान यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता घटत आहे.

३) जमिनीचा अपर्याप्त वापर हे शेतीक्षेत्राच्या कमी उत्पादकतेचे कारण आहे.

४) श्रमिकांची कमी उत्पादनक्षमता असल्यामुळे भारतात शेतीउत्पादकता वाढत नाही.

५) योग्य प्रतिच्या बी-बियांणाचा अभाव असल्यामुळे शेती श्रेत्रातील उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

६) कालाबाह्य शेती आणि भांडवलाच्या अभावामुळे शेतीची उत्पादकता खालावत आहे.

७) दोषपूर्ण भुधारण पध्दती विभाजन व तुकडीकरण आणि पिकसंरक्षण अभाव यासारखे जबाबदार घटक शेती उत्पाकतेला कारणीभूत आहेत.

८) भारतातील शेती उत्पादकता कमी असल्याचे आणखी एक कारण म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, कर्जपुरवठ्याच्या सोयींचा अभाव हे होय.

९) उत्पादनखर्चवाढ, छुपी बेकारी, बाजारपेठेतील दोष, नैसर्गिक पध्दतीची शेती यासारख्या कारणांमुळे भारतातील शेतीची उत्पादकता घटत आहे.

थोडक्यात भारतातील शेती उत्पादकता कमी असण्यास नैसर्गिक घटक, संस्थात्मक घटक, तंत्रिक व आर्थिक घटक कारणीभूत आहेत. तथापि भारतातल शेती उत्पादकता वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न होणे अत्यत आवश्यक आहे.

**भारतीय शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी उपायः-**

भारतीय शेतीची उत्पादक्ता वाढवण्यासाठी भारत सरकारने १९५१ पासून जे उपाय योजले आहेत ते पूढीलप्रमाणे. सरकारचा या उपायांना तांत्रिक उपाय आणि संख्यात्मक उपाय असेही म्हणतात.

१) सरकारने भारतातील शेतीची उत्पादकता वाढवल्यासाठी तुकडेबंदी व तुकडेजोड विषयक कायदे केले.

२) जमीनीची धुप थांबवण्यासाठी उपाययोजना.

३) कसेल त्याची जमीन व जमीनधारणेवर मर्यादा घालवण्यात आली.

४) सहकारी शेतीला उत्तेजन देऊन शेती उत्पादकता वाढवण्यावर भर दिला.

५) भांडवलाची समस्या व पुनर्बाजारीपणा दूर करण्याच्या हेतुने कर्जपुरवठा करण्यासाठी नाबार्ड (NABARD) ची स्थापना केली.

६) शेतीच्या सर्वागिण विकासासाठी संशोधनास प्रोत्साहन दिले गेले.

७) जलसिंचन सुविधा, खते, किटकनाशके इत्यादी सुविधा पुरविणे.

८) उच्च दर्जाची बी बियाणे व संकरित बियांणांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे.

९) पिकांचे संरक्षण व पिक विमा योजना सुरु करुन शेतीउत्पादकता वाढीसाठी प्रयत्न केल गेले.

१०) आधूनिक तंत्रज्ञान, शेतीच्या आधूनिकीकरणावर भर देण्यात आल्या.

११) शेतीविषयक सर्वकष धोरण सरकारने १९७० मध्ये अवलंबून शेतिविकास व शेतकऱ्यांची राहीणीमान उंचावण्याच्या हेतूने प्रयत्न केले आहे.

वरील सर्व उपायांमुळे भारतात शेतीची उत्पादकता संथ गतीने का होईना परंतु वाढ आहे हे महत्वाचे.

**आपली प्रगती तपासा.**

१) शेतीची उत्पादकता म्हणजे काय ?

२) शेतीउत्पादकता वाढवण्यासाठी कसे प्रयत्न कराल ?

# १.४ २००० चे नविन शेतकी धोरण आणि उपाय

भारत सरकारने २२ जूर्ले २००० या दिवशी शेतीचे नवीन धोरण मांडले आर्थिक वृध्दीबरोबरच समानता प्रस्थापित करुन देशातील सर्व प्रदेशांचा संतुलित विकास घडवून आणण्यासाठी शेतीमाल निर्यात करुन शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळवून देणे, तसेच आर्थिक विकास ही उद्दीष्टये प्राप्त करण्यासाठी २००० चे नविन शेतीधोरण जाहिर करण्यात आले.

या धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेती क्षेत्रात ४ टक्के पर्यंत विकास घडवून आणणे.

२) रचनात्मक बदल घडवून आणणे.

३) अन्नधान्य व किमान पोषक अन्नाची सुरक्षा.

४) उत्पादक साधनसामुग्रीची कार्यक्षमता वाढविणे.

५) शेती क्षेत्र अधिक बाजाराभीमुख करणे.

६) शेतीक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांची गुंतवणूक करणे.

७) शेतीक्षेत्रात निर्माण होणाऱ्या संभात्य धोक्याचे व्यवस्थापन करणे.

**राष्ट्रीय शेतीधोरण २००० ची वैशिष्ट्ये:-**

भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे शेतीक्षेत्रात विकासाबोरबर इतर अनेक समस्यांचे निराकरण करण्याच्या हेतून नवीन राष्ट्रीय शेती धोरण राबविण्यात आले. या धोरणाची प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) शेतीतील आर्थिक विकास दर ४ टक्के राखणे:-

शेतीतील संस्थात्मक बदलांबरोबरच तांत्रिक बदल करणे, कररचनेत सुधारणा करणे, आर्थिक दृष्ट्या व पर्यावरणाला सुसंग असे तंत्रज्ञान वापरुन शेती क्षेत्रात सरासरी ४ टक्के विकासदर प्राप्त करणे हे उद्दिष्ट्य ठरविण्यात आले. यासाठी जमीनीचे बीगरशेती वापरासाठी हस्तांतरण थांबविणे, साधन सामुग्रीचा पर्याप्त वापर बहुविध आंतरपध्दतीचा अवलंब करणे व जमिनीची धूप थांबविणे अशा उपाययोजना सुचवण्यात आल्या.

### २) साधनसामुग्री व तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापर:-

जैविक तंत्रज्ञानाचा वापर, उर्जा बचत करणारे तंत्रज्ञान, तसेच पर्यावरणाचे रक्षण करणारे तंत्रज्ञान यांचा जास्तीत जास्त वापर व्हावा यावर या धोरणात भर दिला गेला. सरकार तर्फे स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या सूक्ष्म बनवण्यात येऊन स्त्रीयांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल असेही ठरविण्यात आले.

**३) आदान व्यवस्थापन:-**

शेतकऱ्यांना वेळच्या वेळी विविध प्रकारची यंत्रसामुग्री (आदाने) तसेच उच्च दर्जाची बी-बियाणे, खते, जंतूनाशक, शेतकी उपकरणे व सवलतीच्या दरात कर्जाची उपलब्धता करुन देणे, असेही या धोरणात ठरविण्यात आले. बी-बीयाणांचा पुरवठा करण्यासाठी National Seed Grid ची स्थापना करण्याचे ठरले.

**४) संस्थात्मक पुर्नरचना:-**

विकसित देशातील धोरणांप्रमाणे भारतातील शेतजमीनीची तुकडे जोड करणे, अतिरिक्त जमिनीचे वाटप भूमिहीन शेतकरी व शेतमजूर यांना करावे. स्त्रीयांना जमीनमालकी हक्क मान्य करणे, जमीनीच्या मालकीची नोंद करणे व ती अद्यावत करणे या शिवाय जमीनमालकांना खातेपुस्तक देण्यात यावे.

**५) धोके व्यवस्थापन:-**

शेती व्यवसायात होणारी पिकांची नासाडी, हवामानात होणारे बदल, बाजारातील अपूर्णता इत्यादी धोके व्यवस्थापनासाठी नवीन गोष्टी धोरणात विविध उपाय योजण्यात आले. शेतमालाला विमा संरक्षण देण्यात यावे, किंमतीतील चढ-उतार, अन्नधान्य खरेदी व बाजार व्यवस्थापना या मार्गाने शेतकऱ्यांचे नुकसानापासुन संरक्षण करणे.

**राष्ट्रीय शेतीधोरण २००० चे मूल्यमापन:-**

नवीन राष्ट्रीय शेतीधोरणाला Rainbow Revolution म्हणजे सप्तरंगी क्रांती असे म्हटले जाते. कारण ह्या मध्ये

१) हरित क्रांती - सर्व पिकांसाठी

२) धवलक्रांती - दुध व दुग्धजन्यपदार्थासाठी व

३) नील क्रांती - मासे व समुद्रजीव विषयक

या सर्वांचा समावेश होतो.

या नविन शेती धोरणाने अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णता मिळवली. तथापि देशातील उपासमार, भुकबळी संपूर्ण दूर झाले नाही. त्यामुळे या धोरणांत पुढीलप्रमाणे टिका केली जाते.

१) या धोरणात उद्देश प्राप्तीसाठी संस्थात्मक उद्देश केला नाही.

२) या धोरणात मागास राज्याचा विचार केला नसल्यामुळे ती राज्ये शेतीच्या विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षितच राहिली.

३) या धोरणात खाजगी क्षेत्राला व भांडवलशाही शेतीला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागात विषमता वाढीस लागली.

४) ४ टक्के वृध्दीदर गाठण्यात अपयश आले.

**आपली प्रगती तपासा.**

१. २००० च्या नविन शेती धोरणाची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

## १.५ सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्नसुरक्षा सरक्षा (Public Distribution System-PDS and Food Security)

भारतात अन्नधान्य व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने पुढील उपाययोजना राबवल्या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था (अ) पुरवठयाच्या दृष्टीकोनातून (ब) मागणीच्या दृष्टीकोनातून राबवता येते.

**१) सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution System) :-**

या व्यवस्थेत तांदूळ, गहू, साखर, रॉकेल, खाद्दतेल यासारख्या महत्वाच्या वस्तू अनुदनित किमंतीस पुरवल्या जातात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील विक्रीत या वस्तूंचा वाटा जवळजवळ ८६% इतका आहे. (साखर-३५%, तांदूळ-२७%, गहू-१०%, रॉकेल-१५% ) संपूर्ण भारतभर ही व्यवस्था कार्यरत आहे. शिधापत्रिका अशा सर्व व्याक्तिंना देण्यात येती की ज्यांचा नोदणीकृत निवासाचा / राहण्याचा पत्ता आहे. भारतात १९६० साली ४७ हजार रास्त भावाची धान्याची दुकाने होती तर २००० साली ती एकूण ४.७ लाख इतकी होती. २००० लोकसंख्येसाठी एक रास्त भावाचे धान्याचे दुकान असते.

ही योजना जास्त गरीब लोकांच्या गरजा पुरवणारी व्हावी यासाठी जुन १९९७ मध्ये सुरु करण्यात आली दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबांना विशेष अनुदनित किंमतीला / दराला अन्नधान्य पुरवण्याचे ध्येय या व्यवस्थेचे आहे. दरमहा प्रत्येक कुटुंबाला सरसरी ३५ किलो धान्याचा फायदा झाला आहे. अन्नधान्याचे वितरण करताना विक्री किंमत ही राज्य सरकारकडून ठरविली जाते.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे विकेंद्रीकरण होणे अवश्यक आहे. यात पहिल्या गटात पंचायत व स्थानिक संघटनांचा अन्न सुरक्षा व्यवस्थेत समावेश करावा. त्यांनी गरीबांची नोंद करावी व या लोकांना रोजगार व अन्नदान्य कार्यक्रमांची अमंलबजावणी करावी.

दारिद्र्य निमूर्लनाकरता वापरल्या जाणाऱ्या मार्गाचा / उपक्रमांच्या सहाय्याने ‘अन्न सुरक्षा’ उद्दिष्टयावर भर द्यायला हवा.

या सार्वजनिक वितरण व्यवस्थेला ‘कल्याणकारी कार्यक्रम’ याचा दर्जा प्राप्त झाला आहे. ग्रामीण भागात जाळे पसरवण्याचे कार्य या व्यवस्थेने केले आहे. रास्त भावाच्या

दुकानांची (fare price shops) संख्या ग्रामीण भागात वाढलेली आहे. अनेक रोजगार उपक्रमांमध्ये वेतन म्हणून अनुदानित अन्नदान्य वितरित केले गेले. जास्तीत जास्त गरीब लोकांना या व्यवस्थेचा फायदा झाला आहे.

## २) अन्नधान्य सुरक्षा संकल्पना व व्याख्या :-

भारतीय समाजात शेतीक्षेत्राचे "धनधान्यम विपूलम भवतू" असे ब्रीदवाक्य आहे.

अन्न आणि शेतीसंघटना (Food and Agriculture Organisation FAO) च्या अनुसार "अन्नधान्य सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना कोणत्याहीवेळी भौतिक व आर्थिकदृष्ट्यासहज प्राप्त होवू शकेल अशा मुलभूत अन्नधान्याची सार्वत्रिक उपलब्धता होय."

जागतिक विकास अहवाल १९८६ नुसार "अन्नधान्या सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना सुदृढ आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा अन्नधान्याची कोणत्याही वेळी होवू शकेल अशी उपलब्धता होय."

वरील दोन्ही व्याख्यावरुन अन्नधान्य सुरक्षेबाबत पुढील गोष्टी लक्षात येतात.

अ) सर्व लोकांसाठी अन्नधान्याची भौतिक उपलब्धता.

ब) मूलभूत अन्नधान्यासाठी आर्थिक सुसाध्यता. (आर्थिक क्षमता).

क) मूलभूत अन्नधान्य पोषणक्षम असेल.

ड) अन्नधान्याची सार्वत्रिक उपलब्धता.

ई) निरोगी आरोग्यासाठी जीवनात आवश्यक असणाऱ्या पुरेसा अन्नपुरवठा भारतात

अन्नधान्याच्या उत्पादन स्वयंपुर्णता आणण्यासाठी अन्नधान्य आयात कमी करण्यासाठी व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अन्नधान्य सुरक्षा प्राप्त करण्यासाठी अन्नधान्य सुरक्षा प्रणाली प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

## भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन (Food Management in India) :-

भारत सरकार अन्नधान्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था मागणी व पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून राबवत आहेत.

### अ) मागणीच्या बाजूने उपाययोजना (Demand Side Measures) :-

ग्रामीण भागातील गरिब लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कसे फायदे मिळतील यावर लक्ष दिले जाते. मागणीच्या बाजूने उपाययोजना करताना प्रामुख्याने यामध्ये

- सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution System PDS Policy)
- अन्नपुर्णा योजना (२००० साली)
- संपूर्ण ग्रामिण रोजगार योजना (ऑगस्ट २००१)
- इतर कल्याणकारी योजना (कल्याणकारी कार्यक्रमाचा दर्जा)

वरील विविध योजनांचा समावेश होतो. अन्नपूर्ण योजना ग्राममंत्रालयातर्फे सुरु करण्यात आली. वृध्दव्यक्ती व निवृत्तीवेतन मिळत नाही अशा व्यक्तीना दरमहा १० किलो अन्नधान्यपुरवठा मोफत केला जातो. कल्याकणकारी योजनेत अन्न-धान्यपुरवठा मोफत

केला जातो. कल्याणकारी योजनते कल्याणकारी कार्यक्रमाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो.

## ब) पुरवठ्याच्या बाजूने उपाययोजना (Supply Side Measures) :-

लोकांना पुरेशा प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता व्हावी याकडे सरकार लक्ष देते.

यामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टीचा समावेश होते.

- अन्नधान्याचा शिलकी साठा वाढविणे (Buffer Stock)
- सार्वजनिक शिलकी साठा वाढविणे (Public Distribution System - PDS)
- पूर्वलक्षित सार्वजनिक वितरण व्यवस्था (Targeted PDS 1997)
- भारतीय अन्नमहामंडळ (Food Corporation of India FCI 1965)

वरील सर्व योजनांचा विचार करता असे लक्षात येते की, भारत सरकार अन्नधान्यासुरक्षतेबाबत सर्वतोपरी प्रयत्न करताना दिसून येत आहे. साधारण चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून शिलकीसाठी ही संकलप्ना राबवली जात आहे. शिलकीसाठा सरकारकडे किती असावा याबाबत ५ वर्षातून एकदा निर्णय घेतला जातो. भारतात सरकारकडेच असलेल्या शिलकी साठा पुरेसा आहे. परंतु वितरण व्यवस्था समाधानकारक नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्था संपुर्ण भारतभर कार्यरत आहे. भारतात १९६० साली ४७ हजार धान्ये दुकाने होती. ती २००० साली एकुण ४.० लाख इतकी वाढल्याने दिसून येते. भारतीय अन्नधान्य महामंडळ किमंत स्र्थेर्य व चलन वाढीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

थोडक्यात सरकार मागणीच्या बाजूने आणि पुरवठयाच्या बाजूने उपाययोजना करुन अन्नधान्य सुरक्षा बाबत प्रयत्न करत आहे. वरिल उपायांत्यातिरिक्त सरकारकडून रोजगार कार्यक्रम (Food For Work Programme) हा २००१ पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अंतर्गत सुरु केला आहे.

## दीर्घकालीन अन्नसुरक्षा व्यवस्थापन योजना (Long term food Security Management Policy) :-

१६ नोव्हेंबर २००० साली अन्नधान्याच्या दीर्घ कालीन सुरक्षित उपलब्धतेसाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापना करण्यात आली. दिर्घकालीन अन्नसुरक्षा योजनेतंर्गत राष्ट्रीय शेतीविकास योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेत सुरु करण्यात आली. तेसेच २००७ मध्ये शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय धोरण आखले गेले. दीर्घकालीन अन्नसुरक्षा योजनेतंर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा आयोगाची स्थापनाही करण्यात आली. त्याचप्रमाणे या योजने अंतर्गत अन्नधान्य महामंडळाने (ICI) संपुर्ण गुणवत्ता तपासून निकषाचा वापर करुन सार्वजनिक विरण व्यवस्थेत अन्नधान्याबाबत गुणवत्ता आणण्यासाठी प्रयत्न केला. याशिवाय उत्पादनखर्चात बचत, अन्नधान्याची प्रसंगानुसार आयात निर्यात अशा गोष्टीचाही विचार करण्यात आला.

थोडक्यात नवीन धोरणानुसार ग्रामीण पायाभूत सुविधा, अन्नधान्ये साठवणूक व्यवस्था, अन्नधान्यांची वर्गवारी, प्रतवारी, पॅकींग व्यवस्था व प्रक्रिया याकडे लक्ष देवून उत्पादने बरोबर गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न नविन धोरणात केला आहे.

**आपली प्रगती तपासाः**

१) 'अन्नधान्यसुरक्षा' संकल्पना स्पष्ट करा.

२) सार्वजनिक वितरण व्यवस्था म्हणजे काय ?

## ९.६ जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय शेती (World Trade Organisation-WTO and Indian Agriculture)

जकाती व व्यापारसंबंधी सर्वसाधारण करार (मॅट) १९८७ मध्ये अस्तत्वात झाला. आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे दूर करुन सर्व देशांना आंतरराष्ट्रीय व्यपाराचे लाभ मिळवून देण्याचा उपदेश समोर ठेवून या करारामध्ये सामील झालेल्या देशांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सुरु झाल्या. प्रामुख्याने औद्योगिक उत्पादनांच्या व्यापारावर या चर्चाचा अधिक भर होता. शेतीक्षेत्रासंबंधी मुद्दे अधून मधून चर्चेला येत. १९८६ मध्ये झालेल्या उरुग्वे फेरीत सर्वकल्प करार करण्याचा प्रस्ताव मांडला गेला आणि १९९५ पासून जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आणि या संघटनेच्या अनेक करारामध्ये शेतीविषयक करार सामिल करण्यात आला पारंपारिक करारांव्यतिरिक्त

- व्यापारसंबंधित बौध्दिक हक्क (TRIPS)
- व्यापारासंबंधित गुंतवणूक उपाय (TRIMS) आणि
- सेवाक्षेत्रीय करार.

या नवीन तीन करारांचा प्रथमच आंरराष्ट्रीय वाटाघाटीत समावेश करण्यात आला.

### जागतिक व्यापार संघटनेचे शेतीक्षेत्रासबंधी करार WTO'S Agreement on Agriculture AOA) :-

१) शेतीविषयक करारामध्ये शेतमालाचा व्यापार खुला करण्याच्या दृष्टीने आणि व्यापारवाढीत निर्बध दूर करण्याच्या दृष्टीने अनेक तरतूदी आहे.

२) शेतीतील उत्पादने आयात करण्यावर दोन प्रमुख अडथळे आयात शुल्क (Import Tariff) आणि दुसरा अडथळा वस्तूंच्या आयातीवरील परिणामकारक निर्बध (Restriction on Import).

**आयातशुल्क (Import Tariff) :-**

देशातील उत्पादनखर्च आणि आयात वस्तुंची यातिल फरक इतके आयातशुल्क आकाराचे तर आयात थांबविता येते. खुल्या व्यापाराच्या तत्त्वाविरुध्द अशा प्रकारचे संरक्षण आयातशुल्क असल्याने आयातशुल्क कमी करण्याचे बंधन देशांवर घालण्यात आले आहे. विकसित देशांनी ६ वर्षात ३६ टक्के आयातशुल्क कम करावयाचे आहे आणि विकसनशील देशांसाठी ही कपात १० वर्षात २८ टक्के पण प्रत्येक वस्तूसाठी किमान १० टक्के करावयाची आहे.

**आयातीवरील निर्बंध (Restrictions on Imports) किंवा आयात कोटा (Import Quota) :-**

एका मर्यादेपेक्षा वस्तूची आयात जास्त करता येणार नाही असे बंधन या पध्दतीत घातले जाते काही बंधने काही उपवाद वगळता काढून टाकावयाची आहेत. जर आयातीतील वाढ होण्याची शक्यता असेल आणि आयातीतील वस्तुंच्या किमतीत मोठी घट आल्यामुळे देशांतर्गत किंमतीत घट होण्याची शक्यता असेल तर आयातीवर मर्यादा घालण्यासाठी आयातशुल्क वाढविले जावू शकते. भारतासारख्या प्रतिकुल व्यवहारतोलाची समस्या असणाऱ्या देशांना याबाबत सुट मिळू शकते.

**अर्थसाह्य (Subsidy) :-**

विकसित देश आपल्या देशातील किंमती कमी ठेवण्यासाठी अर्थसाह्यांचा वापर करतात. शेतकऱ्यांना खते, वीज, कर्ज  यांचा पुरवठा कमी दराने केल्यास त्यांचा उत्पादनखर्च कमी होवून वस्तू कमी किंमतीना विकू शकतात. WTO करारानुसार विकसित देशांनी ही अर्थसाह्ये ६ वर्षात २० टक्के तर विकसनशील देशांनी १० वर्षात १३.३ टक्के या प्रमाणअत कमी करावयाची आहेत.

जी अर्थसाह्ये शेतकऱ्यांना थेट मदत म्हणून दिली जातात. अशी अर्थसाह्य देण्याची मुभा आहे. असे अर्थसाह्य निलपेटी आणि हरित पेटी (Blue Box and Green Box Subsidies) म्हणून  ओळखली जातात. ही अर्तसाह्ये पर्यावरण संरक्षण, शेतकऱ्यांची निवृत्ती संशोधन, प्रशिक्षण व विस्तार कार्यक्रमासाठी दिली जातात.

शेतीविषयक करार कठिण असताना विकसित देशांनी आपल्या सोयीची कलमे त्यात समाविष्ट केला आहेत. जागतिक व्यापार संघटनेच्या कराराची अंमलबजावणी विकसनशील देशांकडून होत आहे. मात्र विकासित देश कराराचे उल्लघण करणे, अमंलबजावणीत चालढकल करणे असे प्रकारे WTO च्या बाबतीत होत आहेत.

**जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय शेतीक्षेत्रावरील परिणाम (Impact of World Trade Organisation on Indian Agriculture) :-**

शेती विषयक करारमुळे शेतमालाचा वापर वाढवण्यासाठीची संधी विकसनशील देशांप्रमाणे भारतालाही आहे. मात्र त्यातून भारताला लाभ कितपत होवू शकतो हे अनिश्र्चित आहे. WTO ह्या कमी करावे ही अट विकसनशील देशांनीच पूर्ण केली. अमेरिकेने मात्र हरितपेटी आणि निलपेटी याद्वारे अर्थसाह्य अशी शेतकी मदत चालूच ठेवली म्हणजेच अर्थसाह्यविषयीच्या कराराची अंमलबजावणी टाळली.

विकसनशील राष्ट्रांच्या संबंधातील आणखी एक जाचक अट म्हणजे ह्या देशांना आधिच दुर्बल असलेली निर्यात मदत वाढवण्याची अनुमती नाही. त्यामुळे भारतीय शेती, शेतमाल निर्यात आणि भारतीय या सर्वावर प्रतिकूल परिणाम होत आहेत. देशातल्या अनेक राज्यात वाढती कर्जे अनुदान घट, निर्यात घट इत्यादीमुळे शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही अतीशय गंभीर बाब आहे. अर्थसाह्याशिवाय भारतात निर्यात करणे शक्य नाही. जेव्हा जेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्यातक्षम व्यापारीपिकांची उत्पादकता वाढेल. आधूनिक पध्दतीचा आणि मंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर शेती क्षेत्रात होइल. उच्च दर्जाची बि-बियाणे, खते, किटकनाशके यांचा पर्याप्त वापर आंतराष्ट्रीय किंमतीचा अंदाज घेऊन निर्यातमूल्य वाढवले तर भारतीय शेती-क्षेत्रातील निर्यातदार देश होवू शकेल.

अर्थ सहाय्याच्या बाबतीत भारतात एकूण अर्थसाह्य ऋण असल्याने त्याबाबतीतही परिस्थिती अनुकूल आहे. दशातर्गत उत्पादन घटण्याने अन्नधान्याच्या एकूणच आयातीत वाढ होताना दिसून येत आहे.

थोडक्यात भारतात शेतीक्षेत्र खुले केल्यामुळे निर्यातीस मोठा वाव मिळणार असला तरी त्यासाठी विशिष्ट निर्यातश्रम क्षेत्र तयार करावे लागेल. शेतकी उत्पादनात नियोजन करावे लागेल. परकीय शेतकी उत्पादनांच्या आकर्षनांचा विचार करणे आवश्यक ठरेल. उच्च उत्पन्न शेतकी उत्पादनांच्या आकर्षणाचा विचार करणे आवश्यक ठरेल. उच्च उत्पन्न गटातील लोकांच्या मनातील आयात वस्तू खरेदी करण्याच्या प्रवृत्तीमुळे देशी उत्पादकांना मोठ्या स्पर्धेला तोंड देणे कठिण होइल. जागतिक व्यापार संघटनेच्या स्वामीत्व कायदा TRIPS यातील तरतूदी शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या आहेत. त्यांच्या प्रगतीला खिळ घालणाऱ्या आहेत. कणूच जागतिक व्यापार संघटनेच्या तरतूदी आणि करार भारताच्या शेतीक्षेत्रावर प्रतिकूल परिणाम घडवून आणणारे आहेतच.

## १.७ प्रश्न

१) शेतीची उत्पादकना म्हणजे काय सांगून शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे स्पष्ट करा.

२) शेतीची उत्पादकांना वाढवण्यासाठीचे उपाय कोणते ते सांगा ?

३) कृषी उत्पादन आणि उत्पादकतेतील प्रवृत्ती स्पष्ट करा.

४) टिप लिहा - २००० चे नविन कृषी धोरण.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि अन्नधान्य सुरक्षा यावर टिप लिहा.

६) जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय शेतीक्षेत्रावरील परिणाम स्पष्ट करा.

७) टिप लिहा - जागतिक व्यापारसंघटना आणि भारतीय शेती.

❖❖❖❖

# १०

# उद्योग आणि सेवाक्षेत्र

**घटक रचना:**

१०.१ उद्दिष्ट्ये

१०.२ प्रस्तावना

१०.३ १९९१ पासूनचा औद्योगिक विकास : वृध्दी व फेरबदल

१०.४ मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा (MRTP Act) आणि स्पर्धा कायदा

१०.५ लघुउद्योगासाठी २००० चे सर्वसमावेशक धोरणात्मक पॅकेज आणि अलिकडील उपाययोजना

१०.६ सेवाक्षेत्र - १९९१ पासूनची वृध्दी आणि कामगिरी

१०.७ प्रश्न

## १०.१ उद्दिष्ट्ये

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत कृषीविकासाबरोबरच औद्योगिक विकासही तितकाच महत्वाचा आहे. औद्योगिक विकासामध्ये औद्योगिकीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. या पाठात आपण औद्योगिक क्षेत्राविषयी पूढील मुख्य उद्दिष्टांचा विचार करणार आहोत.

१) १९९१ पासूनचा औद्योगिक विकसाचा आढावा घेणे.

२) MRTP कायदा व स्पर्धा कायदा यांचा अभ्यास करणे.

३) लघुउद्योगासाठी २००० चे सर्वसमावेशक धोरण अभ्यासणे.

४) सेवाक्षेत्राचा विकास आणि कामगिरी समजावून घेणे.

## १०.२ प्रस्तावना

आज जगातील बहुतांश विकसित देशांचा विकास हा औद्योगिकीकरणातूनच झालेला आहे. जो पर्यंत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे प्राबल्या जास्त असतो, तो पर्यंत त्या देशाचा आर्थिक विकासाचा वेग मंद असतो. अशी अर्थव्यवस्था अविकसित मानली जाते. या अर्थाने विचार केल्यास स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारतीय अर्थव्यवस्था एक अविकसित अर्थव्यवस्था होती. स्वातंत्र्योत्तर काळात विशेषता नियोजनकाळात भारताच्या औद्योगिकीकरणात वाढ होत आहे. कृषिक्षेत्राचा वाटा कमी होऊन करखानदारी क्षेत्राचा वाटा वाढत आहे. भारताच्या जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाकडे एक महत्वपूर्ण घटक म्हणून पाहिले जाते. पंचवार्षिक योजनाकाळात जलद औद्योगिकीकरणावर भर दिला आहे. त्यातूनच आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होते.

## १०.३ १९९१ पासूनचा औद्योगिक विकास : वृध्दी व फेरबदल

जलद आणि संतुलित विकासासाठी भारतात १९५१ पासून पंचवार्षिक योजना राबवण्यात येत आहेत. परंचवार्षिक योजना काळातील औद्योगिक विकासाचा अभ्यास करणे महत्वाचे असल्याने आपण या पाठात १९९१ पासूनच्या पंचवार्षिक योजना काळातील औद्योगिक विकासातील प्रवृत्ती किंवा फेरबदल पाहणार आहोत.

### १. आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ - १९९७) :-

१९९१ पासून भारत आर्थिक सुधारणाचा कार्यक्रम राबवण्यात आला १९९१ मध्ये नविन औद्योगिक धोरण जाहीर झाले. आठव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक विकासाचा वृध्दीदर ७.४% निर्धारित करण्यात आला होता. या योजनेत योजना खर्चाचा वाटा २९.१४% (खाण उद्योग आणि विजनिर्मिती) होता. आठव्या योजना काळात औद्योगिक उत्पादन वृध्दीदर ७.४% इतका असला तरी प्रत्यक्षात वृध्दी ७.३ इतकी घडून आली. सरासरी वार्षिक वृध्दीदर ६.६८% राहिला. भांडवली वस्तू उत्पादन वृध्दी दर ८.७% गाठला गेला. परंतू ही वृध्दी १९९२ ते १९९४ मध्ये ऋणात्मक होती. १९९१ मधील रुपयांचे अवमूल्यन, अपूरा परकिय विनियमय साठा, चलनवाढ, मंदी. इत्यादी कारणांमुळे औद्योगिक उत्पादन वृध्दीदर गाठणे अशक्य झाले.

### २. नववी पंचवार्षिक योजना (१९९७-२००२) :-

आठव्या व नवव्या पंचवार्षिक योजनेतील औद्योगिक विकासावर आर्थिक सुधारणांचा प्रभाव पडला आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेतील धोरणांचा पाठपूरावा नवव्या योजनेतेही करण्यात आला आहे. या योजनते औद्योगिक उत्पादन वृध्दी दर ६.६% नोंदविला गेला असला तरी १९९८-९९ मध्ये औद्योगिक उत्पादन वृध्दीदर फक्त ४.१% इतकाच गाठता आला. घटता कृषी उत्पादकता दर, चलनवाढ, घटती निर्यात, घटनी देशांतर्ग गुंतवणूकपातळी अशी अनेक कारणे औद्योगिक उत्पादन वृध्दी घटवण्यास कारणीभूत होती.

### ३. दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) :-

दहाव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक वृध्दीदर (वार्षिक) १०% गाठण्याचे ध्येय होते. परंतू औद्योगिक उत्पादन वृध्दीदर (८.२% गाठणे शक्य आले. औद्योगिक वृध्दीवर २००२-२००३ मध्ये ५.७% होता, तो २००४-०५ मध्ये ८.४% इतका वाढला तर २००६-०७ मध्ये ११% नी वाढला. यामध्ये कारखाणदारी क्षेत्राचे व भांडवली क्षेत्राचे योगदान सर्वांत जास्त होते.

### ४. अकरावी पंवचार्षिक योजना (२००७-१२) :-

अकराव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक उत्पादन वृध्दीदर सरासरी वार्षिक १०% एवढे होते. परंतू प्रत्यक्षात हा दर ६.९% इतकाच गाठणे शक्य आले. २०१०-११ मध्ये औद्योगिक उत्पादनदर ८.२% इतका होता. या वर्षात कारखाणदारी क्षेत्र, भांडवली वस्तुक्षेत्र, ग्राहक वस्तुक्षेत्र, विजनिर्मिती क्षेत्र या सर्वच क्षेत्रातील उद्योगाच्या कामगिरीत

सुधारणा घडून आलेली होती. तथापी या काळात औद्योगिक उत्पादन वृध्दीदर घटण्याची पूढील कारणे सांगता येतील.

१. २००६-२००८ मधील कच्चा तेलाच्या किंमतीतील वाढीमुळे कच्चा मालाच्या किंमतीत झालेली वाढ.

२. अमेरिकेतील जागतिक वित्तीय आरिष्ट्य आणि त्यामुळे भारताच्या निर्यातीत होणारी घट.

३. घटती देशांतर्गत मागणी.

४. वाढते व्याजदर इत्यादी.

**औद्योगिक फेरबदल किंवा औद्योगिक रचनेतील बदल (Industrial Diversification):-**

दूसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून जलद औद्योगिकीकरणाची व्युहरचना बदलत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील वाढीव गुंतवणूकीमूळे पायाभुत सुविधा, मुलभूत आणि भांडवली वस्तूंचे उद्योग वाढीस लागले आहे. १९९१ पासूनच्या औद्योगिक रचनेतील बदल पूढीलप्रमाणे सांगता येतील.

१. मध्यम वस्तू व ग्राहकोपयोगी वस्तूंकडे विकासाचा कल वाढलेला दिसून येतो. मुलभुत व भांडवली वस्तू उत्पादन बदल घडून आलेले आहेत. मुलभूत धातू, व मिश्र धातू तसेच भांडवली करुन यांचा औद्योगिक निर्देशाकांतील भार घटला आहे.

२. मध्यम वस्तू उद्योगामध्ये रसायने व रासायनिक उत्पादने, रबर, प्लास्टीक, पेट्रोलियम व कोळसा क्षेत्राचे महत्व वाढले.

३. अर्थव्यवस्था खूली झाल्यामुळे टिकावू ग्राहकोपयोगी वस्तूंचे औद्योगिक उत्पादनातील महत्व वाढले.

४. १९९१ च्या नविन औद्योगिक धोरणात खाजगीकरण, शिथीलीकरण आणि उदारीकरण यामुळे सार्वजनिक क्षेत्राचे महत्व घटले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे महत्व (संख्या) घटले आणि निर्गुंतवणूक (Dis-investment) धोरणास चालना मिळाली.

५. एकत्रीकरणामूळे मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या बचती, भांडवल बाजाराशी जवळीक, नविन तंत्रज्ञानाचा वापर, नियति बाजारपेठ, इत्यादीलाभप्रवृत्तीस चालना मिळाली.

६. १९९१ च्या नविन औद्योगिक धोरणानंतर संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत कारखाणदारीक्षेत्राचे महत्व वाढले.

थोडक्यात १९९० च्या दशकात औद्योगिक विकास व औद्योगिक परिवर्तन घडून आले. राष्ट्रीय उत्पन्नातील औद्योगिक क्षेत्राचे योगदान २७% नी (दहावी पंचवार्षिक योजना) वाढेल. थोडक्यात औद्योगिक क्षेत्रातील बदल विशेषतः कारखाणदारीक्षेत्राचा विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीस चालक ठरला आहे.

## १०.४ मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा (MRTP Act) आणि स्पर्धा कायदा (MRTP Act & Competition Act 2006)

उत्पादनसंस्थामध्ये असणारी स्पर्धा ही जास्तीत जास्त ग्राहकांना आकर्षित करणारी एक प्रक्रिया आहे. तसेच विक्री उत्पन्न आणि नफा वाढवण्यास उत्पादन संस्थेतील स्पर्धा, मदत करु शकते. भारत सरकारने वेळोवेळी जलद औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने औद्योगिक धोरणात बदल केले. भारताच्या संविधानाच्या कलम ३८ आणि कलम ३९ नूसार भारत सरकारने देशाच्या उत्पन्न आणि संपत्तीची योग्य वाटप किंवा विभाजन व्हावे या हेतूने अनेक समितीची स्थापना केली. उदा. १९६८ मधील मक्तेदारी चौकशी समिती तर नियोजन मंडळाने हजारी समितीचा स्थापना औद्योगिक परवाणा पध्दती प्रक्रिया यासाठी केली. १९६७ मध्ये औद्योगिक परवाणा धोरण चोकसी समीतीची स्थापना करण्यात आली. या समितीने मक्तेदारी आणि नियंत्रित व्यापार कायदा करावा असे सुचविले आणि या शिफारशीनूसार कायद्यामध्ये वेळोवेळी बदल करुन १९६९ मध्ये हा कायदा पास करण्यात आला.

### १. मक्तेदारी आणि नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा - १९६९ (Monopoly & Restrictive Trade Practices Act 1969)

ठराविक औद्योगिक घराण्याची मक्तेदारी रोखण्यासाठी आणि संपत्तीचे केंद्रीकरण रोखण्यासाठी १९६९ मध्ये मक्तेदारी आणि नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा करण्यात आला. २०१ कायदयाद्वारे उद्योगाच्या आधूनिकीकरण आणि विस्तारीकरण मार्गात येणाऱ्या अडचनी दूर करण्यात आल्या. मोठ्या प्रमाणावरील उच्चादनाचे फायदे मिळवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील स्पर्धेचा लाभ उचलण्यासाठी विस्तारीकरण, विलिनीकरण, समायोजन इत्यादीसाठी आता केंद्रसरकारच्या परवानगीची गरज नाही. नवीन कायद्यानूसार भांडवलाच्या गुंतवणूकीच्या आधारे एखाद्या उद्योगसंस्थेस मक्तेदारी ठरवण्यात येणार नसून मक्तेदारी पर्यादा एकुण उत्पादनातील वाटयावरुन (किमान २५%) निश्चित केली जाणार आहे.

मक्तेदारी नियंत्रणात्मक कायद्याने आता फक्त मक्तेदारीचे नियंत्रण करावे प्रतिबंधात्मक आणि अवैध्य व्यापार कारणाऱ्यांवर मर्यादा आणण्यासाठी या कायद्याच्या कक्षा वाढवल्यावर भर देण्यात आला. या कायद्याची उद्दिष्ट्ये पूढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती.

१. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळणे.

२. मक्तेदारी नियंत्रित करणे.

३. मक्तेदारीमुक्त व्यापार व्यवहार नियंत्रित करणे.

४. नियंत्रित व्यापार व्यवहार टाळणे.

५. अयोग्य व्यापार व्यवहार टाळणे (१९८४ पासून)

**या कायद्याची काही ठळक वैशिष्ट्ये पूढीलप्रमाणे सांगता येतील.**

१. मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार मंडळ (ऑगस्ट १९७०)

२. MRTP अंतर्गत उपक्रम :- १) राष्ट्रीय मक्तेदारी.
२) उत्पादन मक्तेदारी.

३. व्यापार व्यवहार - या अंतर्गत पूढील व्यावसायिक व्यवहारांचा सद्रावेश होता.

१) नियंत्रित व्यापार व्यवहार.

२) मक्तेदारी व्यापार व्यवहार.

३) गैर व्यापार व्यवहार.

४. करार - उत्पादन विस्तार, नविन उपक्रमांची स्थापना आणि विलिनीकरण.

५. १९९१ पूर्वी या कायद्यात केलेले बदल (FERA ची स्थापना. परकीय चलनाची हेराफेरी होवू नये म्हणून १९७३ मध्ये परकीय चलन नियंत्रण कायदा (Foreign Exchange Regulation Act FERA - 1973) करण्यात आला.

६. १९९१ नंतर या काद्यात झालेले बदल. (१९९१ चे नविन औद्योगिक धोरण, भारतीय उद्योगांचा विस्तार, विलिनीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, निर्गुंतवणूक धोरण इत्यादी.

## २. स्पर्धा कायदा (Competition Act 2002):-

१९९१ मधील आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला आणि मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा सुधारणा केल्यानंतर असे वाटले की MRTP कायद्यामुळे उपयुक्त असे नविन उदारीकरण वातावरण हरवले आणि म्हणूनच १९९१ च्या आर्थिक सुधारणा कायक्रमाचे लक्ष्य मक्तेदारी कायदा नसून स्पर्धात्मकतेला उत्तेजन देणे हे आहे आणि हा दृष्टीकोण समोर ठेवून सरकारने राघवन समितीची स्थापना केली. MRTP Act च्या जागी नवीन स्पर्धा कायदा २००१ मध्ये पास झाला व त्याची प्रत्यक्ष कार्यवाही डिसेंबर २००२ मध्ये सुरु झाली. म्हणूनच या कायद्याला स्पर्धा कायदा-२००२ (Competition Act 2002) असे संबोधले जाते.

### या कायद्याची मुलभूत उद्दिष्टे पूढीलप्रमाणे निर्धारित केली आहेत.

१. स्पर्धाविरोधी प्रतिबंधात्मक करार.

२. प्रबळसत्ता गैरवापर प्रतिबंधात्मक करार.

३. एकीकरणाचे नियंत्रण (Regulation of Combination)

४. स्पर्धा समर्थन किंवा पुरस्कार (Competition Advocacy)

### स्पर्धा कायद्याची काही प्रमूख वैशिष्ट्ये पूढीलप्रमाने सांगता येतील.

१. भारताचे स्पर्धा मंडळ (Competition Commission of India - CCI) - स्पर्धेतील दुष्परिणाम टाळण्यासाठी मंडळाची स्थापना)

२. स्पर्धा विरोधी प्रतिबंधात्मक करार (Prohibition of anti - competitive agreements) - कोणतीही उत्पादनसंस्था, उद्योजकसंघटना, उत्पादन, पुरवठा, विभाजन संपादन याबाबतीत करार करु शकत नाही.

३. प्रबळयला गैरवापर प्रतिबंधात्मक कायदा (Prohibition of Abuse of Dominant Postion) - कोणतीही प्रबळ उत्पादनसंस्था शक्तीचा गैरवापर करु शकत नाही. स्पर्धा ही ग्राहकांच्या उत्पादन आवडी-निवडीनूसार होत असते.

४. एकीकरणाचे नियंत्रण (Regulation of Combination) - एक किंवा अनेक उत्पादनसंस्था एका उद्योगातून दूसऱ्या उद्योगात विलिन किंवा संपदित करणे यावरील नियंक्षणसंबंधीचा करार. हा करार सक्तीचा नसून ऐच्छिक आहे.

५. स्पर्धा समर्थन (Competition Advocacy) - बाजारात स्पर्धात्मक संस्कृती निर्मान करणे म्हणजे स्पर्धा समर्थन किंवा स्पर्धा पुरस्कार होय. स्पर्धा निधीतून स्पर्धा समर्थन कायद्याची निर्मिती आली आहे. स्पर्धेला प्रोत्साहन देणे आणि स्पर्धेविषयी जागृती निर्माण करणे हे औद्योगिकीकरणासाठी आवश्यक आहे.

अशा पध्दतीने भारत सरकारने जलद औद्यगिक विकासासाठी औद्योगिक धोरणात वेळोवेळी बदल केलेले दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा.**

१. १९९१ पासूनचा औद्योगिक विकास कसा आहे ?
२. १९९१ पासून औद्योगिक रचनेत कसा बदल घडून आला आहे ?
३. टिप लिहा - १) मक्तेदारी कायदा १९६१.
२) स्पर्धा कायदा २००२.

## १०.५ लघुउद्योगासाठी २००० चे सर्वसमावेशक धोरणात्मक पॅकेज आणि अलिकडील उपाययोजना

भारताच्या औद्योगिक व आर्थिक विकासात लघुउद्योग क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्राबरोबर लघुउद्योगक्षेत्राकडून बहुसंख्य लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. उद्योगांचे विविधीकरणा व विकेंद्रीकरण तसेच श्रमिकांची सहज उपलब्धता यामुळे भारतात लघु उद्योग क्षेत्राला अनंन्य साधारण असे महत्त्व आहे.

लघुउद्योगाची व्याख्या करताना रोजगार निकष व गुंतवणुक निकष यांचा विचार करण्यात आला आहे.

१. रोजगार निकषानुसार ज्या उद्योगात १० ते ५० कामगार व विजेचा वापर केला जातो किंवा १०० कामगार व विजेचा वापर केला जातो किंवा १०० कामगार व विजेचा वापर केला जात नाही तसेच मुख्यत्वेकरुन असे उद्योग शहरी भागात स्थापले जातात अशा उद्योगांना लघुउद्योग असे म्हटले जाते.

२. गुंतवणूक निकषानुसार भांडवल गुंतवणूकीच्या मर्यादानुसार लघुउद्योगाची व्याख्या करता येते. १९९१ च्या धोरणानुसार लघुउद्योगासाठी गुंतवणूक मर्यादा ६० लाख

रुपये इतकी ठेवण्यात आली होती. तर साहाय्यभूत घटकांसाठी ७५ लाख रुपये इतकी होती. भारतीय अर्थव्यवस्थेतील लघुउद्योगश्रेत्राची भुमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. लघुउद्योगक्षेत्राला विकासामुळे औद्योगिक उत्पादनात वाढ झाली आहे. एकूण औद्योगिक उत्पादनाच्या ४० टक्के उत्पादन लघुउद्योगाकडून घेतले जाते.

२. भारतात विशेषतः लघुउद्योगक्षेत्रामध्ये श्रमप्रधान उत्पादनंतत्राचा वापर होत असल्यामुळे रोजगारनिर्मितीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. म्हणजेच भारताचे लघुउद्योगक्षेत्र रोजगार निर्माण क्षेत्र आहे.

३. निर्यात वाढ घडून लघुउद्योक्षेत्राने देशाला परकीय चलन मिळवुन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २००२-०३ मध्ये ८६.०१३ कोटी रुपये इतके मिळाले पारपारिक, अपांरपारिक अन्नप्रक्रिया उद्योगातील निर्गतीमुळे भारतात परकीय चलन मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे.

४. लघुउद्योग क्षेत्र विकेंद्रीकरणास सहाय्यक आणि औद्योगिक स्थाननिश्चितीस प्रोत्साहन देते.

५. लघुउद्योगक्षेत्र मोठ्या उद्योगास कच्चा मालाच पुरवठा करते तसेच बचतीतुन भांडवलनिर्मितीस प्रोत्साहन देते. म्हणजच मोठ्या उद्योगांना सहय्यकारी ठरते.

६. शेतीक्षेत्रातील बेकारी, विषमता कमी करण्याचे प्रयत्न लघुउद्योगक्षेत्राकडून होत असतात. त्याचप्रमाणे शेतीक्षेत्रावरील अतिरिक्त भार लघुउद्योगक्षेत्र कमी करण्याचा प्रयत्न करते.

७. लघुउद्योगक्षेत्रात अतिरिक्त कौशल्याची गरज नसते. त्यामुळे समाजातील उत्पन्नविषमता, बेकारी दूर करुन समान प्रादेशिक विकासाचे ध्येय लघुउद्योगक्षेत्राकडुन गाठता येते.

वरिल सर्व योगदानाशिवाय लघुउद्योग क्षेत्र कमी आयातीस तसेच हरितक्रांतीस प्रोत्साहन देते. ग्राहकांचे हितरक्षण राखण्याचा प्रयत्नही लघुउद्योगक्षेत्राकडून केला जातो. म्हणूनच भारताच्या अर्थव्यवस्थेत लघुउद्योगक्षेत्र महत्वाचे आहे.

**भारत सरकारचे लघुउद्योगविषयक धोरण.**

भारतातील लघुउद्योक्षेत्रासमोरील समस्या दूर करण्याच्या उद्देसाने सरकारने ज्या विविध उपाययोजना केल्या त्या पुढीलप्रमाणे.

**१) पंचवार्षिक योजनाः-**

भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून लघुउद्योगक्षेत्राच्या विकासाकडे खास लक्ष दिले. ग्रामिण तंत्रज्ञान विकास, एक खिडकी योजना, जिल्हा लघुउद्योग केंदाची स्थापना लघुउद्योग क्षेत्राला कर्जपुरवठा कच्चा माल विपणन प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविण्यासाठी सरकारने विविध पंचवार्षिक योजनेद्वारे प्रयत्न केले. तसेच लघुउद्योगक्षेत्राला सर्वकष विकासासाठी १९८९ मध्ये लघुउद्योग विकास बँकेची (SIDBI) स्थापना करण्यात आली.

**२) वित्तीय साहाय्यः-**

राज्य वित्तीय महामंडळे, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ व्यपारी बँका, लघुउद्योग विकास बँक, नाबार्ड NABARD यांच्यामार्फत भांडवलाची सुविधा पुरविण्यात येते.

**३) करसवलतीः-**

लघुउद्योगक्षेत्रावरील कराचा अतिरिक्त भार कमी करण्यासाठी करसवलत योजना सरकारने सुरु केली. ज्या उत्पादकांची उलाढाल ३०० लाख रुपये इतकी आहे. अशा उत्पादनावर करसवलत तसेच ग्रामीण भागातील लघु उद्योगाच्या नफ्यावरही करसवलत देण्यात आली आहे.

**४) आरक्षित किंवा राखीव वस्तूंसाठी सवलतः-**

भारत सरकारने लघुउद्योगक्षेत्रातील ८०० वस्तू उद्योगसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे लघुउद्योगातील उत्पादनाचे विविधीकरण करण्यास उद्योजकांना स्वातत्र्य मिळाले आहे.

**५) १९९१ चे नवे लघुउद्योग धोरणः-**

१९९१ च्या नविन औद्योगिक धोरणात लघु उद्योगासाठी एक स्वतंत्र धोरण आखण्यात आले. लघुउद्योगापुढील समस्या दुर करण्याच्या हेतूने अनेक उपाय सरकारने योजले जसे. लघुउद्योगांना उद्योगाविषयी सर्व सुविधा पुरविणे व त्याच्या उत्पादनाचा दर्जा उंचविण्यासाठी प्रयत्न करणे, कच्चा माल, पॅकींग एक खिडकी योजना, भांडवल गुंतवणूक मर्यादा, आजारी उद्योगांचे पूर्ववसन या सर्व सुविधांच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

थोडक्यात लघुउद्यगांना उत्तेजन व प्रोत्साहन देण्यासाठी काळानुरुप भारत सरकारने आपल्या धोरणात सकारात्मक बदल घडवून लघुउद्योगक्षेत्राचा विकास साध्य केला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. लघुउद्योगाची व्याख्या सांगा.
२. १९९१ चे नवे लघुउद्योग धोरण काय आहे ?

________________________________

________________________________

________________________________

________________________________

________________________________

## लघु उद्योगांसाठी धोरणात्मक पॅकेज - २००० (Policies Package for Small - Scale Industries 2000)

मा. पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी लघु उद्योग आणि अति लघु उद्योगासाठी एक व्यापक धोरणात्मक पॅकेज ३० ऑगस्ट २००० मध्ये जाहीर केले. या धोरणाचे विवरण पुढील प्रमाणे.

१) लघु उद्योगांची स्पर्धाक्षमता वाढवण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी उत्पादन शुल्क मर्यादा (सुट) ५० लाख रुपायांवरुन एक कोटी रुपये करणे.

२) तांत्रिक विकास करण्यासाठी काही विशेष उद्योगांमध्ये भांडवल संबधित अनुदान दिलेल्या कर्जाच्या १२% पर्यंत उपलब्ध करुन देणे.

३) लघु उद्योग मंत्रालयाकडून १२ वर्षाच्या अंतरानंतर लघु उद्योगांची तिसरी गणना करणे या गणनेत औद्योगिक आजारपण व त्यांच्या कारणांचा अभ्यास करणे.

४) लघ उद्योगांशी संबंधित सेवा आणि व्यवसायात भाडंवल गुंतवणूक मर्यादा ५ लाखावरुन १०लाख पर्यंत वाढविणे.

५) ५० ९००० प्रमाण पत्र मिळविण्यासाठी १० व्या योजनेच्या शेवट पर्यंत प्रत्येक लघु उद्योगाला ७५,००० रुपये देण्याची वर्तमान योजना चालू ठेवण्यात येईल.

६) एकत्रित कर्जाची मर्यादा (Composite Loans) १० लाखावरुन २५ लाख करणे.

७) लघु उद्योगांची पाहणी त्याबाबत सूचना आणि शिफारशी करण्यासाठी मंत्री परिषद सचिव अंतर्गत समिती गठीत करणे.

८) लघु उद्योग परिक्षणासाठी प्रयोग शाळांचा विकास आणि संचालनासाठी खर्चाच्या ५०% पर्यंत अनुदान देण्यात येईल.

९) आधारभूत सुविधा निर्माण करणे ग्रामीण भागात लघुउद्योगांसाठी ६०% आरक्षण आणि ५०% भूखंड अति लघुक्षेत्रासाठी निर्धारित करणे.

१०) प्रधान मंत्री रोजगार योजने अंतर्गत अति लघु उद्योग स्थापन करण्यासाठी कुटुंब वार्षिक उत्पन्न मर्यादा २५,००० रुपयांवरुन ४०,००० रुपये करण्यात आली.

**आपली प्रगती तपासा:**

१) लघुउद्योगाविषयीचे २००० चे सर्वसमावेशक धोरण काय आहे?

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## १०.६ सेवाक्षेत्र - १९९१ पासूनची वृध्दी आणि कामगिरी

भारताच्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. पुढील मुद्यांच्या आधारे आपल्या भारताच्या आर्थिक वृध्दीत सेवाक्षेत्राचे योगदान अभ्यासणार आहोत.

### १. आर्थिकवृध्दीचा प्रेरक:-

भारताच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती, उद्योग व व्यापार आणि सेवाक्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात क्षेत्रनिहाय आर्थिक वृध्दीचा कल

बदलत आहे. १९५०-५१ मध्ये शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ५७ टक्के इतका होता तो २००९-२०१० मध्ये १६.९ टक्के इतका खाली आला आहे. तर सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा १९५०-५१ मध्ये १९.५ टक्के होता. तो २००९-२०१० मध्ये ५७.३ टक्के इतका वाढला आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीक्षेत्राकडून सेवाक्षेत्राच्या दिशेने प्रगती करीत आहे. थोडक्यात भारताला आर्थिक वृध्दीत सेवाक्षेत्राचे योगदान सर्वात जास्त आहे.

### २. स्थुल देशांतर्गत उत्पादनवाढीतील योगदान:-

सेवाक्षेत्रात व्यापार हॉटेल्स, वाहतूक दळणवळणसाधने, बँकींग आणि वित्तीय क्षेत्र, वास्तव मालमत्ता, व्यावसायिक सेवा इत्यादी उपसेवाक्षेत्रांचा समावेश होतो. २०११ मध्ये बँकींग विमा व्यावसायिक सेवा, व्यापार हॉटेल्स इत्यादी सेवाक्षेत्रांच्या वृध्दीमुळे स्थुल देशांतर्गत उत्पादनात ३३ टक्के ते ३४ टक्के नी वाढ झाली आहे.

### ३. रोजगारवृध्दी:-

अलिकडच्या काळात शेती व उद्योगक्षेत्रातील रोजगार वाढीचे प्रमाण जास्त आहे. सेवाक्षेत्राकडून १९९१ मध्ये ५८.६ लक्ष लोकांना रोजगार प्राप्त झाला होता. तो २००१ मध्ये ७८ लक्ष लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. केरळमध्ये सेवाक्षेत्राकडून रोजगारवृध्दी जास्त प्रमाणात झाली आहे. तसेच असंघटीत क्षेत्रापेक्षा संघटीत क्षेत्रात रोजगारनिर्माती जास्त प्रमाणात आहे.

### ४. निर्यातीतील योगदान:-

सेवाक्षेत्राच्या वृध्दीमुळे भारतात निर्यातीचे उत्पन्न वाढलेले दिसून येते. जगातील सेवाक्षेत्रातील उच्च निर्यात दरांपैकी भारताचा संगणक माहिती तंत्रज्ञान, व्यापारी सेवा, दळणवळण सेवा इतर व्यावसायिक सेवा इत्यादी सेवा निर्यात करण्यासाठी क्रमांक लागतो. १०११ मध्ये सेवाक्षेत्राकडून १३२.९ कोटी डॉलर्सची निर्यात केली होती.

### ५. सेवाक्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक (FDI):-

सेवाक्षेत्रातील वाढीमध्ये थेट विदेशी गुंतवणूकीची भूमिका महत्त्वाची आहे. वित्तीयक्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, ज्ञानकक्ष व यंत्र कक्ष (Software Hardware) दळणवळण संपर्क साधने आणि गृह व वास्तव मालमत्ता या सेवाक्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक ४१.९ टक्के वाढत आहे. तसेच इस्पितळे, किरकोळ व्यापार, शिक्षण, सल्लागार, उपहार गृह इत्यादी क्षेत्रातही थेट विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे.

### ६. ज्ञानधिष्ठीत अर्थव्यवस्था:-

सरकारचा उदारीकरण धोरणामुळे भारताच्या सेवाक्षेत्रात अनेक बदल घडून आले आहेत, परिणामी भारतीय अर्थव्यवस्था शेतीक्षेत्राकडून ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्थेकडे (Knowledge Based Economy) संकुचित होत आहे. देशाच्या आर्थिक वृध्दी आणि विकासासाठी ज्ञानाधिष्ठीत, अर्थव्यवस्था आवश्यक आहे. आज भारताच्या सेवाक्षेत्रात माहिती तंत्रज्ञान क्षेत्र (Information Technology Sector) जलद गतिने विकसित होत आहे. या विकसित माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामुळे शेती व उद्योग या क्षेत्राचाही विकास होत आहे. भारतातील ज्ञानकक्ष कंपन्यांना (Software technology Companies) आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणपत्र बहाल झाले.

### ७. आरोग्य आणि शिक्षण:-

भारताच्या अर्थव्यवस्थेतील शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन महत्त्वाच्या सेवा आहेत. देशाच्या एकूण प्रगतीत शिक्षण आणि आरोग्य सेवांची आव्हानात्मक भूमिका आहे. शिक्षण आणि आरोग्य यामुळे देशाची अतिरिक्त लोकसंख्या नियंत्रित होवू शकते तसेच इष्टतम लोकसंख्या निर्माण करण्यास उपयोगी पडते. देशातील निरक्षरता नियंत्रित करण्यास शिक्षण सेवा महत्त्वाची भूमिका बजावतात.

### ८. प्राथमिक व द्वितीयक्षेत्राला आधार:-

सेवा क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासासाठी आणि आर्थिक वृध्दीसाठी प्राथमिक क्षेत्र (शेती) आणि द्वितीय क्षेत्र (उद्योग) यांना कार्यक्षमपणे सहय्य करते. सेवाक्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्र नविन उत्पादन पध्दतीची माहिती पुरविणे, नवनविन ज्ञान कक्ष बनविणे, सल्ला किंवा मार्गदर्शन करणे इत्यादी सारख्या सेवा शेती व उद्योगक्षेत्राला पुरवून आर्थिक विकास जलद गतीने घडून येण्यास मदत करणे.

सेवाक्षेत्राचे वरील सर्व क्षेत्रात महत्त्वाचे योगदान याशिवाय जनसंपर्क माध्येमे आणि मनोरंजन, खेळ, प्रवास व पर्यटन क्षेत्र, किरकोळ किंवा घाऊक बाजारपेठा, उद्योजकीय कौशल्या इत्यादी महत्त्वाच्या क्षेत्रात ही मोलाचे योगदान आहे. भारतात आज दळणवळण किंवा जनसंपर्क साधने आली. माध्यमे, बँकीग, याबरोबरच प्रवास आणि पर्यटनक्षेत्राचीही भरभराट होत आहेत. म्हणन सेवाक्षेत्राचा रष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा सर्वाधिक आहे. थोडक्यात आज भारतीय अर्थव्यवस्था शेतीक्षेत्राकडून सेवा क्षेत्राकडे संक्रमित होताना दिसून येते आहे.

---

## १०.७ प्रश्न

---

१. १९९१ पासूनच्या औद्योगिक विकासातील वृध्दी व फेरबदल स्पष्ट करा.

२. टिप लिहा - १. मक्तेदारी व नियंत्रित व्यापार व्यवहार कायदा (MRTP Act).
   २. स्पर्धा कायदा (Competition Act).

३. लघुउद्योग विकासासाठी सरकारचे सर्वसमावेशक धोरण स्पष्ट करुन अलिकडील उपाययोजना सुचवा.

४. २००० चे लघुउद्योग विकासासाठीचे सर्वसमावेशक धोरणात्मक पॅकेज यावर थोडक्यात टिप लिहा.

५. १९९१ पासूनची सेवाक्षेत्रातील वृध्दी व कामगिरीचे विश्लेषण करा.

❖❖❖❖

# ११

# प्रकरण - ६
# १९९१ पासूनचे बँकीग आणि मौद्रिक धोरण

**घटक रचना:**

११.१ उद्दिष्ट्ये
११.२ प्रस्तावना
११.३ १९९१ पासूनच्या बँकीग क्षेत्रातील सुधारणा
११.४ भारतातील बँकीगची रचना
११.५ व्यापारी बँकाची कामगिरी
११.६ प्रश्न

## ११.१ उद्दिष्ट्ये

भारतातील बँकीगक्षेत्रातील सुधारणांचा मुख्य हेतु म्हणजे जागतिक पातळीवर भारतीय बँकींग क्षेत्र स्पर्धेस सज्ज करणे. आपण या पाठात बँकीगक्षेत्रातील सुधारणा, भारतातील व्यापारी बँकाची प्रगती इत्यादी घटकांचा सविस्तरपणे अभ्यास करणार आहोत. या पाठाची ठळक उद्दिष्ट्ये पूढीलप्रमाणे सांगता येतील.

१. १९९१ नंतरच्या बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा आढावा घेणे.
२. भारतीय बँकीग पध्दतीची रचना अभ्यासणे.
३. भारतातील व्यापारी बँकाची कामगिरी अभ्यासणे.

## ११.२ प्रस्तावना

वित्तीय संस्था ह्या व्यवसायिक संघटना असून या संस्था ठेवीच्या रुपाने पैसा किंवा बचती गोळा करतात आणि हा पैसा उद्योग व्यापाराला कर्जरुपाने देतात. वित्तीय मध्यस्ती हे कर्ज घेणे-देणे या प्रक्रियेचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. वित्तीय व्यवस्थेमुळे पैशाची देण्याघेण्याची यंत्रणा अधिक कार्यक्षम होते. भारतातील वित्तीय प्रणाली व निधी सरंचना कशी आहे, भारतातील व्यापारी बँकाचे राष्ट्रीयकरण, बँकीग क्षेत्रातील सुधारणा (नरसिंहम समिती अहवालातच १९९१ आणि १९९८) इत्यादी महत्त्वपूर्ण वित्तीय घडामोडीचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केला आहे.

## ११.३ १९९१ पासूनच्या बँकीग क्षेत्रातील सुधारणा (Banking Sector Reforms since 1991)

राष्ट्रीयीकरण हा भारतीय बँकाच्या विकासातील एक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण टप्पा आहे. भारतातील बँकीग व्यवस्थेचा विकास व्हावा या दृष्टीने राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकीगक्षेत्रातील सुधारणा यामध्ये प्रमुख दोन भिन्न टप्पे आहेत. पहिला टप्पा म्हणजे १९९१ च्या नरसिंहम समितीच्या अहवाल आणि दुसरा टप्पा म्हणजे १९९८ च्या नरसिंहम समितीच्या शिफारशी अर्थात बँकीग क्षेत्रातील स्थैर्य आणि कार्यक्षमता (Stability and Effliciency) सुधारण्याचा दृष्टीने नरसिंहम समिती अहवाल १९९१ आणि १९९८ महत्त्वपूर्ण आणि आवश्यक आहे.

अ) १९९१ चा नरसिंहम समिती अहवाल - बँकीग क्षेत्रातील सुधारणाचा पहिला टप्पाः

भारतीय बँकीगक्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्यासाठी पुढील काही मुद्द्यांवर नरसिंहम समितीने शिफारशी सादर केल्या.

१) बँकाची उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवणे.
२) व्याजावरील नियंत्रणे दूर करणे.
३) भांडवलाची पर्याप्ता वाढवणे.
४) बँकीग व्यवस्थेचे सक्षमीकरण करणे.
५) भांडवलबाजारांचे शिथीलिकरण.
६) नवीन वित्तीय संस्थावर नियंत्रण ठेवणे.

वरिल समितीतील शिफारशींचा सरकारने काही अंशी स्विकार केला. या शिफारशीनुसार सरकारने ज्या काही सुधारणा केल्या त्या पुढीलप्रमाणे.

### १) रोखीव निधी आणि वैद्यानिक रोखता निधीच्या प्रमाणात बदल.

१९९१ मध्ये वैधानिक रोखता निधीचे प्रमाण ३८.५ टक्के होते ते १९९७ मध्ये २५ टक्के इतके कमी करण्यात आले. त्याचप्रमाणे रोखे राखीव विधीचे प्रमाण १५ टक्के वरुन ५ टक्के पर्यंत कमी करण्यात आले. त्यामुळे बँकाकडे अतिरिक्त निधी उपलब्ध झाला, साहजीकच त्यामुळे व्यापारी बँकाची रोखता व लाभता वाढली.

### २) स्पर्धात्मकताः

बँकींग क्षेत्रात कर्जपुरवठा करणे, ठेवी गोळा करणे या बाबत स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी खाजगी व्यापारी बँकाना सार्वजनिक क्षेत्रातील बँका बरोबर स्पर्धा करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच व्याजावरील नियंत्रणेही सरकारने दूर केली.

### ३) भांडवली आणि मजबूतीकरणः

व्यापार बँकानी आपल्या भांडवलाचा आर्थिक पाया मजबूत करावा यासाठी आपल्या किमान आवश्यक भांडवलप्रमाण निधीत वाढ करण्यासाठी खुल्या बाजारात भाग भांडवलाची विक्री करुन निधी उभारण्याची परवानगी देण्यात आली.

### ४) प्रधान्य क्षेत्राला होणारा कर्जपुरवठा:

सरकार व मध्यवर्ती बँकेकडून होणाऱ्या आदेशात्मक कर्जपुरवठ्यामुळे अनेक व्यापारी बँकांच्या उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीत NPA वाढ होते. तसेच त्यांचे नफ्याचे प्रमाणही कमी होते. म्हणून आदेशात्मक कर्जपूरवठा हे धोरण बदलून प्राधान्य क्षेत्राच्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण ४० टक्के वरुन टप्प्याटप्प्याने १० टक्के पर्यंत कमी करण्यात आले. तसेच त्यासाठी लवचिक व्याजदर धोरणही स्विकारण्यात आले.

### ५) दुर्बल बँकाची पुनबांधणी आणि पुनजीवन:

ज्या व्यापारी बँका तोट्यात आहेत आणि त्यांची उत्पन्न देण्यात जिंदगी २४.७ टक्के पेक्षा अधिक आहे. अशा बँकाची १९९४ मध्ये पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा बँकासाठी जिंदगी पुर्नरचना निधीची स्थापना करण्यात आली. तसेच त्यांान अंदाजपत्रकातून मदत निधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला.

### ६) व्यापारी बँकांवर पर्यवेक्षण करणारे मंडळ:

व्यापारी बँकाची प्रगती आणि त्यांनी पुरविलेल्या सुविधा (इंटनेटबँकीग, इलेक्ट्रानिक बँकिंग सेवा) यावर पुर्णपणे नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यवेक्षक मंडळाची स्थापना करण्यात नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यवेक्षक मंडळाची स्थापना करण्यात आली.

वरिल सुधारणांशिवाय व्याजावरील नियंत्रण, न वसूल होणारी कर्जे उत्पन्न न देणारी जिंदगी (NPA) इत्यादीमध्ये आमुलाग्र सुधारणा घडून आल्या.

## ब) १९९८ चा नरसिंहम समिती अहवाल - बँकीग क्षेत्रातील सुधारणांचा दुसरा टप्पा:

१९९१ नंतरच्या वर्षातील बँकींग क्षेत्रातील बदलाचा आढावा घेऊन १९९८ मध्ये नरसिंहम सामितीने दुसरा अहवाल सादर केला या अहवालात समितीने ही महत्त्वपुर्ण निरीक्षणांची नोंद केली. जागतिक वित्तीय बदलांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी एक प्रबळ व कार्यक्षम वित्तीय प्रणाली भारतात असणे गरजेचे आहे, म्हणूनच बँकींग व वित्तीय क्षेत्रात सातत्याने सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने समितीने पूढील शिफारसी केल्या.

१. संस्थात्मक संबंधीकरणासाठी उत्पन्न न देण्याऱ्या जिंदगीचे Non Performing Assets कमी करणे आणि जिंदगी पुनर्रचना निधीला चालना देणे.

२. बँक जिंदगी आणि कर्जविभागणी यांचा दर्जा वाढविणे.

३. खाजगी व सार्वजनिक बँकामध्ये स्पर्धात्मकता असावी.

४. बँकीग क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातील सुधारणा अहवालात सुचवल्याप्रमाणे वित्तीय व्यवस्थेशी रचना सुव्यवस्थित असावयास पाहिजे की जेणेकरुन आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या व्यापारी राष्ट्रीय बँका आणि भौगोलिक विभागानुसार उर्वरित लहान बँका असाव्यात मात्र भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मोठ्या बँका आणि लहान बँका यांच्या कार्यप्रमाणलीमध्ये परस्पर असा घनिष्ठ संबंध असला पाहिजे.

५. बँकीग व्यवस्थेची वित्तीयक्षमता आणि लाभता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.

६. केंद्रिय कार्यलय व शाखा कार्यलयातील तंत्रिक विकासास प्राधान्य देणे त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवणे तसेच बँकाच्या संगणकीकरणाचा वेग वाढवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. त्यासाठी कार्यक्षम आणि व्यवसायिक व्यक्तींची नेमणूक करणे, शिक्षण प्रशिक्षण, नेमणूक आणि मोबदला यावर पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

७. बँक कार्यप्रमणालीत लवचिकता आणि स्वायत्ता वाढवण्यावर लक्ष दिले पाहिजे. तसेच राजकीय हस्तक्षेप नसावा. या दृष्टीने बँकाच्या कार्यप्रणाली आणि व्यवस्थापना मध्ये बदल होणे आवश्यक आहे.

८. दिवाळखोरीला प्रतिबंध घालवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

९. सुधारणाकार्यक्रमातंर्गत ग्रामिण आणि नागरी भागातील भांडवली आणि कर्जबाजारांच्या विक्रेतीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे. विक्रेंदीकरण हा पर्याय खाजगी अल्पाधिकार आणि शासकीय एकाधिकार या दोषोपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

थोडक्यात, दुसऱ्या टप्प्यातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा, बँकाचे सवलीकरण, बँकीग कार्यप्रणालीचे सुलभीकरण तांत्रिक विकास व मानवी साधनांचा विकास यावर भर देतात. याशिवाय पद्धतीरपणे मूल्ये आणि वित्तीय संस्कृतीचे संवर्धन केल्याशिवाय तसेच लोकांना जास्त वित्ताऐवजी योग्य वित्त हे कसे श्रेयस्कर आहे. याबाबत प्रतिक्षण दिल्याशिवाय वित्तीय क्षेत्रातील सुधारणा अपुऱ्यांच राहतील.

१९९८ नरसिंहम समितीच्या अहवालाची अंमलबजावणी (Implimentation of Narsimhan Committee Recommendation)

१. व्यावसायिक विविधता साधली गेली. (व्यावसायिक विस्तार गुंतवणूक सेवा, क्रेडीट कार्ड, पायाभूत उद्योगांना पुरवठा इ.)

२. तंत्रज्ञान विषयक व्यापारात सुधारणा घडवून आली. (इंटरनेट बँकींग, संगणकीय व्यवस्था, मोबाईल बँकीग इ.)

३. व्यावसायिक गतिशिलतेमुळे जागतिक दर्जा गाठता आला.

४. बँकाचे विलीनीकरण (Bank Merger's) प्रस्ताव २००५ मध्ये अमलात आणला गेला. (सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंदोर आणि बँक ऑफ सौराष्ट्र या भारतीय स्टेट बँकेत विलीन करण्यात आल्या आहेत)

५. बँकींग क्षेत्रातील स्पर्धात्मकता वाढवण्याच्या उद्देशाने बँकातील विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण (FDI 7.4%) वाढवण्यात आले.

६. बँकाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने धोका व्यवस्थापन (Risk Management) धोरणाची अमंलबजावणी प्रभावीपणे होताना दिसून येत आहे.

थोडक्यात नरसिंहम समीती अहवाल १९९१ व १९९८ यातील शिफारशीनुसार सुधारणा घडून आल्या त्यामुळे बँकीग क्षेत्रात अनुकूल असे आमूलाग्र बदल घडून आले आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

१) १९९१ चा नरसिंहम समिती अहवालातील सुधारणा कोणत्या ?
२) १९९८ च्या दुसऱ्या टप्प्यातील बँकींग क्षेत्रातील सुधारणा थोडक्यात स्पष्ट करा.

## ११.४ भारतातील बँकीगची रचना (Structure of Banking in India)

वित्तीय संस्थाचे प्रामुख्याने बँकीग आणि बिगर बँकीग क्षेत्र असे दोन प्रकार पडतात. नियमकच्या घटकामध्ये महत्वाचा बँका आणि विक्रिय संस्थाचा समावेश असतो. भारताची मध्यवर्ती बँक (Central bank of India - RBI) आणि भारतीय प्रतिभूती आणि नियमाक मंडळ (Securtities and Exchange Board of India - SEBI) या या दोन वित्तीय संस्थाचे भारतातील बँकीग क्षेत्रावर आणि वित्तीय बाजारावर पूर्ण नियंत्रण असते. भारतातील बँकीगची रचना पूढील तक्ता क्रमांक ११.४ अ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ११.४ अ**

**भारतीय बँकींग प्रणाली**




भारतीय बँकीग प्रणालीचे प्रामुख्याने दोन विभाग पडतात. ते म्हणजे अनुसुचित बँका (Scheduled Banks) आणि बिगर अनुसूचित बँका (Non-Scheduled Bank)

अनुसूचित बँका मध्ये राज्य सहकारी बँका (State Co-operative banks) आणि व्यापारी बँका (Scheduled Commercial Banks) यांचा समावेश होतो. तर अ अनुसूचित बँकामध्ये केंद्रिय सहकारी बँका (Central Co-operative banks & prime credit societies) आणि पतसंस्था यांचा समावेश होतो. मध्यवर्ती बँक विनिमय कायदा १९४९ नूसार सर्व प्रकारच्या बँकाना त्यांच्या कार्यपध्दतीनूसार नियम व अटी घालून दिलेल्या आहेत. भारतात व्यापारी बँकाचे (अनूसूचित आणि बिगर अनुसूचित बँकाचे जाळे सर्वक्ष पसरलेले आहे. दिवसेंदिवस व्यापारी बँकांचा शाखाविस्तार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसून येत आहे. आपल्या अभ्यासक्रमानूसार व्यापारी बँकांची कामगिरी अभ्यासण्यापूर्वी व्यापारी बँकाची प्रत्यक्षात रचना किंवा पध्दती कशी आहे हे अभ्यासणे महत्वाचे ठरते. पूढील तक्ता क्रमांक ११.४ ब मध्ये अनुसूचित व्यापारी बँकाची रचना दर्शवलेली आहे.

**तक्ता क्रमांक ११.४ ब**

**भारतातील अनुसूचित व्यापारी बँका**




वरिल तक्ता क्रमांक ११.४ ब नुसार भारतात अनूसूचित व्यापारी बँकाची (Scheduled Commercial Banks) प्रामूख्याने तीन गटात वर्गवारी केली जाते ती म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगीक्षेत्रातील बँका आणि परकीय बँका होय.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे (Public Sector banks) पूढे पुन्हा तीन गटात वर्गीकरण केले जाते ते असे मध्यवर्ती बँक समुह (State bank Group) राष्ट्रीयकृत बँका (Nationalised banks - 20) आणि प्रादेशिक ग्रामीण बँका (Regional Rural Banks RRB - 82-2011) तसेच खागजी क्षेत्रातील व्यापारी बँकाची वर्गवारी जून्या खाजगी क्षेत्रातील बँका आणि नविन खाजगी क्षेत्रातील बँका अशी केली जाते. सध्या खाजगी क्षेत्रातील बँकांची संस्था अनुक्रमे १३ आणि ७ (एकुण २०) अशी आहे. अनुसूचित व्यापार बँकामध्ये परकीय बँकाचाही (Foriegn Banks) समावेश आहे. या बँकाची संस्था एकुण १७ इतकी आहे. अशा पध्दतीने व्यापारी बँकाची रचना स्पष्ट करण्यात आली आहे.

## ११.५ व्यापारी बँकाची कामगिरी

१९९८ च्या नरसिंहम समितीच्या शिफारशीनुसार सरकारने भारतीय बँकीग क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या. त्यामुळे देशाच्य आर्थिक आणि बँकीग क्षेत्रात चागला प्रतिसाद मिळाला विशेषताः भांडवल परिस्थिती, मालमत्ता, दर्जा आणि एकूण बँकांची लाभप्रदता यामध्ये स्थैर्य आणि कर्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने सातत्याने सुधारणा होत आहे. बँकीग क्षेत्रातील सुधारणा देशाचा उच्च आर्थिक वृध्दी दर वाढवण्यास आधारभूत ठरल्या आहेत. त्याचवेळी भारतीय वित्तीय प्रणालीमध्ये वित्तीय स्थैर्य राखण्याच्या दृष्टीनेही सुधारणा होत आहे.

### कामगीरीचे निर्देशक (Indicators of Performance)

व्यापारी बँकाची कार्यक्षमता किंवा कामगीरी मोजण्याचे विविध निर्देशक आहेत. यामद्ये प्रामुख्याने लाभता, उत्पादकता वित्तीय स्थैर्य आणि मालमत्तेचा दर्जा या प्रमुख चार निर्देशकांचा विचार करता येईल.

### १. लाभता निर्देशक (Profitability Indicators):

यामध्ये व्यापारी बँकाच्या खर्च आणि उत्पन्न या दोन बाबींचा विचार केला आहे. व्यापारी बँकाना उत्पन्न कर्जावरील व्याज आणि गुंतवणूकीद्वारे मिळवतात येते. तसेच दलाली, कमीशन व्यवहारावरील उत्पन्न याद्वारे उत्पन्न मिळते याशिवाय सरकारी रोख्यांची खरेदी विक्रीचे व्यवहार करुन व्यापारी बँक लाभ मिळवतात.

खर्च या घटकामध्ये व्यापारी बँकांना अनेक गोष्टींवरखर्च करावा लागतो. जसे व्याजावरील खर्च, सोयीसुविधांवरील खर्च इत्यादी थोडक्यात उत्पन्न आणि खर्च यावरुन बँकेची लाभप्रदता सिध्द होते. अर्थातच लाभप्रदता ही जास्तीच्या उत्पन्नावरुन निश्चित होते.

### २) उत्पादकता निर्देशक ((Productivity Indicator):

स्पर्धात्मकता आणि मानवी भांडवल किंवा मनुष्यबळ याचा घनिष्ठ आहे. कुशल आणि तज्ञ मनुष्यबळ यामुळे बाजारातील वाढत्या स्पर्धेतील सहजासहजी तोंड देता येते. म्हणूनच बँकाची उत्पादकता ही प्रत्येक कर्मचारी प्रत्येक बँक शाखा यांच्या कर्यक्षमतेवरुन ठरत असते.

### ३) वित्तीय स्थैर्य (Financial Stability):

बँकांचा भांडवल पर्याप्त दर (Capital Adequacy Ratio - AR) हा वित्तीय स्थैर्यावर प्रत्यक्षपणे प्रति बिंबीत होत असतो. यालाच भांडवल धोके, भारांकित मालमत्ता दर असेही म्हणतात. हे पुढील सुत्ररुपाने मांडता येईल.

$$\text{CRAR} = \frac{\text{Total Capital}}{\text{RW As}}$$ किंवा

$$\text{भांडवल धोके भारांकित मालमत्ता दर} = \frac{\text{एकूण भांडवल}}{\text{धोके भारांकित मालमत्ता दर}}$$

थोडक्यात व्यापारी बँकाचे वित्तीय स्थैर्य हे एकूण भांडवलाच्या धोके भारांकित मालमत्ता दरावर अवलंबून असते.

**४) मालमत्तेचा दर्जा (Asset Quality):**

मालमत्तेचा दर्जा हा उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीच्या पातळीवर अवलंबून असतो. उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीचे किंवा मालमत्तेचे (NPA) प्रमाण जेवढे कमी तेवढे मालमत्तेचा दर्जा अधिक असतो. बँकीगक्षेत्रातील सुधारणांनंतरचा काळात व्यापारी बँकाच्या उत्पन्न न देणाऱ्या मालमत्तेचे (NPA) प्रमाण घटत आहे.

भातीय सार्वजनिक बँका नविन खाजगी बँका आणि परकीय बँकाची कामगीरी (Performance of Public Sector Banks, New Private Sector Banks & Foreign Sector Banks).

१९९८ च्या नरसिंहम समिती अहवालातील शिफारशीचा विचार करुन सरकारने बँकींग क्षेत्रात अनेक अनुकूल बदल घडवून आणले परिणामी राष्ट्रीयकृत बँका नविन खाजगी क्षेत्रातील बाँक आणि परकीय क्षेत्रातील बँका याची लाभता उत्पादकता, मालमत्ता, वित्तीय स्थैर्य इत्यादीबाबत कामगीरी सुधारली त्यांच्यामध्ये स्पर्धात्मकता वाढीस लागली. तरीसुध्दा तुलनात्मकदृष्ट्या प्रत्येक क्षेत्रातील बँकाची कार्यक्षमता किंवा कामगीरी भिन्न आहे. अलिकडच्या काळातील प्रत्येक क्षेत्रातील बँकांची स्पर्धात्मक कामगिरी पुढील मुद्दयांच्या आधार स्पष्ट करता येईल.

**१) व्यापारी बँकाची उत्पाकदता (Productivity)**

व्यापारी बँकाची उत्पादकाता ही कर्मचारी, व्यवसाय लाभ आणि प्रती बँकशाखा व्यवसाय या तीन क्षेत्रावर निर्धारित असते. सध्याच्या काळात व्यापारी बँकांची उत्पादकता वाढत असल्याचे दिसून येते.

**२) व्यापारी बँकांची लाभप्रदता (Profitability):**

व्यापारी बँकाची लाभप्रदता ही उत्पन्न (Income / Assets) आणि खर्च (Expenses) यावर अवलंबून असते. २०११ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकाची निव्वळ लाभता ०.८५ टक्के नविन खाजगी क्षेत्रातील बंकाची लाभता ०.८ टक्के वरुन १.५७ टक्के लाभप्रदता वाढल्याचे दिसून येते.

**३) वित्तीय स्थैर्य (Financial Soundness):**

व्यापारी बँकांची वित्तीय स्थिती मोजण्याचे भांडवल पर्याप्तता दर (CAR) हे एक महत्त्वाचे आणि उत्तम निर्देशक आहे. भारतीय बँकीग प्रणालीमध्ये भांडवली पर्याप्तता निर्देशक आहे. भारतीय बँकीग प्रणालीमध्ये भांडवली पर्याप्ता दर ८ टक्के असावा असे सुचविले. बँकांच्या वित्तीय परिस्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने भांडवली निधीत वाढ होणे आवश्यक आहे.

**४) मालमत्ता दर्जा (Asset Quality):**

न उत्पन्न देणाऱ्या जिंदगीवर किंवा मालमत्तेवर (NPA) बँकाचा मालमत्ता दर्जा निर्धारित होत असतो. सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे निव्वळ कर्जाशी न उत्पन्न देणाऱ्या

जिंदगीचे प्रमाण १.०९ टक्के (०४/२००९) इतके २०११ मध्ये वाढलेले दिसून येते. अनुसूचित व्यापारी बँकाचे हेच प्रमाण २००९ मध्ये १.०५ टक्के होते ते २०११ मध्ये ०.९७ टक्के कमी झाल्याचे दिसते. याचा अर्थ अनुसूचित व्यापारी बँकाची कामगिरी चागली आहे.

**५) ग्राहक सेवा आणि बंकींग जाळे / सुविधा (Customer Services and Banking Network):**

ग्राहक समाधान हे बँकांची कामगिरी मोजण्याचे निर्देशक आहे. भारतात मध्यवर्ती बँकेने (RBI) २००६ मध्ये एक स्वतंत्र ग्राहकसेवा खाते स्थापन केले आहे. ग्राहकांचे बँकीग विघटक प्रश्न, समस्यानिवारण, बँकीगसुविधा व्याजदरतरलता, क्रेडीटकार्ड डेबीटकार्ड, सुविधा, इटरनेट बँकीग मोबाईल बँकींग इत्यादी अशा विविध सेवा बँकामार्फत पुरविल्या जातात. ग्राहकांचे बँकाशी असणारे नाते बँकींग सोई, बँकींग व्यवहारशी समाधान यामुळे बँकांची लाभता, उत्पादकता मालमत्ता, ठेवीचे प्रमाण वाढवण्यास मदत होते. अनसुचीत व्यापारी बँकानी २०११ मध्ये जवळपास ७४,५०५ लोकांना ATM कार्डसुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील नविन खाजगी क्षेत्रातील बँकांच्या प्रमाणापेक्षा हे प्रमाण सर्वाधिक आहे.

**६) तंत्रज्ञान (Technology):**

अलिकडच्या काळात बँकींग क्षेत्रात अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर सातत्याने होत आहे. त्यामुळे बँकींग क्षेत्रातील कार्यपध्दती चा दर्जा उचावताना दिसत आहे. शाखा विस्तार, संगणकीकरण, कुशल आणि प्रशिक्षित तज्ञ आणि मनुष्यबळ यामुळे व्यापारी बँकाची कार्यक्षमता वाढलेली दिसून येते.

**७) वित्तीय समावेश (Financial Inclusion):**

वित्तीय समावेसाचे प्रमुख उद्दिष्टचे म्हणजे वित्तीय सेवा पुरविणे आजच्या काळात सर्व क्षेत्रातील बँका, ठेवी स्विकारणे, कर्जे देणे ठेवीवर आकर्षक व्याजदर देणे, विमासेवा ATM क्रेडीट आणि डेबीट कार्ड सुविधा चेक्स, डिमांड्राफ्ट इत्यादी विविध सेवा ग्राहकांना पुरवित आहेत. प्राधान्य क्षेत्राना विशेष सुविधाही बँकाकडून पुरविल्या जात आहे. साहजीकच त्यामुळे दिवसेंदिवस व्यापारी बँकाची एकूणच बँकींग क्षेत्राची प्रगती होताना दिसून येत आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) अनूसूचित व्यापारी बँका म्हणजे काय ?

---

---

---

---

---

## ११.६ प्रश्न

१) १९९१ च्या नरसिंहम समिती अहवालातील सुधारणा कोणत्या ?

२) १९९८ च्या दूसऱ्या टप्प्यातील बँकीग क्षेत्रातील सुधारणा थोडक्यात स्पष्ट करा.

३) भारतातील बँकीग रचना स्पष्ट करा.

४) व्यापारी बँकाच्या कामगीरीचे निर्देशक कोणते ?

५) भारतीय सार्वजनिक बँका, नवीन खाजगी बँका आणि परकीय बँकाची कामगीरी थोडक्यात स्पष्ट करा.

६) टिपा लिहा.

१) १९९१ चा नरसिंहम समिती अहवाल.

२) १९९८ च्या नरसिहंम समिती अहवालातील सुधारणा.

३) भारतातील व्यापारी बँकाची रचना.

❖❖❖❖

# १२

# मध्यवर्ती बँक व मौद्रिक धोरण

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रस्तावना

१२.२ मध्यवर्ती बँकेची विकासात्मक आणि प्रवर्तनात्मक कार्ये

१२.३ RBI चे मुद्रा पुरवठ्याचे अलिकडील घटक किंवा मापक

१२.४ भारतातील मौद्रिक धोरणातील अलिकडील बदल

१२.५ चलनवाढ : प्रवृत्ती, कारणे आणि उपाय

१२.६ प्रश्न

## १२.० उद्दिष्ट्ये

भारतात १ एप्रिल १९३५ मध्ये मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली. स्थैर्यासह आर्थिक विकास हे महत्त्वाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मध्यवर्ती बँक अनके पारंपारिक, विकासात्मक आणि प्रवर्तनात्मक कार्ये पार पाडीत असते. आपण या पाठात भारताच्या मध्यवर्ती बँकेविषयी अभ्यास करणार आहोत. या पाठाची मुख्य उद्दिष्ट्ये पूढीलप्रमाणे सांगता येतील.

- मध्यवर्ती बँकेच्या विविध कार्याविषयी अभ्यास करणे.
- रिझर्व्ह बँकेच्या मुद्रा पुरवठ्याचे अलिकडील घटक अभ्यासणे.
- भारतामध्ये मौद्रिक धोरणातील अलिकडील बदलांचा आढावा घेणे.
- चलनवाढीची कारणे व त्यातील प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

## १२.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधार ही त्या देशाची मध्यवर्ती बँक असते. देशाच्या अर्थव्यवस्थेतील त्रुटी दूर करुन अर्थव्यवस्थेतील विकास कार्यांना गती देण्याची महत्त्वाची भूमिका मध्यवर्ती बँकेकडून पार पाडली जाते. देशातील बँकिग आणि बँकेत्तर वित्तीय संस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवणे आणि त्यांना राष्ट्राच्या विकास कार्यात पुरेसे योगदान देण्यासाठी प्रवृत्त करणे हे मध्यवर्ती बँकेचे मूलभूत उद्दिष्ट असते. आज प्रत्येक देशात मध्यवर्ती बँक असणे ही काळाची गरज आहे अर्थात विकसित आणि विकसनशील

देशातील मध्यवर्ती बँकांच्या कार्यप्रणालीत काही फरक असल्याचे जाणवते. भारतात १ एप्रिल १९३५ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ही भारताची मध्यवर्ती बँक म्हणून कार्यरत आहे.

## १२.२ मध्यवर्ती बँकेची विकासात्मक आणि प्रवर्तनात्मक कार्ये (Developmental and Promotional Functions of Central Bank)

अनेक विकसनशील देशातील मध्यवर्ती बँका अलिकडील ५० वर्षात स्थापन झालेल्या आहेत प्रगत देशातील आर्थिक स्थिती भिन्न असल्यामुळे विकसनशील देशातील मध्यवर्ती बँका परंपरागत कार्याबरोबरच इतर काही कार्ये पार पाडतात. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गतिमान करण्यासाठी सक्रिय राहण्याची आवश्यकता असते. अशा कार्यानाच प्रवर्तन किंवा विकासात्मक कार्ये असे म्हणतात. या कार्यामध्ये पुढील कार्याचा समावेश होतो.

### १) वित्तीय व्यवस्थेचा विकास :

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था गतिमान आणि विकसित होण्यासाठी त्या देशातील वित्तीय व्यवस्था (Financial System) विकसित असणे आवश्यक असते. वित्तीय व्यवस्थेत अनेक बँकींग आणि बँकेत्तर वित्तीय संस्था, वित्तीय बाजार आणि बँकेत्तर वित्तीय साधने इ. चा समावेश होतो. देशाच्या कानाकोपऱ्यात वित्तीय संस्थांचे जाळे विणून खेड्यापाड्यापर्यंत वित्तीय व्यवहार कसे पोहचतील हे मध्यवर्ती बँकेस पाहावे लागते. शेती, शेतीवर आधारीत उद्योग, कुटीरद्योग, ग्रामीण विकास इ. प्रधान्य शेतीच्या वित्तीय गरजा पुर्ण होण्यासाठी तसेच लोकांच्या बचतीला किंवा गुंतवणूकीला चालना देण्यासाठी सक्षम अशी वित्तीय व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य मध्यवर्ती बँकेस पाड पाडावे लागते.

### २) आर्थिक विकासास चालना देणे :

अविकसित आणि गरीब देशांच्या आर्थिक विकास पाहिजे तितका झालेला नसतो. अशा देशातील मध्यवर्ती बँकांना शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक व दळणवळण यासारख्या पायाभूत सुविधांना अप्रत्यक्षपणे सहाय्य करावे लागते. देशातील बँका आणि देशातील इतर वित्तीय संस्थांना गरजू व्यक्ती व संस्थांना मदत देण्यासाठी प्रेरीत करावे लागते. सेवा क्षेत्र, वाहतूक व्यवसाय, निर्यात, विपणन यासारख्या क्षेत्रांना वित्तीय संस्थांकडून आवश्यक निधी उपलब्ध झाला तर आर्थिक विकासासाठी ते महत्त्वाचे योगदान देऊ शकतात. थोडक्यात अप्रत्यक्षपणे मध्यवर्तीत बँक आर्थिक विकासाला अनुकूल निर्णय घेण्यास इतर वित्तीय संस्थांना भाग पाडते.

### ३) वित्तीय संस्थांची निर्मिती करणे :

अर्थव्यवस्थेतील शेती, लघुउद्योग, व्यापार सेवा इ. क्षेत्रांच्या गरजा भिन्न स्वरुपाच्या असतात. जर एकाच शिखर संस्थेकडे या सर्वक्षेत्रांना मदत करण्याची जबाबदारी दिली तर ती योग्य तऱ्हेने पार पडणार नाही. म्हणून मध्यवर्ती बँक विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेऊन काही वित्तीय संस्थांची निर्मिती करते. उदा. भारतात रिझर्व बँकेने शेती पतपुरवठ्यासाठी "राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक" (NABARD), औद्योगिक वित्तपुरवठ्यासाठी औद्योगिक विकास बँक (IDBI), लघुउद्योगासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँक (SIDBI), निर्यात क्षेत्र विकासासाठी भारतीय आयात - निर्यात बँक

(EXIM BANK), बचत आणि गूंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय युनिट ट्रस्ट (UTI) यास AXIS BANK असे नवीन नाव देण्यात आले आहे. यासारख्या वित्तीय संस्थांची उभारणी करण्यात आली आहे. थोडक्यात विविध स्वरुपाच्या उद्देशनिहाय संस्थांची स्थापना करणे हे एक मध्यवर्ती बँकेचे प्रवर्तन कार्य आहे. यामुळे विकसनशील देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळण्यास व गती वाढवण्यास मदत होते.

**४) प्रशिक्षण कार्य :**

वेगाने घडून येणाऱ्या आर्थिक विकासाबरोबर वाढत जाणाऱ्या बँकिंग क्षेत्रातील कर्मचारी वर्गास योग्य त्या प्रकाराचे प्रशिक्षण देण्याचे काम मध्यवर्तीक बँक पार पाडते. जर कर्मचाऱ्यांना योग्यप्रकारचे प्रशिक्षण मिळाले तर आपल्या संस्थेत ते उत्तम सेवा देऊ शकतील. पर्यायाने बँकांच्या वित्तीय संस्थांचा आणि ग्राहकांचा फायदा होईल. भारतात भारतीय रिझर्व बँकेंचे “National Institute of Management”, “College of Agriculture Banking”, “Banker’s Staff College” इ. प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यास आली आहेत. प्रशिणामुळे कर्मचाऱ्यांना कौशल्यात आणि कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होते. त्याचा लाभ संस्था व ग्राहकांना होतो.

**५) संशोधन आणि प्रकाशनाचे कार्य करणे :**

मध्यवर्ती बँकेला अर्थव्यवस्थेचा अनेक क्षेत्रातील आणि उपक्षेत्रातील विविध प्रकारची माहिती गोळा करणे आवश्यक असते. अशा माहितीच्या आधारे बँकेच्या धोरणाची दिशा निश्चित करता येते. मध्यवर्ती बँकेचे विविध विभाग शेती, उद्योग विमा, व्यापार, बचत, गुंतवणूक आणि व्याजदर क्षेत्राबाबत माहिती गोळा करतात. या माहितीचे नंतर सांख्यिकीय संकलन होते आणि शेवटी निष्कर्ष काढले जातात. या माहितीचे वर्गीकरण आणि पृथःकरण करुन ही माहिती विशेष अहवालातून (RBI’s Bulletin) प्रकाशित केली जाते.

याशिवाय मध्यवर्ती बँक देशात बँकींग सुविधांना विस्तार करते. देशातील किंमत पातळी स्थिर ठेवणे, परिणामकारक मौद्रिक धोरणाच्या साहाय्याने व्यापारचक्रांचे प्रतिकूल परिणाम सौम्य करते. देशातील नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा विकास घडवून आणते.

अशाप्रकारे मध्यवर्ती बँक देशातील सर्वश्रेष्ठ बँक म्हणून विविध प्रकारची कार्ये पार पाडते. ही कार्य करताना नफा हेतू असत नाही. सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी मध्यवर्ती बँक कार्य करीत असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) मध्यवर्ती बँकेची कार्ये थोडक्यात स्पष्ट करा.

## १२.३ RBI चे मुद्रा पुरवठ्याचे अलिकडील घटक किंवा मापक

चलनपुरवठा हा अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून मापन योग्य रीतीने होणे आवश्यक आहे.

१९७७ साली रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या सेंकड वर्कींग ग्रुप ऑन मनी सप्लायने आपला अहवाल सादर केला. या अहवालानुसार चलन पुरवठा हा आर्थिक व धोरणात्मक चल आहे. चलन पुरवठ्याचे मापन करण्यासाठी एकच मापदंड पुरेसा नसल्याने त्यांनी चार मापदंड सुचवीले आहेत.

$M_1, M_2, M_3, M_4$ हे ते चार मापदंड आहेत.

**१) $M_1$ :** यालाच संकुचीत चलन असे म्हणतात. यात श्रेष्ठतम रोखता असते.हा मापदंड चलनाचा विचर विनीमयाचे माध्यम म्हणून करतो. हा मापदंड पारंपारीक दृष्टीकानोप्रमाणे आहे. यालाच आपण राखीव चलन (Reserve Money) अथवा मूलभूत चलन (Base Money) म्हणतो. ही प्रवाही संकल्पना आहे. $M_1 =$ कागदी चलन व नाणी $+$ व्यापारी व सहकारी बँकाजवळील मागणी देय $M_1 =$ ठेवी $+$ रिझर्व्ह बँकेजवळील इतर ठेवी (उदा. NABARD सारख्या संस्थांनाच्या ठेवी).

**१) $M_2$ :** $M_2$ हा $M_1$ चा विस्तार आहे. $M_1$ मधील सर्व घटकांबरोबरच पोस्टाच्या बचत खात्यावरील ठेवीचा समावेश यात केला जातो. ग्रामीण विभागात प्रामुख्याने पोस्ट ऑफीसात ठेवी ठेवल्या जातात. या ठेवी काढून त्यांचा खर्च करण्यासाठी केव्हाही उपयोग करता येतो. या ठेवीत व्यापारी बँकाच्या मुदत ठेवींपेक्षा अधिक रोखता असते म्हणून त्यांचा समावेश केला आहे.

**३) $M_3$ :** $M_3$ म्हणजे विशाल चलन (Broad Money) होय. यालाच समग्र चलन साधने (Aggregate Monetary Resources) म्हणतात. ही संकल्पना चलनाचा द्रव्यसंचयाचा साधन म्हणून विचार करते. यामध्ये $M_1$ मधील घटकांबरोबर व्यापारी व सहकारी बँकांतील मुदतबंद ठेवीचा समावेश होतो.

**४) $M_4$** : हा $M_3$ चा विस्तार होय. यात $M_3$ बरोबर पोष्ट ऑफिस सेवेतील एकूण ठेवींचा म्हणजे मुदत ठेवी, पुनरावर्ती ठेवी वगैरेचा समावेश होतो.

थोडक्यात $M_1 =$ विधीग्राह्य चलन $+$ व्यापारी व सहकारी बँकातील मागणीदेय ठेवी $+$ रिझर्व्ह बँकेतील इतर ठेवी

$M_2 = M_1 +$ पोष्ट ऑफीसातील बचत ठेवी.
$M_3 = M_1 +$ व्यापारी व सहकारी बँकातील मुदत ठेवी.
$M_4 = M_3 +$ पोष्टातील सर्व प्रकारच्या ठेवी.

१९९८ साली चलन पुरवठ्याच्या मापनाचा पुनर्विचार करुन बदल करण्यात आला व $M_2$ आणि $M_4$ रद्द करण्यात आले. आता फक्त $M_1$ , $M_2$ (सुधारीत) $M_3$ हेच मापदंड वापरले जातात. $M_1$ मध्ये काहीच बदल करण्यात आलेला नाही. रोख साधने ही नवीन संकल्पना आली आहे. समग्र रोखतेमध्ये $L_1, L_2, L_3$ यांचा समावेश केला आहे. समग्र रोखतेची व्याप्ती चलनपुरवठा मापनाच्या नवीन मापदंडापेक्षा अधिक आहे. प्रथम नवीन मापदंड पाहू.

$M_1 =$ विधीग्राह्य चलन + व्यापारी व सहकारी बँकाजवळील बचत ठेवी + रिझर्व्ह बँकेजवळील इतर ठेवी.

$M_2 = M_1 +$ मुदत बंद बचत ठेवीची ठेव प्रमाणे पत्रे (CDI) + एक वर्षाच्या आतील मुदतीची ठेवी.

$M_3 = M_2 +$ एक वर्षावरील मुदतीच्या मुदत ठेवी + बँकांच्या अत्यल्प मुदतीच्या कर्जे (Call Borrowing) आता रोखतेच्या संकल्पना पाहू.

$L_1 = M_3 +$ पोष्टाजवळील सर्व प्रकारच्या ठेवी.

$L_2 = L_1 +$ दीर्घ मुदतीची कर्जे देणाऱ्या संस्थांच्या मुदत ठेवी + वित्तीय संस्थांची दीर्घकालीन कर्जे + वित्तीय संस्थांची ठेव प्रमाणपत्रे.

$L_3 = L_2 +$ बँकेत्तर वित्तीय मध्यस्थ संस्थांजवळील (NBPC) ठेवी.

अशा प्रकारे चलन पुरवठा मापनात विविध रोखता असलेल्या सर्व घटकांचा समावेश करुन परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) $M_1, M_2, M_3$ आणि $M_4$ ह्या संकल्पना स्पष्ट करा.

## १२.४ चलनवाढ : प्रवृत्ती, कारणे आणि उपाय

**चलन वाढ / भाव वाढ (Inflation) :**

अर्थव्यवस्थेतील चलनवाढ विविध कारणांच्या एकत्रित परिणामामुळे घडून येत असते, सर्वसाधारणपणे किंमत पातळीत फार मोठी वाढ जलद व सातत्याने घडून येणे

म्हणजे चलनवाढ होय. अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवा यांच्या किंमतीत वाढ घडून येण्याची प्रवृत्ती सातत्याने येत असेल तर त्यास चलनवाढ म्हणतात.

**व्याख्या :**

**प्रा. पिगू :** उत्पन्न प्राप्तीच्या क्रियेतील वाढीपेक्षा मौद्रिक उत्पन्नातील वाढ जास्त प्रमाणात होते.

**प्रा. हॉट्रे :** चलनवाढ म्हणजे फार जास्त चलन निर्गमित करणे होय.

**ग्रेगरी :** खरेदीशक्तीच्या परिमाणातील असामान्य वृद्धी म्हणजे चलनवाढ होय.

**अ) मागणी प्रेरित चलनवाढ :**

**१) पैशाचा पुरवठा :**

अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असताना पैशाच्या पुरवठ्यात वाढ केल्यास लोकांच्या क्रयशक्तीत वाढ घडून येते. त्यामुळे अतिरिक्त मागणी निर्माण होऊन वस्तूच्या किंमती वाढतात आणि मागणीजन्य चलनवाढ निर्माण येते.

**२) शासकीय खर्च :**

सरकारचा विकास तसेच बिगर विकास खर्च प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे जनतेच्या हातातील खर्च योग्य उत्पन्न वाढते म्हणून वस्तू व सेवांची मागणी वाढते व परिणामी किमंत वाढतात.

**३) लोकसंख्येतील वाढ :**

लोकसंख्येत वेगाने वाढ होत असल्याने अन्नधान्य तसेच इतर वस्तू व सेवांची परिणामकारक मागणी प्रत्यक्षपणे वाढत असते. मात्र पुरवठा तेवढ्या प्रमाणात वाढत नाही त्यामुळे मागणी व पुरवठ्यात असंतुलन निर्माण होते व चलनवाढीस चालना मिळते.

**४) काळा पैसा :**

काळाबाजार, कर बुडवेगिरी, लाचखोरी हे अर्थव्यवस्थेतील सामाजिक आणि आर्थिक दृष्ट कृत्ये आहेत. अशा प्रकारच्या कृत्यामुळे संमातर अर्थव्यवस्था निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत काळा पैसा तयार होतो. असा काळापैसा चैनीच्या उपभोगासाठी खर्च केल्यास वस्तूंना अतिरिक्त मागणी निर्माण होते आणि चलवाढीस चालना मिळते.

**५) निर्यात :**

वस्तूची निर्यात केल्यामुळे देशी बाजारपेठेत वस्तूंची उपलब्धता घटते. तसेच निर्यातीमुळे निर्यातदारांची क्रयशक्ती वाढते. परिणाम देशी बाजारपेठ वस्तूच्या किंमतीत वाढ होऊन मागणीजन्य चलनवाढ निर्माण होते.

**६) सार्वजनिक कर्जाची परतफेड :**

सरकारद्वारे सार्वजनिक कर्जाची परतफेड केली जाते. तेव्हा लोकांच्याकडील खर्चयोग्य उत्पन्नात वाढ होते. अशा परिस्थितीत लोकांची क्रयशक्ती वाढते. त्यामुळे किंमती वाढतात आणि मागणीजन्य चलनवाढ निर्माण होते.

**७) पतनिर्मिती :**

व्यापारी बँकांनी अधिकाधिक पतनिर्मिती केल्यास पैशाचा पुरवठा अर्थव्यवस्थेत वाढला जातो. त्यामुळे वस्तूंच्या किंमतीत वाढ होऊन मागणीजन्य चलनवाढ निर्माण होते.

**ब) खर्च प्रेरित चलनवाढ**

**१) वेतनवाढ :**

हा उत्पादनासाठी वाढीतील महत्त्वाचा घटक आहे. कामगार संघटनांच्या दबावामुळे वेतनवाढ होते. परंतू त्यावेळी कामगारांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होत नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून किंमती वाढतात. वाढत्या किंमतीमुळे पुन्हा वेतनवाढ होते. किंमतवाढ ते वेतनवाढ होते. किमंतवाढ व वेतनवाढ हे दुष्टचक्र भाववाढीचे कारण ठरते.

**२) नियोजन व विकास :**

नियोजन व विकासासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. त्यामुळे उत्पादन घटकाची मागणी व किंमती वाढतात. त्याचा परिनाम म्हणून उत्पादनखर्च वाढून भाववाढ होते.

**३) शासनाचे किंमत धोरण :**

सरकारचे किंमत धोरण सतत बदलत असते. शेतमालाच्या आधारभुत किंमत सरकार वाढवते. त्यामुळे भाववाढीस उत्तेजन मिळते.

**४) कर :**

राज्य सरकार व केंद्रसरकार उत्पादन कर विक्रीकर यासारखे अप्रत्यक्ष कर बसविते. या करामुळे उत्पादन खर्च वाढतो व त्यामुळे करांचा भार वस्तूंच्या किंमती वाढवून ग्राहकांवर ढकलला जातो. भारतात अप्रत्यक्ष करांचे प्रमाण व दर खूपच असल्याने वस्तूंची भाववाढ होते.

**५) उत्पादनातील चढउतार :**

शेती उत्पादनातील चढउतारामुळे शेतमालाच्या किंमती वाढतात. त्यामुळे अन्नधान्य आणि औद्योगिक कच्चा माल यांच्या किंमती वाढून सरासरी किमंत पातळी वाढते. भारतातील किमंत वाढीचे हेच महत्त्वाचे कारण आहे.

**६) आयात किमंतीत वाढ :**

आयातीवर जकाती बसवल्या जातात. आयात कच्चा माल व इतर उत्पन्नाच्या किमंतीवर वाढ झाल्याने उत्पादनखर्च वाढतो आणि किंमती वाढतात.

**७) शासननिर्धारीत वस्तूच्या किंमतीत वाढ :**

सरकार पेट्रोल, डिझेल, स्टील, कोळसा, सिमेंट या सारख्या वस्तूंच्या किमंती वाढवते. तसेच रेल्वे व वाहतूकीच्या भाड्यात वाढ करते. या मूलभूत आदानांच्या किंमती वाढल्याने भारताला तेलाच्या किंमती वाढवाव्या लागतात. त्यामुळे भाववाढ होते. अशाप्रकारे भाववाढ ही गुंतागुंतीची प्रक्रिया असून सर्व कारणे परस्परावलंबी आहेत. या

सर्वाचा परिणाम म्हणून भाववाढ एका गटातील कारणांमुळे सुरु होते आणि दुसऱ्या गटातील कारणे ती दृढ करतात.

## १२.५ भारतातील मौद्रिक धोरणातील अलिकडील बदल

मध्यवर्ती बँक आपली चलनविषयक धोरणे प्रभावीपणे राबवता यावे यासाठी पुढील उपाययोजना अमंलात आणल्या आहेत.

### १) भिन्न व्याजदराचे धोरण :

ज्येष्ठ नागरिक, सेवा निवृत्त यांनी बँकेत ठेवी ठेवल्यास त्यांना १% जास्त व्याज ठेवींवर दिले जाते.

### २) इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर :

एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी पैशाचे हस्तांतरण त्याच दिवशी व्हावे यासाठी १ ऑक्टोबर २००० पासून मोठ्या शंहरासाठी ही योजना सुरु केली होती. आता ही योजना अनेक शहरांसाठी लागू आहे. त्यामुळे कोट्यावधी रु. ची रक्कम हस्तांतरीत होते.

### ३) वसूली व्यवस्थापन :

व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे त्वरीत वसूल व्हावी यासाठी लवादाची स्थापना आली असून सार्वजनिक क्षेत्राच्या बँकांची सुमारे २,६०० कोटी रु. ची कर्जे वसूल करण्यात आली.

### ४) निर्यात कर्ज :

निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे यासाठी निर्यातदारांना व्याजदर सवलत, कर्जाचा सुलभ अटी इ. सुविधा देण्यात आल्या तसेच निर्यात आधी ९० दिवस व निर्याती नंतर १८० दिवसापर्यंत निर्यातदारांना कर्जे दिली जातात. ३१ मार्च २००२ पर्यंत रु. ११२७८ कोटी एवढी कर्जे निर्यातदारांना दिली गेली.

### ५) प्राधान्य क्षेत्राला कर्ज :

लघु उद्योग, कुटिर उद्योग, शेती, स्वयंरोजगार, यासारख्या क्षेत्रांना तसेच शिक्षण, रस्ते, वाहतूक यासारख्या प्राधान्य क्षेत्रांना कर्जपुरवठा करण्यात येतो.

### ६) लघुउद्योगासाठी बँक :

लघुउद्योगाची कर्जे, त्यांच्या समस्या व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच आवश्यक ती कर्जे पुरवठा करण्यासाठी लघुउद्योग बँकेची स्थापना करण्यात आली.

### ७) आंतरराष्ट्रीय वित्तीय नियम :

भारतातील बँका, वित्तीय संस्था, यांना जागतिक पातळीवर स्पर्धेला तोंड देता यावे यासाठी त्यांच्या कार्यवाहित आंतरराष्ट्रीय वित्तीय नियम त्यांनी पाळावेत असे बंधन त्यांच्यावर लादले. त्यामुळे त्यांची कार्यपद्धती गुणवत्ता यात आमुलाग्र बदल होत आहे.

### ८) सुक्ष्म वित्त पुरवठा :

ग्रामीण भागात कर्जपुरवठा करता यावा यासाठी स्वमदत समुहाद्वारे ग्रामीण गरीब लोकांना वित्त पुरवठा करण्यासाठी या योजनेचा स्विकार केला गेला त्यात लहान व सिमान्त शेतकरी, शेती व्यतिरिक्त इतर श्रमीक, शेतमजुर ग्रामीण कारागीर, हस्तकला व्यवसायीक यांना कर्जपुरवठा करण्याचे धोरण स्विकारले आहे. भारतातील सुक्ष्मवित्त कार्यक्रम जगातील सर्वात मोठा व शिघ्र विस्तार होणारा कार्यक्रम आहे. मार्च २००५ मध्ये सुमारे २४२ लक्ष कुटूंबाचा सूक्ष्म वित्त पुरवठा करुन स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला गेला.

### ९) राजकोषीय व चलन धोरणातील संबंध :

रिझर्व्ह बँक व केंद्र सरकार यांनी संयुक्तपणे निर्णय घेवून पुढील तीन वर्षाच्या ट्रेझरी बीलाच्या सहाय्याने कर्जपुरवठा हे धोरण बंद करण्याचे ठरवले.

### १०) राखीव निधी दरात कपात :

रोख राखीव निधीचे प्रमाण ४.५% पर्यंत कमी करणे तसेच वैधानिक रोखता दर जून २००३ पर्यंत २५% पर्यंत कमि करण्याचे धोरण आखण्यात आले त्यामुळे बँकाची रोखता व लाभप्रदता वाढली.

### ११) रचनात्मक व्याजदरात बदल :

इ.स. १९६० पर्यंत द्वारे नियंत्रीत व्याजदरानेच बँकांना कर्जपुरवठा करता येत होता. परंतु १९९० नंतर किमान कर्जदाराचे धोरण रद्द करण्यात आले आणि रु. २ लाखापर्यंतच्या कर्जासाठी व्याजदर ठरवण्याचा अधिकार बँकांना दिला गेला.

### १२) सरकारी कर्ज रोखे बाजार :

या बाजाराला गती देण्यासाठी अनेक सुधारणा केल्या गेला.

## १२.६ प्रश्न

१) मध्यवर्ती बँकेचे विकासात्मक आणि प्रवर्तनात्मक कार्ये कोणती आहेत ?
२) रिझर्व्ह बँकेचे मुद्रा पुरवठ्याचे घटक किंवा मापक स्पष्ट करा.
३) चलनवाढ म्हणजे काय सांगून चलनवाढीची कारणे स्पष्ट करा.
४) भारतातील मौद्रिक धोरणातील अलिकडील बदलांची चर्चा करा.
५) टिपा लिहा.
   १) मध्यवर्ती बँकेची कार्ये
   २) रिझर्व्ह बँकेचे मुद्रा पुरवठ्याचे घटक.
   ३) चलनवाढीची कारणे

❖❖❖❖

Institute of Distance And Open Learning, University Of Mumbai, Offers Following Courses :

| Traditional Courses | | Professional Courses | | |
|---|---|---|---|---|
| 1. | F.Y.B.A. | 1. | F.Y.B.Sc. | (I.T.) |
| 2. | S.Y.B.A. | 2. | S.Y.B.Sc. | (I.T.) |
| 3. | T.Y.B.A. | 3. | T.Y.B.Sc. | (I.T.) |
| 4. | F.Y. B.Com | 4. | F.Y. B.Sc. | (Comp. Science) |
| 5. | S.Y. B.Com | 5. | S.Y. B.Sc. | (Comp. Science) |
| 6. | T.Y. B.Com | 6. | T.Y. B.Sc. | (Comp. Science) |
| 7. | M.A. Part I | 7. | M.Sc. I | (I.T.) |
| 8. | M.A. Part II | 8. | M.Sc. II | (I.T.) |
| 9. | M. Com I | 9. | M. Sc. I | (Comp. Science) |
| 10. | M. Com II | 10. | M. Sc. II | (Comp. Science) |
| 11. | M. Sc. I (Math) | 11. | F.Y.B.Sc. | (Nautical Tech.) |
| 12. | M. Sc. II (Math) | 12. | S.Y.B.Sc. | (Nautical Tech.) |
| 13. | M.A. Education I | 13. | T.Y.B.Sc. | (Nautical Tech.) |
| 14. | M.A. Education II | 14. | M.C.A. | |

## P. G. Diploma Courses

1. Diploma in Financial Management (DFM)
2. Diploma in Operating Research in Management (DORM)




# INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

# University of Mumbai

Dr. Shankar Dayal Sharma Bhavan
Vidyanagari, Santacruz (E), Mumbai - 400 098.
www.mu.ac.in